म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय धर्म
सं. क्र. १3

# कलियुग.

या विषयावर मुंबई येथील आर्यसमाजांत

तारीख २९ जुलई सन १८७७ रविवारीं

संभाषण झालें त्याचें

टिप्पण.

मालकाकरितां,

मुंबई:

"एशियाटिक" छापखान्यांत छापिलें.

माहे अक्टोबर, सन १८७७.

किंमत २ आणे.

सं. ६८ १६७-१६४

# कलियुग.

सांप्रत कलियुग चालत आहे असा सर्व आर्यजनांचा अभिप्राय आहे. आतां यास 'कलियुग' कां ह्मणतात, त्याचें स्वरूप काय, त्याचे धर्म काय, आणि त्याचें मूळ कोठें याचा विचार करण्यायोग्य आहे. पुराणादिकांत पाहिलें तर पुरातन आर्य इतिहास लिहिणारे यांणीं चार युगें मानिलीं आहेत. प्रथम कृत, नंतर त्रेता, नंतर द्वापार, आणि नंतर कलि. हे काळाचे भेद कशाकरितां केले याचा विचार केला असतां असें दिसतें कीं, देशाचे किंवा कालाचे भेद मानण्यास मोठे फरक हेंच कारण होय. जेव्हां मोठे फरक दिसतात तेव्हां भेद मानला जातो. नर्मदा ही मोठी नदी आहे. आतां तिच्या पलीकडे भाषा व रीतिभाती वेगळ्या आहेत व आलीकडे वेगळ्या आहेत, याजकरितां आलीकडचे देशास 'दक्षिण' व पलीकडचे देशास 'हिंदुस्थान' असें मानतात. तसेंच सह्याद्रीखालीं 'कोंकण' व वरतीं देश असें ह्मणण्याचेंही कारण हेंच आहे. दोन्हीकडे पाहिलें तर देशाचें स्वरूप, पीक, पदार्थ, लोक, रीतिभाती वेगळ्या ह्मणून त्यांत भेद मानला गेला; आणि मुळीं वस्ती झाली तेव्हां या मोठ्या अडचणी दुस्तर होत्या ह्मणून लोकांची रहदारी होत नव्हती; व त्याजमुळें हे भेद उत्पन्न झाले. त्याचप्रमाणें कालाचे भेद उत्पन्न होण्यासही मोठे फरक दिसले पाहिजेत. उजेड जाऊन काळोख पडला ह्मणजे एकास 'रात्र' व एकास 'दिवस' ह्मणतात. सूर्य दक्षिणेकडे वळला ह्मणजे 'दक्षिणायन' ह्मणतात, उत्तरेकडे वळला ह्मणजे 'उत्तरायण' ह्मणतात. हा अयनांचा व तसाच ऋतूंचा भेद बहुतांस व्यक्त आहे. एक जाऊन दुसरा आला कीं पहिलें सर्व मान फिरतें. त्याचप्रमाणें ज्यांणीं युगें मानिलीं त्यांस असें वाटलें असेल कीं, पूर्वीचें मान फिरलें. त्यांस असें स्पष्ट वाटल्याखेरीज युगाची कल्पना झाली नसेल.

आमचे ग्रंथकार बहुतकरून धर्माधिकारी होते, त्यांणीं धर्मावर नजर दिली. धर्मांत फेरफार जाहले असें त्यांस वाटल्यावरून त्यांणीं हा काळभेद मानला असावा, असें मीं ज्या ग्रंथाचें अवलोकन केलें आहे त्यावरून दिसतें. ही युगकल्पना वेदास अश्रुत आहे. वेदाचे षडंगांतही याचा दाखला नाहीं. पुढें जें पुराणमिश्रित ज्योतिष पोट भरण्याकरितां उत्पन्न झालें, त्यांत मात्र ही युगकल्पना आहे. त्याकाळीं जे धर्म प्रचारांत होते त्यांत ज्याचें मनांत फेरफार करावयाचे होते त्यांस ही कल्पना फार उपयोगी पडली. स्त्रियांनीं आपत्कालीं पुनर्विवाह व नियोग करावा कीं नाहीं, असा प्रश्न कोणी केला, तर पंडित लागलेंच सांगतात कीं, " ती पूर्व युगांतली गोष्ट; कलियुगांत ती वर्ज्य आहे. " क्षत्रियांनीं अश्वमेध करावा कीं नाहीं, तर ह्मणतात कीं, "तो कलींत वर्ज्य आहे." याप्रमाणें कलींत कोणतीं कर्में वर्ज्य करावीं व कोणतीं ग्राह्य करावीं याविषयीं पृथक्पृथक् पुराणांत अध्याय आहेत, त्यांजवरून कितीएक वैदिक कर्में रद्द करून त्या ठिकाणीं प्रतिनिधी करून दिले आहेत; किंवा तीं मुळींच काढून टाकिलीं आहेत. त्याचप्रमाणें पुढें कल्पाच्या व गुणाच्या कल्पना करून कितीएक धर्मांत फेरफार केले आहेत. पुराणांत सावित्रीचे इतिहास दोन तीन प्रकारचे येतात, तर त्याजविषयीं असें ह्मणतात कीं पुराण लिहिणारे चुकले नाहींत, परंतु पृथक् पृथक् कल्पांतील त्या गोष्टी आहेत. तसेंच शिवपुराण, विष्णुपुराण यांत विरोध येतो तेव्हां असें ह्मणतात, कीं एक सात्विक आहे व एक तामस आहे. तामस ह्मणून राक्षसांकरितां लिहिलें. तंत्रें धर्मशास्त्राविरुद्ध आहेत, तींही राक्षसांकरितां केलीं असें ह्मणतात. अशा ह्या पळण्याच्या वाटा काढून मूढांच्या समजुती घालण्याचे यत्न केले आहेत. पूर्वींच्या स्मृति होत्या त्याप्रमाणें चालणें कठीण पडूं लागलें, ह्मणून कलिप्रयुक्त पाराशरादिक स्मृति उत्पन्न झाल्या.

चार युगांतील मुख्य धर्म ग्रंथांतरीं कोठेंकोठें आढळतात. ते असे कीं, ( १ ) पहिल्यांत ध्यानधर्म ( २ ) दुसऱ्यांत यज्ञधर्म ( ३ ) तिसऱ्यांत भक्तिधर्म व ( ४ ) चौथ्यांत स्मरण.

॥ कृते तु ध्यायते विष्णुस्त्रेतायां यजते मखैः ॥
॥ द्वापरे परिचर्याभिः कलौ तु हरिकीर्तनात् ॥ भागवत.

कांहीं ग्रंथांत कलींत दानाची प्रशंसा लिहिली आहे.

"दानमेकं कलौ युगे"

अशीं वचनें आढळतात. याजवरून नामदेव, तुकाराम इत्यादिकांनीं काव्यद्वारा स्मरणधर्माची प्रशंसा करून हरिकीर्तनें, भजनें, दिंड्या वगैरे वारकरी पंथांत चालू केल्या व त्या हल्लीं चालू आहेत.

आतां अन्य देशांतील लोक तर ही युगकल्पना मुळींच मानीत नाहींत. पूर्वींचा काळ वाईट होता आणि पैगंबरांनीं सत्य धर्म चालविला तेव्हांपासून या जगांत उत्तम युग प्राप्त झालें असें मुसलमान ह्मणतात. पूर्वीं "डार्क एज" ह्मणजे अज्ञानाचा व वाईट काळ होता तो जाऊन आतां अभ्युदयकाळ प्राप्त झाला आहे असें युरोपीयन समजतात. काय ते हिंदु लोक मात्र पूर्वींचा काळ चांगला होता व आतां फार वाईट काळ आला असें ह्मणतात.

कलीचें स्वरूप असें वर्णिलें आहे कीं कलि असत्य व अधर्मरूप आहे. तो धर्मास व नीतीस व सर्व सद्गुणास दूर करितो; आणि अधर्म, दुर्व्यसनें व दुर्गुण यांची प्रवृत्ति करितो. दरएक पुराणांत व कांहीं आधुनिक ग्रंथांत कलीचें वर्णन निंदारूप आहे. त्याची वर्षसंख्या ४३२००० आहे. पैकीं संधि आणि संध्यांश असे प्रारंभीं आणि शेवटीं येतात. मध्यें घोरकली येतो असें लिहिलें आहे. हल्लीं संधिकाळ आहे. त्यापैकीं ४९७८ वर्षें व्यतीत आहेत, आणखी त्रावीस वर्षांनीं गंगेचें माहात्म्य जाणार अशी लोकांची समजूत आहे.

दरयुगांत चारी युगांचे धर्म चालू असतात असें हीं कोठें लिहिलें आहे. द्वापारांत दुर्योधन, त्रेतायुगांत रावण इत्यादि कलींतील पुरुष होते. तसेंच कलियुगांत एकनाथ, तुकाराम, रामदास हे सत्ययुगाचे प्राणी होते. जेथें सत्कर्म व सदाचार आहे तें सत्ययुग व जेथें कुकर्म व दुराचार तें कलियुग असें ह्मटलें पाहिजे.

वेगळें युग ह्मणण्यासारखें कालस्थितींत कोणतें अंतर पडलें त्याचा विचार केला असतां असें दिसतें, कीं, बौद्धमताचा उदय हेंच होय. बुद्धाचें मूळस्थान मगधदेशीं गया हें होय. त्याणें राज्य सोडून धर्मस्थापना करण्याकरितां वाराणशी वगैरे क्षेत्रीं उपदेश केला. त्यांत ब्राह्मणांचीं निंदा फार झाली. आणि बौद्धाचे शिष्य फार झाले. त्यांणीं वेदांची, वर्णाची व विधींची आणि त्यांचे स्थापक ब्राह्मण यांची निंदा केली. त्या दिवसापासून उभयतांमध्यें कलि ह्मणजे कज्जा झाला. ह्मणून याचें नांव कलियुग पडलें असावें. ब्राह्मणांमध्यें वेदोक्त धर्माप्रमाणें हिंसाश्रित यज्ञकर्म, वर्णभेद व अनेक प्रकारचे विधि होते, ते बुद्धास वाईट वाटले; ह्मणून ते व्यर्थ आहेत असें त्याणें प्रसिद्धपणें सांगितलें; व आपले शिष्यांकडून त्याचा त्याग करविला. पुरुषांप्रमाणें स्त्रियांस संन्यास दिले व हल्लींही देतात. तप वाढविलें, उपनयन, उत्तरक्रिया या सर्व टाकून दिल्या. सत्पुरुषांचीं यथार्थ वचनें हींच वेदांपेक्षां चांगलीं व तींच शास्त्रें असें ठरविलें.

कलीमध्यें स्त्रियांस अगदीं हलक्या व अनधिकारी केल्या, हें एक विलक्षण कृत्य झालें. त्यांस पूर्वीं जो उपनयनाचा अधिकार होता तो मुळींच काढून टाकिला, आणि त्या शूद्रासारख्या आहेत असें ठरविलें.—" स्त्रीशूद्राणां तु समानधर्माः " परंतु माता जर शूद्री मानिल्या तर वर्णसंकर होतो. आतां हा दोष उडविण्याकरितां लग्नसंस्कार हाच स्त्रियांस उपनयनविधि असें ह्मणूं लागले; "वैवाहिको विधिस्त्रीणामौपनायनिकः स्मृतः" परंतु उपनयनाचे ठिकाणीं लग्न आल्यामुळें ब्रह्मचर्य, वेदाभ्यास हे उडाले. स्त्रियांनीं विवाहित स्थितींत राहावें असें ठरलें. दुसरें संन्यासाचा अधिकार काढला, पुनर्विवाहही काढला व वर सांगितल्याप्रमाणें ब्रह्मचर्य गेलें ह्मणून सती जाण्याचा मार्ग निघाला.

॥ कलौ नान्या गतिः स्त्रीणां सहानुगमनादृते ॥

जी विधवा होईल तिणें मरावें यावांचून इलाज नाहीं हें कलियुगांत ठरलें. हा अत्यंत जुलूम वाढला. हें वाक्य रचणारा केवळ चांडाळापेक्षांही नीच असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. स्त्रियांची निंदा फार

९२१ ७८८

होऊं लागली, होळीसारखे सण चालते करून स्त्रीनिंदेचे झेंडे उभे झाले. "नारी प्रत्यक्षराक्षसी"—"स्त्रियां दोषाः स्वभावजाः" इत्यादि वाक्यें लिहिलीं गेलीं व सुभाषितकारां सहा विषय टवाळक्या करण्यास सांपडला. आतां उपनयनाचे ठिकाणीं लग्न आलें तेव्हां उपनयनाचे कायदे त्यास लागू केले. आठ वर्षांत लग्न करावें. लग्नावांचून कन्या राहूं नये. जसा मुंजीवांचून मुलगा राहूं नये तसेंच तें. कारण कीं तो उपनयनावांचून व्रात्यांत धरला जाईल, तशी अविवाहित कन्या संस्कारहीन होईल असें समजूं लागले. असे हे स्त्रियांचे अधिकाराविषयीं संकोच होऊन हजारों कन्या रत्नासारख्या विराजमान असाव्या त्या केरासारख्या उकिरड्यावर पडल्या! लग्नकाळ जाईल म्हणून त्या कोणास तरी देऊन टाका!!

॥ काममा मरणात्तिष्टेद्गृहे कन्यर्तुमत्यपि ॥
॥ न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ **मनु.**
॥ अज्ञातपतिमर्यादामज्ञातपतिसेवनाम् ॥
॥ नोद्वाहयेत्पिता बालाम ज्ञातधर्मशासनाम् ॥ **मनु.**

"बुद्धिमते कन्यां प्रयच्छेत"

हे नियम बुडाले आणि मुलींचीं लग्नें बाल्यावस्थेंत होत आलीं, त्यामुळें पुरुषांनीं आपलें ब्रम्हचर्य सोडून दोन वर्षांचें चार वर्षांचें अंतर पाहून ते लग्न करूं लागले. अर्थात् उभयतांचें ब्रह्मचर्य, व विद्याभ्यास बुडाला; आणि प्रजा ज्ञानहीन, व बळहीन झाली. आणि परशुराम राम, भीष्म, विक्रम, शिवाजी यांचा काळ जाऊन नररूपी मेंढरें देशभर पसरलीं.

कलीमध्यें तिसरें एक नवीन प्रस्थान उभें राहिलें; तें हें कीं, अवतार कल्पना; वेदांस ही युक्ति अश्रुत आहे. वायु, तेज, पर्जन्य हीं वेदांमध्यें पूज्य आहेत. कारण कीं ईश्वराचें अस्तित्व या महातत्त्वांचे द्वारानें प्रत्यक्ष होतें असें त्यावेळचे लोक समजत होते. त्या ठिकाणीं मनुष्यें वगैरे ईश्वराचे अवतार असें समजूं लागले. रामकृष्णादि मोठे राजे, व्यासासारखे कवि, दत्तात्रेयासारखे योगी हे अवतारी पुरुषांत गणले गेले. मग भक्तमंडळी उभी झाली. त्यांणीं कांहीं सत्य आणि कांहीं

कल्पित असे आवडते अवतार मानून त्यांचे अनुयायी दत्तसांप्रदायी, गाणपत्य, नृसिंहसांप्रदायी, शैव, रामदासी, हनुमानउपासक, कृष्णभक्त असे उत्पन्न झाले. त्यांणीं उपासनेचे नानामार्ग काढिले. प्रत्येकांनीं आपले पुराव्यास प्रस्थानिक ग्रंथ केले. रामगीता, गणेशगीता, कृष्णगीता, शिवरहस्य व हरएक देवाचीं स्तोत्रें, स्तव, दुर्ग, रक्षा,कवचें, सहस्रनाम, पटल, पद्धती उभ्या केल्या. प्रत्येकाची सामग्री वेगळी. कोणास बेल, कोणास दूर्वा, कोणास तुळशी, कोणास शमी, अशा वांटण्या ठरल्या. हें एक कलियुगांतील चमत्कारिक चरित्र आहे.

कलींत असें ठरलें कीं, ऋषी बुडाले, आतां राहिलीं तीं माणसें; ऋषी हे अदृष्टार्थ द्रष्टे होते, आणि माणसें तीं आंधळीं. त्यांणीं मागील लेख पाहून त्यांत बदल न करतां चालावें. असें ठरण्याचें कारण असें दिसतें कीं, विद्या नाहींशी झाली, केवळ घोकणारास ऋषीशब्द लागेना, यापासून एक विलक्षण परिणाम झाला; तो असा कीं, मागील ऋषींचे ग्रंथ एक अभिप्रायाचे नव्हते आणि ते एक अभिप्रायाचें आहेत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न मनस्वी चालला. हेमाद्रि, माधव, या सारखे या कामांत प्रवृत्त झाले. या कामांत हजारों वर्षांपासून खटपट चालली आहे. पारिजात, निर्णयसिंधु, मयूख आणि दुसरे हजारों प्रकारचे ग्रंथ या विषयावर झाले आहेत. त्या सर्वांस महानिबंध किंवा प्रयोग किंवा पौरुषग्रंथ असें ह्मणतात. या प्रयत्नांत मूळचीं धोरणें व धर्माची सुलभता सुटून अनेक क्षुद्र व दुष्ट कल्पना निघाल्या. मद्रासचे, बंगाल्याचे आणि मुंबईचे कायदे किंवा चीनचे आणि इराणचे कायदे ह्यांचीं पुस्तकें घेऊन, त्यांचे कर्ते शहाणेच होते, त्यांणीं कांहीं व्यर्थ लिहिलें नाहीं, अशा मताचा अंगिकार करून त्यांचें एकीकरण करण्याचा प्रयत्न केला तर जसा निंद्य परिणाम होईल, त्याचप्रमाणें याचा परिणाम झाला. लक्षावधि विरोध उत्पन्न झाले. त्यांस कांहीं युगकल्पनेनें, कांहीं बाल, वृद्ध, आतुर या भेदानें, कांहीं सात्विक, राजस या भेदानें, कांहीं कल्पभेदानें, कांही ब्राह्मण. क्षत्रिय, वैश्य शूद्र या भेदानें मोडून टाकण्याचा प्रयत्न करीत चालले. हा भगी

रथ प्रयत्न करण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, कोणताही ऋषी बोलला तें व्यर्थ नाहीं; ते सर्व भूत भविष्य वर्तमान जाणणारे. होते, तेव्हां सर्वांच्या वचनाचा चरितार्थ असावा इतकाच या प्रयत्नाचा हेतु दिसतो. परंतु सत्य पाहिलें तर असें दिसतें कीं वेगळे वेगळे काळीं, व वेगळे वेगळे देशीं ऋषींनीं लेख लिहिले त्यांत मतभेद दिसतो, तो विकल्प किंवा विभाषा समजावी असें असतां तें टाकून निबंधकारांनीं पांडित्य करून हे भेद काढून टाकण्याचा प्रयत्न चालविला. याचीं उदाहरणें:— एक ऋषी ह्मणतो कीं, ग्रहणापूर्वीं एक प्रहर उपास करावा, दुसरा ह्मणतो कीं, चार प्रहर पूर्वीं जेवूं नये. त्यांची ऐक्यता करतांना निर्णयसिंधूंत कमलाकरानें ठरविलें कीं वृद्ध, मुलें, व रोगी ज्यांच्यानें उपास होत नाहीं त्यांणीं एक प्रहराच्या ऋषीचें मत घ्यावें. निरोगी असतील त्यांणीं चार प्रहरांचा शास्त्रार्थ घ्यावा ह्मणजे दोन्ही ऋषींचे वाक्यांचें सार्थक्य झालें. पूजेमध्यें पशूचें बळीप्रदान पशुपुष्पार्घ्यधूपैश्च करावें असें सप्तशतींत लिहिलें आहे. त्याजवर पांडित्य करून ठरविलें कीं तें ब्राह्मणांनीं करूं नये. क्षत्रिय वगैरे जे पशुभक्षण करितात त्यांजकरितां तें वाक्य लिहिलें आहे.

विधवेनें पुनर्विवाह करावा अशीं ऋषिवाक्यें आहेत. कोणाचीं अशीं ही आहेत कीं, करूं नये. त्याजवर कोटी अशी केली आहे कीं, करावें ह्मणून बोलले ते पूर्व युगांतील आणि निषेध केला तें या युगांतील, अश्वमेधाविषयींही असें मत आहे कीं, तो पूर्व युगीं व्हावयाचा; अशीं अनेक मतें उत्पन्न झालीं, इतकेंच नाहीं; परंतु नवीन कृत्यें सामील करून कर्मकांड विनाकारण वाढविलें. कोणत्याही सूत्रांत सहगमन लिहिलें नाहीं. या प्रयोगकारांनीं त्याचें मोठें पुस्तक रचलें. सूत्रकार ह्मणजे प्राचीन प्रयोगकारच होत. परंतु त्यांचे प्रयोग सुलभ होते ते टाकून यांनीं नवेच उभे केले. एक पानभर मृतक्रिया सूत्रकारानें लिहिली आहे, त्यांत अंत्येष्टी नांवाचें एवढें मोठें भारूड रचलें कीं, त्यांत प्रायश्चित्ताचे विधि ५० पानें व दान विधि २०० पानें आणि नाना प्रकारचीं श्राद्धें, धेनुदानें, वृषोत्सर्ग इत्यादि

पोरकट विषय सामील केले आहेत. व या प्रकारचीं कर्मे वाढवून कारटे कर्मांतरीं वगैरे यांणीं आपले वृत्तीची वृद्धि केली आहे. गृहस्थ मूढ असल्यामुळें त्यांस काय आहे तें मुळींच समजत नाहीं. व ते शोध न करितां भटजींवर विश्वास ठेवून कावळा शिवला ह्मणजे त्राप गतीस गेला असें मानूं लागले. उंसाची नाव केली ह्मणजे वैतरणी नदी उतरण्यास सुलभ पडेल, शिधासामग्री दिली ह्मणजे जीवास पाथेय, व उदकुंभ मिळेल असें समजूं लागले. तेव्हां असा गोंधळ ज्यांणीं वाढविला तेच कलिपुरुष किंवा त्यांचें ऐकणारे कलिपुरुष होत; वास्तविक पाहिलें तर हें कलियुग यथार्थ धर्मावर पाणी ओतणारे यांणीं उत्पन्न केलें असें दिसतें. धर्माचे ठिकाणची सत्यता जाऊन स्वार्थ उत्पन्न केला. आणि लोकांस बुचाडून भोळे गृहस्थ व हतभागी विधवा यांस फसवून पोट भरावें हा क्रम चालू केला! सूत्राप्रमाणें उपनयन दोन रुपयांत होईल, त्याचा मोठा प्रयोग रचून व लौकिक समारंभ सामील करून मोठें प्रस्थ केलें. तो बोजा लोक डोकीवर घेऊन फिरत असतात, आणि निर्धन होतात. लग्नाचेंही त्याचप्रमाणें ओझें होऊन मुलगी मोठी झाली ह्मणजे तिचें लग्न झालेंच पाहिजे, उपाय नाहीं असें संकट बळेंच डोकीवर दिलें; तें इतकें वाढलें कीं वर पक्ष फारच उद्दाम होऊन त्या त्रासानें लोकांनीं आपल्या कन्या जन्मतांच मारून टाकाव्या हें घोर कर्म कोठेंकोठें स्वीकारिलें आहे. गुप्तरूपानें गर्भपात करावे हें विधवांनीं स्वीकारलें. परंतु धर्माधिकारी ब्राह्मण या दुराचारांचीं मूळें काढून टाकण्यास झटत नाहींत.!!

या कलियुगांत बुद्धिहीनता फार झाली. लोकांस केवळ महानिद्राच लागली आहे असें ह्मटल्यास चालेल. त्यांचा सोसकपणा व उदासीनपणा पराकाष्ठेचा दिसतो. याचें मूळ असें दिसतें कीं, द्रव्यवृद्धि होऊन मदांधपणा आला. आणि ब्रह्मचर्य, गुरुगृहवास, व परदेशगमन यांच्या त्यागानें बलहीनता व ज्ञानहीनता फार वाढली तसतसे सोसकही फार झाले. ऋषि या शब्दाचा अर्थ फिरणारे किंवा गाण

असा होतो. त्यांत ज्यांणीं वेदस्तुत्या रचल्या त्या पुरातन ऋषींस छंद-ऋषि ह्मणतात; यांत वसिष्ट, गौतम, विश्वामित्र इत्यादि येतात. क्षत्रियांतून जे ऋषि झाले त्यांस राजर्षि ह्मणतात; जसे प्रियव्रत, विश्वामित्र, ऋतु-पर्ण, जनक, इत्यादि. भृगु इत्यादिकांस महर्षि ह्मणतात. नारदा-दिकांस देवर्षि ह्मणतात. गोत्राचे मूळ पुरुष यास गोत्र ऋषि असें ह्मणतात असे अनेक प्रकारचे ऋषि, ग्रंथकर्ते व कवि जाहले, परंतु पुढें असें मत निघालें कीं, या ऋषींच्या वंशांतून ऋषित्व गेलें. कात्यायन, वररुचि आणि वात्सायन हे भाऊ असावे. त्यापुढें अलीकडे पंधराशें वर्षांत लोक ह्मणतात कीं, आतां कोणी ऋषि नाहींत. ते या मृत्युलोकांतून गेले. त्यांची वस्ति उठली; परंतु असें ह्मणण्याचें कांहीं दुसरें कारण दिसत नाहीं. आपण मूर्ख झालों इतकेंच कारण खरें; परंतु ही गडबड संस्कृत भाषा बुडण्याचे समई झाली असावी आणि स्त्रिया शूद्र ठरल्या तेंव्हांपा-सून त्यांचा अभ्यास बुडाला. मग मुलास संस्कृत कोण शिकवितो! सर्व कुटुंबें प्राकृत होऊन पुढें कोणी शिकेल तर शिकावें असें ठरलें. घरां-तील संस्कार बुडाला. पुरुषाचें लग्न लौकर होऊं लागलें. त्यांणीं ब्रह्मचर्य व गुरुगृह सोडून दिलें. आईबाप तालेवार होऊन मुलांचे लाड वाढवून लौकर लग्न करून त्यांची संतति पहावी ही इच्छा धरून त्याप्रमाणें वागूं लागले व सर्व पुरुषार्थ काय तो लग्न करण्यांत आणून आईबापांनीं हें मोठें काम आपल्या डोकीवर घेतलें. मुलीचें लग्न तर मुंजीप्रमाणें, तें फारच लौकर करण्याची पद्धत पाडून मुलीस योग्य असा वर कोणता याचा विचार न करितां दोन तीन वर्षांचें अंतर असलें तरी पुरे असें ह्मणून लग्न आटोपून घेतात. मुलीचा बाप तर आतुर असतो त्याणें लौकर लग्न करून ध्या ह्मणून आग्रह करीत असावें. याप्रमाणें त्या मुलाचें ब्रह्मचर्य, विद्या वगैरे सर्व बुडून लौकर लग्न करण्याची चाल पडली. मग अशा विषय संबंधापासून प्रजा इतकी उंची निघाली कीं त्यांस सोसकपणावांचून दुसरा इलाजच राहिला नाहीं. शरीरानें अशक्त असून, संसाराचे पेंचांत पडून, पोराबाळांचें खटलें गळ्यांत घेऊन त्या वेधांत अनेक वेदना सोसून त्यांस राहणें प्राप्त होतें. पुरुषार्थ नाहींसा जाहला. रामचंद्र, अर्जुन, विक्रम असे

पुरुष नाहींसे जाहले. माकड संतति पुष्कळ वाढली. ती जबरदस्त अशा परदेशीय लोकांस जिंकण्यास व मेंढरांसारखी पाळण्यास बहुत उपयोगी जाहली आहे. या कलियुगांत प्राचीन महर्षींच्या आज्ञा तोडण्याचा इतका परिणाम जाहला. राजे व बडेलोक यांची खाण अशी उत्तम निघाली कीं, त्यांतील हिरे ठिकठिकाणीं विराजमान आहेत. त्यांचीं नांवें लौकिक प्रसिद्ध आहेत, ह्मणून त्यांविषयीं कांहीं सांगायास नको. कलियुगांत लोकांनीं देशाबाहेर न जाण्याची शपथ वाहून घरांत बसले. परंतु तेथेंही त्यांस कोणी चैन पडूं दिलें नाहीं. परदेशस्थ त्यांस शोधीत त्यांचे घरांत आले. ते ह्मणूं लागले कीं तुह्मी आह्मांकडे न येण्याची शपथ वाहिली खरी परंतु तुह्मांजवळ द्रव्य आहे तें ऐकून आह्मी तुह्मांजवळ त्याचा तपास करण्याकरितां आलों. कोठें आहे तें दाखवा. मग निद्रेंतून उठून डोळे चोळून पाहतात तों सर्व गराडा पडलेला. मग जें काय जवळ होतें तें देऊन आमचें रक्षण करा असें ह्मणूं लागले. बिगारीपणा कबूल करून सजीव राहिले. पूर्वीं मुसलमानी अमलांत असा ठराव होता कीं शहरांतील ब्राह्मण असतील त्यांणीं ताबूत उचलण्यास यावें. या चालीचा दाखला अद्याप ठिकठिकाणीं आहे. नगरचे देशमुख डोले उचलण्यास जातात आणि ह्मणतात कीं हा आमचे वतनदारीचा मान आहे.

पूर्वीं उद्योगावर लोकांची फार दृष्टी होती. भिक्षा मागणारे अशक्त, दुर्बळ किंवा विद्वान आहेत कीं नाहीं हें पाहत होते. निरुद्योगी लोकांस भिक्षा देत नव्हते. काम घेऊन दान देत असत. ही बुद्धि कलियुगांत नाहींशी झाली. आतां दान करणारे ह्मणतात कीं, काम घेतलें तर तो धर्म कशाचा? ती तर चाकरी झाली. फुकट विनाकारण निरुपयोगानें जें देणें त्याचें नांव दानधर्म असें समजतात; याजमुळें मागें ज्या विद्यादिकांचे आरंभ झाले होते ते तितकेच राहिले. मर्जीप्रमाणें वर्षासन, मर्जीप्रमाणें इनाम राजे देऊं लागले. तेव्हां मेहनत कोणी करावी? शालजोड्या पांघरून दरबारास जावें, राजास नारळ द्यावा आणि आशीर्वाद द्यावा, इतक्यावर धोरण राहिलें. पूर्वीं चरक सुश्रुतादिकांनीं वैद्यक पाहून अनेक वनस्पतींचे गुणपाठ लिहिले; रसायन कल्पना केली; परंतु पुढें त्यांचा तपास कोणी

केला नाहीं. उलट वैद्यांनीं ब्राह्मण ह्मणून कर्मठपणा वाढवून शारीर व शस्त्रविद्या यांचा अभ्यास सोडून दिला. तें ब्राह्मणांचें कर्म नाहीं असें ह्मणूं लागले. बाळंतिणीस शिवलें तरी वैद्यास धर्मशास्त्राप्रमाणें दोष नाहीं. तो त्यांणीं बळेंच आंगावर घेऊन सोंवळें वाढविलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, वैद्यांची हल्लीं एक पैशाची किंमत नाहीं आणि सर्व औषधी उपाय युरोपियन डाक्टरांचे हातीं गेले. याचें कारण आपलें स्वकर्म आपण सोडलें इतकेंच आहे. सर्व विद्येवर पाणी घातलें, तेव्हां लोक डाक्टराकडे जातील यांत नवल काय? आपले राजे प्रजाभक्षक झाले, रयतेस चैन पडूं देईनात; तेव्हां ईश्वरानें परदेशस्थ लोक आणून त्यास सार्वभौम केलें. त्यांचे स्वाधीन रयत झाली व स्वराज्यास कंटाळले यांत नवल काय? पहिले राजे यांणीं अनीति व अधर्म करून झेंडे लाविले, परस्पर लुटूं लागले, पेंढारी उभे करून रयतेस लुटवूं लागले, मोठ्या फौजा ठेवून लोकांस त्रास दिल्हे. शिवाय खानगी रीतीनें लोकांस नाराजी केलें, तेव्हां ईश्वरानें त्यांचे वंशक्षय केले यांत काय आश्चर्य? लोक द्रव्यादिकांचे वृद्धीमुळें मदांध होऊन गेले तेव्हां ईश्वरी संकेतानें या देशास दरिद्र आलें. कारण दरिद्रासारखी दुसरी शाळा नाहीं. दरिद्र जरी कठीण वाटतें तरी दरिद्राचे योगानें लोकांच्या भ्रांति जातात, उद्योगाची इच्छा होते, ज्ञान संपादनाची इच्छा होते, हीं सर्व कार्यें दरिद्राशिवाय घडत नाहींत व दौलतीचे परिणाम त्याचे विरुद्ध आहेत हें आपण या देशांत अद्यापि जे कोणी दौलतदार आहेत त्यांचे वर्तणुकीकडे, त्यांचे ज्ञानाकडे व त्यांचे उद्योगाकडे आणि भोळसरपणाकडे दृष्टी दिली तर चांगलें ध्यानांत येईल. जितक्या शास्त्रांस पूर्वीं महर्षींचे काळीं आरंभ झाला होता, तीं सर्व शास्त्रें पुढें त्यांचे वंशजांनीं मातींत टाकिलीं. ज्योतिष, शिल्प, धनुर्वेद, धर्मशास्त्र इत्यादिक स्वाध्यायांतूनच गेलीं व त्यांच्या ठिकाणीं पोट भरण्याचीं ढोंगें उभीं झालीं. लग्न वगैरे यांस सूत्रांत कोठें मुहूर्त लिहिला नाहीं तो बळेंच लावून घेतला. वैद्यकाचे ठिकाणीं अनुष्ठानें, मंत्रजप, हीं आलीं; शिल्पास उत्तेजन नाहींसें झालें; धनुर्वेद लयास गेला; रिकामे लोक पंडित ह्मणून डौल मारूं लागले. ही ब्राह्मणांची स्थिति दुसऱ्या लोकांनीं पाहून असें मनांत

आणिलें कीं, आपणही या ढोंगांत शिरून पोट भरण्याचें साधन करावें. ह्मणून बावालोक यांणीं भक्तपणाचे वेष काढून त्यांणीं आपली पोळी पिकविली. याहून कलि तो कोणता? साखरेतुपाचा सिधा घेऊन भांग फुंकण्यांत सर्व काळ काढावा आणि साधु ह्मणवावें व आशीर्वादानें कल्याण करण्याचा बाणा राखावा; विद्येनें व ज्ञानानें पाहिलें तर अक्षरशत्रु. लोकांस उपयोग पाहिला तर तिळमात्र नाहीं. सद्गुण, सदाचाराची वार्ता देखील नाहीं, तत्रापि बावा साधु गणले जातात तेव्हां हाच कलि नव्हे काय? आतां एक प्रश्न असा आहे कीं, "यथा राजा तथा प्रजा" परंतु ही चूक दिसते. आधीं प्रजा बिघडते नंतर राजे दुष्ट होतात. प्रजा जर बलाढ्य व जाणती असली तर राजाची दुष्ट होण्याची मगदूर नाहीं कारण कीं राजे सर्वदा प्रजाधीन असतात. परंतु प्रजा सोसक, अज्ञान, दुर्बळ, अशी झाली ह्मणजे राजास निर्भय वाटून मनस्वीपणानें वागतां येतें हेंच सत्य आहे.

कलीमध्यें दुसरें काय झालें त्याचा विचार करतां असें दिसतें कीं, जाती अनेक वाढल्या, चार जाती कर्मभेदानें आहेत असें प्राचीन ग्रंथांत आहे त्या ठिकाणीं हल्लीं चार हजार भेद कसे झाले! याचें कारण इतकेंच दिसतें कीं देशाभिमान जाऊन कुलाभिमान वाढला. आग्रह, अज्ञान, व बुद्धिहीनता इत्यादि वृद्धिंगत होऊन आपसांतील तंटे सुरू झाले. त्यापासून लोकांत द्वेष, भेद, व छल, हे उत्पन्न होऊन लोक कोणत्याही उपयोगीं नाहींत असें झालें. पराक्रमी होण्यास जी एकी लागते ती नाहींशी झाली आणि घरांत एकमेकांचे शत्रु आणि परक्यास अतिशय वश असे झाले. याप्रमाणें अविद्येचा परिणाम जाहला. स्वदेशीय लोकांत भरंवसा ठेवण्यासारखा कोणी कोणास दिसेना. सोनार ब्राह्मणास वाईट ह्मणतात; ब्राह्मण परभूंस; परभु पांचकळशांस; पांचकळशी जिनगरांस; जिनगर कुळंब्यांस वाईट ह्मणतात असे घरचे तंटे फार माजले. सर्व लोक पसंत करतील असा कोणी प्राणी राहिला नाहीं. कारण, कीं ज्यास चांगला निवडावा त्यास कांहीं तरीं जात असेलच आणि ती असली ह्मणजे त्यास अभिमान आलाच. तेव्हां, ज्यास जाती नाहीं ह्मणजे परदेशी असा धनी बरा वाटूं लागला. जातीचा असल्यास उंच नीचपणाचे तंटे सुरू

करून उपद्रव होतो असें सर्वांस वाटतें. याचें प्रमाण पहा, कीं सांगली, अक्कलकोट या ठिकाणीं ब्राह्मण कारभारी असतांना लोकांनीं युरोपियनच असावे असें मागून घेतलें. कारण जातीवाला येईल तर त्याच्या अदावती फार, व अभिमान फार; तें लोकांस सहन होत नाहीं. हें कलियुगांत एक विचित्र दिसून येतें. ज्ञातीचे जुलूम दरएक शहरीं आहेत दक्षिणेंत व गुजराथेंत व इतर ठिकाणीं इतके फाजील आहेत कीं, ज्ञातीचा अधिकारी लोकांस नकोसा होतो, असें बहुत ठिकाणीं पाहण्यांत आलें आहे.

कलीमध्यें भजन हें मुख्य धरलें आहे. यामुळें बहुत लोक भजनास लागले. शास्त्राभ्यास किंवा नवीन ग्रंथ करणें व जुने पाहणें ही सर्व बुद्धि जाऊन कोणी माळा घेऊन, कोणी चाळ बांधून, कोणी वारी करून भक्त होतात. येणेंकरून विद्या बुडाली. विद्या हें परमार्थाचें साधन नव्हे असें ठरलें आणि भजन करणें हें परमार्थाचें साधन असें मत चालविणारे साधु, संत, बावा वगैरे बहुत झाले आहेत तेणेंकरून विद्येचे शोध बुडाले. तसेच वेदांती हे विरक्तपणा दाखवून उदासीनपणानें कांहींच करीत नाहींत. कोणताही उद्योग आपले हिताचा असेल तर करितात; परंतु दुसऱ्याच्या हिताचा उद्योग असला तर तेथें सर्व वेदांत लागू करतात. याजमुळें अशा मताचे पुरुष केवळ स्वार्थी व निरुपयोगी होतात. अपूर्व वेदभाष्य, वेदार्थयत्न, षड्दर्शनचिंतनिका, नवीन पंचांग इत्यादि नवीन ग्रंथ हल्लींचे काळांत चालले आहेत. याजवरून चांगलें चिन्ह दिसतें. कलि ह्मणजे मूर्खपणा व अज्ञान ही हटविण्याचे यत्न चालू आहेत, परंतु लोक त्यास राजी नाहींत. लोकांस अज्ञानच पाहिजे. अशा ग्रंथांस राजादिकांची मदत असावी तशी नाहीं. याजमुळें हे ग्रंथ लौकर बाहेर पडतील असें नाहीं. परंतु, लोकांमध्यें विचार प्रगट झाला याचें हें चिन्ह आहे. आतां या काळीं प्राचीन ग्रंथांतून अथवा युरोपियन लोकांचे ग्रंथांतून विषय घेऊन ते प्रसिद्ध करणें हें फार जरूरीचें काम आहे. परंतु राजे लोक अशा कामांत द्रव्य खर्चीत नाहींत. त्यांचा द्रव्य खरचण्याचा मार्ग वेगळाच आहे. याजमुळें कली हटविण्याचे कामास उत्तेजन असावें तितकें नाहीं. लोक गरीब आहेत त्यांच्यानें होईल तितकें चाललें आहे.

मागील युगापेक्षां कलीयुगांत बौद्धाचे संबंधानें दयाधर्म जास्ती वाढला. अनुसरणी, गवालंभादि क्रूरधर्म रद्द जाहले, लोक सात्विक जाहले खरे, परंतु श्रीमंतांचे मुलांसारखे किंवा खेडेगांवांतील अज्ञान कुणब्याप्रमाणें फसण्यास पात्र झाले अहेत. त्यांचे डोकीवरील पागोटी नेली तरी ते स्वस्थ राहतात. कपाळाला हात लावून कलि झाला, कलि झाला ह्मणतात. मुसलमानांनीं स्वाऱ्या करून मुलतान, लाहोर, कनोज हीं शहरें लुटून नेलीं, तरी हे कोण, कोठून येतात याचा त्यांस ठिकाण नव्हता. परदेशांतील लोकांस म्लेंच्छ म्लेंच्छ ह्मणत व आपणास कर्मकांडामुळें श्रेष्ठ ह्मणत. आर्बस्थानांत पैगंबरानें धर्म चालविला. त्यांणीं इराण घेतलें, काबूल घेतलें, हिंदुस्थानावर येऊं लागले तरी त्यांची बातमी किंवा वर्तमान आपले आर्य लोकांस मिळालें नाहीं. महाभट्टारकाचा (मुसलमानाचा) संचार होऊं लागला इतकें प्राचीन पंडितांनीं लिहिलें आहे परंतु त्यास प्रतिबंध करण्याचा उपाय काय हें कोणी पाहिलें नाहीं. उदासिनता व वेडेपणा फार वाढला कीं आबिसिनियांतून गुलाम धरून आणून त्यास लोक आपलें काम करावयास लावितात त्याप्रमाणें आर्यांची स्थिति जाहाली. जें शहर लुटिलें तेथील लोकांनीं रडावें, शेजारच्यांनीं स्वस्थ बसावें अशी शांतता धरली. एकही आर्य ग्रंथकारानें मुसलमानाचा इतिहास लिहिला नाहीं. हालचाल नाहींशी झाली. हा उदासीनतेचा स्वभाव अद्यापही गेला नाहीं. कोणी भक्त, कोणी वेदांती, कोणी स्वार्थी असे लोक जाहले. देशाचे संबंधानें कळवळा नाहींसा जाहला. ज्ञातीच्या वृद्धीमुळें लोक फुटले. एकमेकांची काळजी सुटली. हा उदासीनपणा सुटण्यास ज्ञानवृद्धि बहुत जाहली पाहिजे. जेथें इंग्रजी राज्य आहे तेथें मात्र ज्ञानवृद्धि होण्यास आरंभ जाहला आहे. स्वदेशीय संस्थानें तशींच मागें पडलीं आहेत. स्वधर्म ह्मणूनच विद्यावृद्धि करावी हा धर्म ब्राह्मणांनीं सोडला. ते असें ह्मणतात कीं आह्मांस पोटास देणार कोण आहे? आह्मांस हजारो रुपये देणारा भेटेल तर आह्मी मेहनत करूं. असें ह्मणून ह्मणून आज पंधराशें वर्षें हिंदुस्थानची लेखणी बंद जाहली. मेहनत करणारे काय ते हेमाद्रि, माधव इत्यादि प्रयोगकार. परंतु त्यांणीं ज्ञानवृद्धि न करितां उलटी अज्ञानवृद्धि करून निरुपयोगी ग्रंथ वाढविले.

मागील युगापेक्षां कलींत नवीन काय जाहलें याचा विचार केला असतां असें दिसतें कीं अज्ञान वाढून लोकांमध्यें रीतिभाती वाईट पडल्या, ऐक्यता नाहींशी झाली, तंटे वाढले, अध्ययनक्रम बुडाला, बायकांवर जुलूम वाढला, सर्व शास्त्रविद्येची हयगय झाली. ढोंग, सोंवळें, कर्मठपणा, व नीचपणा वाढला, सद्धर्मास ग्लानी आली, सत्य गेलें. आर्जवी लोक, डोळ्यांत माती टाकणारे पुष्कळ झाले असा प्रकार दिसतो. आतां अशा काळीं आपला प्रयत्न काय असावा हेंही जाणलें पाहिजे. मागील ग्रंथकार तर असेंच धरून बसले आहेत कीं, यास कांहीं उपाय नाहीं; हें व्हाव-याचेंच. लोक वाईट स्थितींत जावयाचेच असें लिहून स्वस्थ बसले आहेत. परंतु असें रडत बसल्यानें कली हटेल असें नाहीं व तो अजिंक्य आहे हें ह्मणणेंही केवळ अधैर्याचें आहे. आपण सर्वांनीं असें लक्षांत धरलें पाहिजे कीं, असत्य, अधर्म, ढोंगीपणा, विद्याहीनता, बुद्धिहीनता, बलहीनता हीं सर्व हटण्याजोगीं आहेत व याजविषयीं प्रयत्न करणें उचित आहे. आपली भ्रांति आपण टाकून जागृत होऊं, तर दुसऱ्यास जागृत करूं आणि सत्याची व विद्येची वृद्धी करतां येईल. अनेक कालांचा हा कलंक धुवून टाकतां येईल आणि सत्ययुग ह्मणजे आपली चांगली स्थिति आपणास पुनरपि ईश्वरकृपेनें प्राप्त करून घेतां येईल अशी उमेद धरावी आणि प्रयत्नास मागें पाडूं नये. काळेंकरून या देशांतील राजे व बडेलोक हल्लीं वाईट स्थितींत आहेत तेही बरे होतील आणि त्यांकडून आपल्यास पाहिजे ती मदत मिळेल. आणि ईश्वराचे आशीर्वादानें हें महत्कृत्य सिद्धीस जाईल असें लक्षून सर्वांनीं चालावें. हें सार सर्वांपुढें ठेविलें आहे.

लोकहितवादी.

समाप्त.

१९०

# जातिभेदविचार.

भाग पहिला व दुसरा.

ज्ञानदीप मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेले निबंध

एकत्र करून

मुंबईत

इंडियन प्रिंटिंग प्रेसांत छापले.

किंमत एक आणा.

लहान मुलांकरितां अनुभविक

# गंजिफा.

भाग पहिला. किंमत २ आणे.

भाग दुसरा. किंमत ३ आणे.

ह्या गंजिफांच्या साहाय्यानें लहान मुलांस हंसत खेळत शिकवितां येतें. मुंबई येथें गिरगांव रस्त्यावर हितोपदेशक कामगार हपिसांत मिळतील.

१८०-
10-11-64

# जातिभेदविचार.

## भाग पहिला.

१. उपोद्घात, २ या विषयाची विशेष वादग्रस्तता व तिचीं कारणें. ३ विषयाचे विभाग. नैसर्गिक आणि कृत्रिम भेद. ४ नैसर्गिक भेद. ५ कृत्रिम भेद. ६ वर्णव्यवस्था. ७ तिची योग्यता. ८ तिची आज स्थिति. सर्व अव्यवस्था.

१ धर्म विषयांत मूर्तिपूजा हा एक जसा विशेष वादग्रस्त विषय आहे, तसाच प्रस्तुत विषय आहे. किंबहुना त्याच्याहीपेक्षां हा विशेष खडतर आहे. धर्मसुधारकांच्या व सामाजिक सुधारकांच्या मार्गामध्यें हा एक मोठाच पर्वत आडवा पडल्यासारखा आहे. त्याचें युक्तीनेंच उल्लंघन केल्याशिवाय पलीकडे जातां येण्यासारखें नाहीं. मूर्तिपूजेच्या विषयाचें नुकतेंच आम्हीं विवेचन केलें आहे. आज या विषयास आरंभ करीत आहों. प्रथम हा विषय एकाच निबंधांत संपवावा असा विचार होता व त्याच बेतानें आम्हीं त्याच्या विवेचनाच्या मर्यादा ठरवून बहुतेक निबंध लिहून पुराही करीत आणला होता, पण केलेलें विवेचन अपुरतें किंवा संकोचित वाटून तो निबंध एका बाजूस ठेवून त्यांतील मुद्यांचें विशेष विस्तारानें विवेचन करावें असें योजून आज हा प्रथम भाग देत आहों.

२. हा विषय एवढा वादग्रस्त होण्याचें कारण तो मूळचाच एवढा कठीण आहे असें नाहीं. पण त्याविषयीं लोकांच्या मनांत ज्या कल्पना भरलेल्या आहेत त्यांमुळें विषयास नसतें काठिण्य आलें आहे. एवढ्या गोष्टींत मूर्तिपूजेच्या विषयाचें याशीं विशेष साम्य आहे. देव सर्वत्र आहे, पण तो चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं ही गोष्ट सर्व कबूल करतात. तो चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं याचें कारण तो निराकार आहे. निराकार आहे तर मग त्याला साकार हें मिथ्या रूप देऊन साकारोपासनेचा मिथ्या मार्ग कां घालावा? ईश्वर जर चर्मचक्षूंस गोचर नसून ज्ञानचक्षूंनींच दृश्य आहे, तर मग त्याची उपासनाही मनानेंच करावी हें उघड आहे. पण अशा दृष्टीनें जरी हा विषय सोपा दिसतो तरी अवतारांची कल्पना व अज्ञानाकरितां दृश्य साधनांची मानलेली अवश्यकता या गोष्टी मध्यें येऊन जसा मूर्तिपूजेचा विषय वादग्रस्त झाला आहे, तसाच हा जाति-

भेदाचा विषय वास्तविक सुलभ असतां त्याला दुसऱ्या गोष्टी मिळून त्याच्या वादाला विशेष काठिण्य आलें आहे. आज एका मनुष्यानें दुसऱ्या बरोबर रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करण्या न करण्याविषयीं केवढा कटाक्ष लोकांत आहे ही गोष्ट आमच्या लोकांस सांगावयास नको. जर हा कटाक्ष नसता तर पुण्याच्या चहाप्रकरणांत मोठमोठ्यांस आपल्या वर्तनाविषयीं टीका करून कां घ्यावी लागती? तसेंच हा कटाक्ष नसता तर दिवाण बहादूर रघुनाथरावासारख्यांस मी माझ्या जवळच्या आप्तांशींही अन्नव्यवहार करीत नाहीं असें प्रतिष्ठेनें सांगून पुनर्विवाहाशीं संबंध असलेल्या मंडळीशीं किंवा पुनर्विवाहित दंपतीशीं अन्नव्यवहार करण्याची गोष्ट कशी टाळतां येती?* अमक्याशीं मी अन्नव्यवहार करीत नाहीं असें म्हणण्यांत आमच्या लोकांस मोठी प्रतिष्ठा वाटते. ज्यांशीं अन्नव्यवहार करीत नाहीं त्यांच्यापेक्षां आपण श्रेष्ठ, असें लोक दाखवितात.

३. या विषयाच्या विचाराचे आम्ही प्रथम दोन भाग करितों. पहिला भाग हा कीं मनुष्यांची जाति सर्व पृथ्वीवर निसर्गतः पाहिल्यास एकच आहे किंवा भिन्न आहेत. दुसरा विभाग असा कीं जरी जाति निसर्गतः एकच असली तरी तिचे कांहीं विभाग करणें अवश्य आहे कीं काय?

४. पहिल्या विभागाच्या संबंधानें असा विचार केला पाहिजे कीं, सर्व पृथ्वीवरील मनुष्यांत नैसर्गिक भेद किती आहे व नैसर्गिक ऐक्य किती

---

* दिवाण बहादुरांनीं सांगितलेली गोष्ट म्हणजे खरोखर या भेदासच अनुसरून असेल असें मुळींच म्हणवत नाहीं. वरील आप्तांविषयीं वेळेस अन्य कारणांनीं मन शुद्ध नसल्यामुळें त्यांच्याशीं अन्नव्यवहार बंद केला असेल व तो पुनर्विवाहपक्षाच्या मंडळींबरोबर अन्नव्यवहार केल्यानें येणारी जातीची अडचण टाळण्याकरितां पुढें पुराव्यास आणला असेल, हाच विशेष संभवनीय प्रकार दिसतो. दिवाण बहादुरांनीं या व बंगाल प्रांतीं त्यांच्या वैष्णव पंथांतील नाहींत अशा लोकांशीं अन्नव्यवहार केल्याचें पत्रया आधारावरून कळलें आहे. यावरून तर आमचें वरचें अनुमान अधिक दृढ होतें. पण असली सबब तरी सांगितली असतां शोभेल असें वाटण्यास आधार लोकांत असलेला एकानें दुसऱ्याबरोबर अन्नव्यवहार करणें न करणें याविषयीं अमर्याद कटाक्षच होय. आमच्या इकडे हा कटाक्ष जितका आहे त्यापेक्षां मद्रास इलाख्यांत तो फार आहे. यामुळें बोलक्या सुधारकांस असल्या सबबीवर निसटून जाण्यास तिकडे विशेष सोयीचें आहे.

आहे. नैसर्गिक भेद पाहिल्यास शरिराच्या वर्णांत, अवयवांच्या ठेवणींत, डोळ्यांच्या रंगांत, केसांच्या स्वरूपांत वगैरे भेद आहेत. पृथ्वीवरील चारी खंडांतील मनुष्यांचीं स्वरूपें पाहिलीं ह्मणजे हा भेद सहज लक्षांत येतो. तसाच स्त्रिया व पुरुष हा एक भेद स्पष्टच आहे. पण बाह्यतः दिसणारा किंवा प्रत्यक्ष शारिरिक असा भेद दिसला तरी मनुष्यांतील जें मनुष्यपण त्यांत कांहीं भेद आहे कीं काय हें पाहिल्यास मनुष्यांतील मुख्य भाग जें मन त्याच्या गुणांत नैसर्गिक भेद मुळींच दिसत नाहीं. कोणाची मानसिक शक्ति विशेष विकास पावलेली तर कोणाची बाल्यावस्थेंत, पण तिची जाति अगदीं एक. आज सर्व पृथ्वीवरील मनुष्यें मिळून कित्येक गोष्टींची चर्चा करीत आहेत, एकमेकांचे विचार एकमेकांस मान्य होत आहेत, याला मनुष्यांतील मानसिक ऐक्याचाच आधार होय. नाहीं तर अमेरिकन, इंग्लिश, चिनी, इजिप्शिअन इत्यादि लोकांचे विचार परस्परांस समजलेच नसते, किंवा ते त्यांस कधींच मान्य झाले नसते. आज जरी अनेक गोष्टींत मतभेद आहेत, तरी ते घालवून सर्वांचें ऐक्य करण्याकडे जगाचा कल आहे. मनुष्याला जें सत्य वाटतें तें तें जगापुढें आणीत आहे व प्रत्येक मनुष्याला तें समजल्याबरोबर तें तें ग्रहण करीत आहे. पुष्कळ गोष्टींतील मतभेद जाऊन त्या बाबतींत ऐक्य झालें आहे व असाच क्रम सतत चालू राहील. केव्हांही येवो, पण एक दिवस असा खचित येणार आहे कीं आज मितीस असलेले मतभेद सर्व नाशिसे होऊन त्या सर्वांत सर्व मनुष्यांचें ऐक्य होणार आहे. वादाच्या नव्या गोष्टी उत्पन्न होतील, त्यांत वेळेस भेद होईल, पण जुने भेद केव्हांना केव्हां तरी जावयाचे, नवे उत्पन्न व्हावयाचे, ते जावयाचे त्यांच्या ठिकाणीं दुसरे यावयाचे, असा क्रम चालत राहील. तरी एकंदर मानसिक व्यापारांचा कल ऐक्याकडे आहे; भेदाकडे नाहीं. या सर्वांस आधार मनुष्यजातीची नैसर्गिक समानता. जर ही समानता नसती व निरनिराळ्या वर्गांची परस्परांहून अगदीं भिन्न मनुष्यें असतीं तर तीं परस्परांहून अगदीं तुटक रहातीं. त्यांचें ऐक्य कधींच शक्य झालें नसतें. व्याघ्र, सिंह, हत्ती, घोडे, गाई, ह्मशी, वगैरे जनावरांचा जसा परस्परांशीं व आह्मां मनुष्यांशीं संबंध स्वभावतः मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल, तसाच निरनिराळ्या वर्गांतील मनुष्यांचाही परस्परांशीं न रहाता.

९. सर्व मनुष्य जातींत सृष्टिकर्त्यानें असें ऐक्य ठेविलें असतां आज जे

परस्परांत अनेक भेद आहेत ते कां हें पाहिल्यास मनुष्यांच्या अज्ञानाशिवाय दुसरें कारण नाहीं. पहिलें अज्ञान एकमेकांविषयीं मुळीं कांहीं काळ माहितीच नसणें हें. पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांत मनुष्यवस्ती असतां कांहीं काळपर्यंत एकमेकांची एकमेकांस मुळीं माहितीच नव्हती. माहिती झाल्यावर दुसरें अज्ञान परस्परांच्या भाषेचें. पण ह्या गोष्टी चिरकालीन टिकणाऱ्या नव्हेत. मानसिक शक्तीच्या ऐक्याच्या आधारावर ह्या दूर होतात. भिन्न भाषा बोलणारीं मनुष्येंही एकमेकांशीं कांहीं काळानें बोलूं लागतात. मग पुढची अडचण एकमेकांच्या रितीभातींतील व समजुतींतील भेदांची येते. पण कालांतरानें हेही भेद नाहींसे होतात. आज मनुष्यां मनुष्यांमधील भेद मोजल्यास ते सहस्रावधी होतील. पण या सर्वांस कारण कांहीं तरी अज्ञान आहे. धर्मसंबंधानें अनेक भेद आहेत, पण ते सर्व अज्ञानमूलक. जर परमेश्वर एक आहे व त्याणें उत्पन्न केलेली मनुष्यजाति एक आहे, तर ईश्वराचा व मनुष्यांचा संबंधही एकच असावयाचा. पण अज्ञानामुळें देवाविषयीं अनेक भिन्न भिन्न कल्पना व त्या देवांच्या उपासनेविषयीं अनेक भिन्न भिन्न कल्पना तशाच धर्माच्या पर्यवसानाविषयींही निरनिराळ्या कल्पना झाल्या आहेत व यामुळें मनुष्यांनीं परस्परांवर प्रेम करावयाचें व ऐक्यानें रहावयाचें बाजूस राहून कित्येक भिन्न भिन्न धर्माचीं मनुष्यें तर एकमेकांचीं पक्कीं शत्रु झालीं आहेत. मुसलमानांनीं हिंदूंस काफर ह्मणावें, व हिंदूंनीं मुसलमानांस अविंध, शिखानष्ट, नोंडगे, लांडे, असे शब्द तिरस्कारानें योजावे. वास्तविक पाहिलें तर आज हिंदु, मुसलमान, खिस्ती, यहुदी, बौद्ध या सर्वांनीं परस्परांपासून शिकावयास पाहिजे आहे. सगळ्यांच्या पाशीं कांहीं ना कांहीं धर्माचें सत्य आहे, त्याचप्रमाणें सगळ्यांच्या पदरीं कांहीं ना कांहीं दोष आहेत. पण इकडे दृष्टि न देतां आपल्याच अभिमानांत प्रत्येक धर्माचे लोक राहून इतरांचा व्यर्थ द्वेष करीत आहेत, यामुळें मनुष्यजातीचे असे तुकडे तुकडे होऊन गेले आहेत. जसे निरनिराळ्या धर्मांनीं भेद केले आहेत, तसे एकेका धर्माच्या पंथांनीं आपआपल्यांत पोटभेद व पोटभेदांचे आणखी पोटभेद व त्यांचे आणखी पोटभेद असे अनेक तुकडे करून टाकले आहेत.

६. एकमेकांच्या एकमेकांविषयीं अज्ञानामुळें जे भेद झाले आहेत ते योग्य

नसले तरी कांहीं विशेष हेतुस्तव मनुष्यांत भेद करणें अवश्य आहे कीं नाहीं हा एक विचार आमच्या देशाच्या संबंधानें विशेष विचार करण्यासारखा आहे. आज जे आमच्यांत जातिभेद आहेत त्यांची प्रस्तुत स्थिति कशीही असली तरी त्यांचें मूळ पाहिल्यास त्यांत कांहीं एक व्यवस्था आहे. तिचा विचार अवश्य केला पाहिजे.

आज जे आमच्यांत जातिभेद आहेत त्यांचें मूळ आमच्या प्राचीन वर्णव्यवस्थेंत आहे. ही कोणत्या काळीं झाली हें पहिल्यास ती फार प्राचीन आहे असें दिसतें. मनुष्यांचे त्यांच्या गुणकर्माप्रमाणें वर्ग करून त्यांस वर्ण अशी संज्ञा दिली आहे. वर्ण याचा अर्थ रंग असा आहे. पण जे प्राचीन काळीं आमच्या लोकांचे चार वर्ण मानिले होते त्या वर्णांचे लोक निरनिराळ्या रंगांचे होते असें आज खात्रीनें ह्मणतां येत नाहीं. ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण ऋग्वेदांत आढळतात. पण प्रथम जे आर्य लोक या देशांत वायव्य प्रांतांतून आले त्यांचे तीनच वर्ण होते. आर्य लोक आपल्यास त्रैवर्णिक असें ह्मणत असत. रंगांचा भेद ह्मटला तर मूळचे आर्य व या देशांतील जे मूळचे रहाणारे लोक त्यांच्यांत होता खरा. आर्य हे गोरे होते व इकडील लोक काळे होते. इकडील लोकांचा व आर्यांचा प्रथम स्नेहभाव मुळींच नव्हता. उलट शत्रुभाव होता. कालांतरानें कांहीं इकडील लोक आर्यांच्या वर्णव्यवस्थेंत शिरले, ते सर्व वर्णांत गेले. आज द्रावीड देशांत जे ब्राह्मण आहेत, त्यांच्या वर्णावरून व द्रावीडी भाषेवरून त्यांचा आर्यांशीं प्रथम कांहीं संबंध नसावा असें स्पष्ट दिसतें. पण आज मितीस द्रावीड ब्राह्मण अगदीं कडकडीत ब्राह्मणांत मोडत आहेत. वेदोच्चारही त्यांचे अधिक स्पष्ट व शुद्ध असे आढळतात. असो. आपल्या प्रकृत विषयाशीं या गोष्टीचा संबंध नाहीं. मूळचे तीन वर्ण असोत कीं चार असोत, त्यांची उत्पत्ति वेदांच्या काळापासून आहे. पुरुषसूक्तांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र या चार वर्णांची परमेश्वराचें मुख बाहू, मांड्या, व पाय यांशीं अलंकारिक भाषेनें तुलना केली आहे. परमेश्वराच्या या चार स्थानापासून हे चार वर्ण झाले असेंही कोणी मानतात. पुढें भगवद्गीतेंत चार वर्णांचाच उल्लेख आहे. **चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः** ह्मणजे गुणकर्माच्या विभागाप्रमाणें मी ( ह्मणजे परमेश्वरानें ) चार वर्ण केले असें चवथ्या अध्यायांत ह्मटलें आहे. पुढें दुसऱ्या

ठिकाणीं चार वर्णांचीं लक्षणें व क्रिया दिल्या आहेत. या जुन्या व्यवस्थे-प्रमाणें चार वर्णांबाहेरचे सर्व लोक नीच मानिले असून त्यांना अति शूद्र, चांडाल, म्लेच्छ असें ह्मटलें आहे. एतद्देशीय मूळचे लोक ते अतिशूद्र, चांडाळ, यांत, व मुसलमान, यहुदी, पारशी, ख्रिश्चन हे सगळे म्लेच्छांत गणले आहेत. या व्यवस्थेंत एका दृष्टीनें फार कोतेपणा दिसतो, पण त्या काळीं मनुष्यांचा परस्पर व्यवहार फार कमी होता. शिवाय त्यांच्या धर्मदृष्टीनें यवनादि सर्व लोक धर्मबाह्य असें वाटून त्यांच्याविषयीं असा उणेपणा मनांत आला असावा.

७. या वर्णव्यवस्थेचा विचार करतां तींत मनुष्यांच्या व्यवहारांचें वर्गीकरण चांगलें केलेलें दिसतें. भगवद्गीतेंत चारी वर्णांचीं कर्मे पुढें दिल्याप्रमाणें सांगितलीं आहेत.

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥
अ. १८ श्लो. ४२.

अर्थ.–मनाची स्वाधीनता, शरिराची स्वाधीनता, तप, शुचिर्भूतपणा, क्षमा, सरळपणा, सामान्य ज्ञान, शास्त्रीय ज्ञान आणि परमेश्वराविषयीं आस्तिक बुद्धि हीं ब्राह्मणाचीं कर्मे होत.

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥
अ. १८, ४३.

अर्थ.–शौर्य, तेज, धैर्य, दक्षता, युद्धांतून पळून न येणें, दानबुद्धि आणि सामर्थ्य हीं क्षत्रियांचीं कर्मे होत.

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ॥
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥
अ. १८, ४४

अर्थ.–शेतकी, गुरें पाळणें, व्यापार, हीं वैश्याचीं कर्मे होत. परिचर्या ह्मणजे सेवा करणें हें शूद्राचें कर्म होय.

गुणकर्मानुरूप वर्ग करून ज्याची ज्या वर्गांत जाण्याची योग्यता असेल त्याला त्या वर्गांत जाण्याची मोकळीक ठेविल्यावर या व्यवस्थेस नांवें ठेवण्यास जागा नाहीं. या चार वर्णांनीं परस्परांशीं व्यवहार कसे ठेवावे

या विषयींची व्यवस्था पाहिली तर तीही योग्य होती. खालच्या वर्गानें तितकी योग्यता संपादून वरच्या वर्गांत जावें असा हेतु दिसत होता. यांत प्रत्येकास आपल्या सुधारणेस मार्ग होता. अन्नव्यवहार पाहिला तर ब्राह्मण खालच्या तिन्ही वर्णांच्या हातचें अन्न खात होते. विवाहसंबंधही परस्परांत अगदीं बंद होता असें नाहीं. खालच्या वर्णाची मुलगी वरच्या वर्णानें करण्यास विशेष हरकत नव्हती. वरच्या वर्णांतील मुलगी खालच्या वर्णांत देणें मात्र गौण मानीत होते. या व्यवस्थेंत शहाणपणच होतें. वरच्या वर्गांत मुलगी देण्यानें तिची उन्नति होत होती व खालच्या वर्णांत दिल्यानें अवनति होत होती.

८. पण आज मितीस ही वर्ण व्यवस्था कायम आहे कीं काय हें पाहूं गेल्यास व्यवस्थेचा मुळींच पत्ता नाहीं. अव्यवस्था मात्र मूर्तिमंत जिकडे तिकडे उभी आहे. मूळच्या व्यवस्थेप्रमाणें पहातां आज तिच्यातलें काय शिलक राहिलें आहे? ब्राह्मणांचीं जीं कर्में सांगितलीं आहेत तीं बरोबर आचरीत असलेले ब्राह्मण आज किती सांपडतील? आज आपल्यास ब्राह्मण ह्मणविणारे किती लोक इतर वर्णांचे धंदे करीत आहेत? त्यांना त्या धंद्यानुसार कोण त्या त्या वर्णाचें मानीत आहे? आज क्षत्रिय वर्णाचें काम करणारे फारच थोडे लोक आहेत. सध्या व्यवसाय पाहिला तर वैश्य व शूद्र या दोनच वर्णांचे राहिले आहेत. आज पुष्कळ ब्राह्मण वैश्यांचा धंदा करीत आहेत. शूद्रांचा जो सेवाधर्म त्यांतही पुष्कळ ब्राह्मण आहेत. पण त्यांना त्यांच्या धंद्याप्रमाणें वैश्य किंवा शूद्र कोण मानीत आहे? मूळचे जे एकदा ब्राह्मण बनले ते बनले. शट्शास्त्रीही ब्राह्मण, वैदिकही ब्राह्मण व स्वयपाक्या किंवा धोत्रेंबडव्याही ब्राह्मणच! स्वयपाकाचा ब्राह्मण, पाण्याचा ब्राह्मण, खटपटचा ब्राह्मण, या शब्दांत जो ब्राह्मण शब्दाचा अर्थ आहे त्याचा व भगवद्गीतेंतील ब्राह्मण शब्दाची जी योग्यता वर दिली आहे तिच्याशीं संबंध पाहिल्यास कांहीं तरी आहे काय? हल्लींचा ब्राह्मणपणा गुणावर मुळींच नसून फक्त नांवाचा ब्राह्मणपणा आहे. केवळ ब्राह्मणपणा वंशपरंपरेवर अवलंबून आहे. पण नुसत्या वंशपरंपरेनें योग्यता किती येते हें पाहिलें तर उघडच दिसतें. शास्त्रीबोवांचा किंवा वैद्यबोवांचा मुलगा अध्ययन करो न करो शास्त्री किंवा वैद्य होऊं शकत नाहीं. जर त्यांच्या अक्षरशत्रु मुलाला कोणी

शास्त्रीबोवा किंवा वैद्यबोवा ह्मटलें तर हे मानाचे शब्द केवळ उपहासास्पद दिसतील. अशा मनुष्यांस असा मान देणाऱ्यांससुद्धां गाजरपारख्यांत काढलें जाईल. पण आज ब्राह्मण ह्मणविणाऱ्या बहुतेक लोकांची अशीच उपहासास्पद स्थिति आहे. ब्राह्मणाचे गुण काय सांगितले आहेत यांचें भान सुद्धां ब्राह्मणांस व त्यांनां ब्राह्मण ह्मणणारांस नाहीं. जसा अपात्रीं ब्राह्मणत्वाचा मान हल्लीं दिला जात आहे तसाच त्या मानास योग्य असणाऱ्या लोकांसही तो मान दिला न जाऊन अन्याय होत आहे. आज ज्या जातींस क्षत्रीय, वैश्य, किंवा शूद्र मानिलें जातें, त्यांत ब्राह्मणांचे गुण ज्यांच्या ठिकाणीं आहेत असे पुरुष निपजतात. पण त्यांना कोण ब्राह्मण समजतो? ते ज्या वर्णांत जन्मले त्याच वर्णांत त्यांस गणिलें जातें. तात्पर्य जुनी जी वर्णव्यवस्था केलेली होती ती आज सर्वथा लयास गेली आहे ह्मटलें तरी चालेल. सध्या स्थिति पाहिली तर व्यवस्थेच्या ठिकाणीं सर्व अव्यवस्था माजली आहे.

---

## जातिभेदविचार.

### भाग दुसरा.

१ या अव्यवस्थित जातिभेदाचा परिणाम. २ अव्यवस्था मोडून व्यवस्था करण्याची अवश्यकता. ३ ही व्यवस्था करण्याचा सरळ मार्ग.

१. ह्या अव्यवस्थेचा परिणाम काय झाला आहे हें विचार करून पाहिल्यास तो फारच अनिष्ट झाला आहे. शरिराच्या रक्षणार्थ जें वस्त्र करावयाचें त्याच्या फाडून फाडून जर चिंध्या केल्या तर त्यांनीं शरीराचें आच्छादन कितपत होईल हें सांगावयास नको. शरिराच्या आच्छादनास त्याचा उपयोग व्हावयाचा तो एकीकडे राहून चिंध्या पांघरणारा वेड्यांत जमा होऊन पोरें मात्र हुर्यो करीत मागें लागावयाचीं! आमच्या देशांतील मनुष्यजातीच्या अशा अव्यवस्थित चिंध्या झाल्यानें आमचें अतिशय नुकसान झालें आहे. आह्मीं त्याच चिंध्यांत लोळत आहों, यामुळें जग आह्मांस वेडे समजून हसत आहे. मूळच्या चार वर्णांत उद्योगाच्या दृष्टीनें भेद असून मनुष्यांचा जो एरवींचा परस्पर संबंध त्यांत ऐक्य होतें. यामुळें शरिराचे अवयव निरनिराळे असले व त्यांचीं कामें निरनिराळीं असलीं तरी आपण एका शरिराचेच अवयव

आहेत हें ध्यानांत धरून कोणी कोणाचा द्वेष, मत्सर किंवा हयगय न करितां वागतात, ह्मणून आपल्या शरिराचे व्यापार ठीक चालतात. पण आह्मा मनुष्यांचे जे भेद झाले आहेत त्यांत उद्योगाचें कारण एका बाजूस राहून कांहीं कारण नसतां व्यर्थ भेद झाले आहेत, ह्मणून त्यांपासून ऐक्य विघडून गेलें आहे. दोन डोळे एका वस्तूकडे एकदम पाहूं लागले तर त्या वस्तूचे जेवढे भाग दिसतात तेवढे एका डोळ्यानें पाहून दिसतनाहींत. पण एकाच डोळ्याचे आणखी तुकडे करून त्याणें पाहिलें तर जितकें दिसेल तसाच प्रकार हल्लींच्या जातींनीं ऐक्याचा केला आहे! धंद्यावरून भेद मानले तर आज देशांत जितके धंदे आहेत त्यांच्या सहस्रपट जाती आहेत. त्या कोणत्या तत्त्वावर झाल्या ह्मणून पाहिलें तर अज्ञानाच्या तत्वाशिवाय दुसरें तत्व सांपडणार नाहीं. मात्र हें अज्ञान लोकांच्या अंगीं अगदीं खिळल्यासारखें झालें आहे. जी गोष्ट बोलल्याबद्दल विचारी मनुष्याला लाज वाटावी, ती लोक आज प्रतिष्ठेनें सांगत आहेत. याला दृष्टांत पाहिल्यास शेकडों आहेत. कारण सर्वच देशभर मनुष्यमनुष्यांमध्यें भेद पाडणारें हें जातीचें बंड माजलेलें आहे. उत्तर हिंदुस्थानांत "तीन पुरभय्ये व चार चौके" अशी ह्मण आहे. ह्मणजे तीन माणसांत चार जाति अशी आमची स्थिति आहे! मद्रासेकडेही तिची अशीच स्थिति आहे. रामानुजपंथी वैष्णव इतर लोकांना आपलें अन्न पाहूं देखील द्यावयाचे नाहींत. एखाद्या अन्य पंथाच्या ब्राह्मणाच्या घरीं पाहुणे गेले तर त्याच्या घरचा शिधा घेऊन स्वतः पडद्या आड स्वयपाक करून जेऊन बाहेर यावयाचे! प्रत्यक्ष आपल्या अन्नदात्या ब्राह्मण यजमानालाही आपलें अन्न पाहूं द्यावयाचे नाहींत! या मानवजातीच्या परस्परामधील द्विधा भावाची अविचारजन्य मर्यादा वाढवून याच विषयावरील निबंधाच्या पहिल्या भागांत सांगितलेलें दिवाण बहादुरांनीं प्रत्यक्ष चुलत भावाशीं व पुतणीशीं अन्नव्यवहार न करण्याचें अलौकिक बंधुप्रेमाचें उदाहरण मोठ्या डौलानें ह्मणा, किंवा मनलज्जेला समूळ घालवून देऊन ह्मणा, जगापुढें आणलें आहे! पण या सर्व भेदास योग्य कारण पाहूं गेल्यास कांहीं एक नाहीं. दिवाणबहादुराचे चुलत बंधु सर माधवराव हे कांहीं निंद्य आचरणानें भ्रष्ट झाले होते किंवा असें कांहीं दुसरें योग्य कारण घडलें होतें असें नाहीं. केवळ भेदाकरितांच भेद केलेला! दिवाणबहादुरां-

सारखे जे देशस्थ ब्राह्मण मद्रास इलाक्यांत मर्गे तंजावरास मराठ्यांची गादी स्थापन होते वेळीं गेले ते निरनिराळ्या प्रांतांत पसरले. ते महाराष्ट्रांत असतां परस्परांशीं अन्नव्यवहार व विवाहव्यवहार करीत होते, पण तेच आज त्या प्रांतीं परस्परांशीं हे व्यवहार करीत नाहींत! कुंभकोनम कालेजांतील प्रोफसर गोपाळराव यांनीं एक वेळ आपल्या हाताखालीं शिकलेल्या पदवीवाल्या देशस्थ ब्राह्मणांची सभा बोलावून तिच्यापुढें हा भेद काढून टाकण्याविषयीं सूचना आणली. ह्यांच्याविषयीं सर्व शिष्यांची फार पूज्यबुद्धि होती, तिच्या आधारावर आपले शिष्य, ही शास्त्रसंमत पण थोड्या दिवसांच्या अंधरूढीविरुद्ध असलेली गोष्ट कबूल करतील अशी त्यांस आशा होती, पण ती व्यर्थ झाली! एका जातीच्या लोकांशीं समान व्यवहार ठेवण्या इतकें धैर्य आपणांत नाहीं असें शिष्यमंडळीनीं गुरुजींस सांगितलें व आपण शिकविलेल्या विद्येचा परिणाम शिष्यांवर कसा काय झाला हें त्यांच्या चांगलें अनुभवास आणून दिलें! ही गोष्ट त्यांच्याच एका ह्मैसूर संस्थानांत मोठ्या हुद्यावर असलेल्या विद्वान शिष्यानें त्यांची सामाजिक सुधारणेविषयीं मतें काय आहेत असें आह्मीं सहज विचारिल्यावरून,आह्मांस सांगितली. त्यांचीं सामाजिक सुधारणेबद्दल मतें आह्मीं विचारल्यावरून त्यांणीं आह्मांस वरील गोष्ट सांगून "आमचें मानसिक धैर्य या वस्तुलाचें आहे, तेव्हां आमच्या कोरड्या मतांस ऐकून काय करणार" असें मोठ्या खेदानें ते ह्मणाले. गुजराथेंत नागर ब्राह्मणांत जे वडनगरे, साठोद्रे वगैरे भेद झाले आहेत त्यांचेंही मूळ असलेंच अज्ञानमूलक आहे. महाराष्ट्र ब्राह्मणांत देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे असे जे भेद आहेत तेही अज्ञानाशिवाय किंवा अंधरूढीशिवाय दुसऱ्या कोणत्याही आधारावर झालेले नाहींत. असेच भेद क्षत्रिय क्षत्रियांत, वैश्यवैश्यांत व शूद्रशूद्रांत झाले आहेत. महार, मांग, वगैरे अति शूद्र मानलेल्या लोकांतही अनेक उच्चनीच भेद आहेत! यांचा परिणाम परस्परांत द्वेष, मत्सर व परस्परांचा नाश हा झाला आहे. शाळेंतील वर्गाप्रमाणें मनुष्यांचे ब्राह्मण क्षत्रियादि वर्ग करून ज्याला ज्या वर्गांत जाण्याची इच्छा असेल त्याणें त्या वर्गांत जाण्याची योग्यता आणून खुशाल त्या वर्गांत जावें. बापाच्या मोठेपणावर मुलाला मोठेपणा मिळावयाचा नाहीं, किंवा बापाच्या उण्या आचरणामुळें मुलाला कमीपणा यावयाचा नाहीं. अशी व्यवस्था असल्यानें प्रत्येक मनुष्य आपली आपण

योग्यता मिळविली पाहिजे असें जाणून त्या यत्नास लागतो. आज विद्ये-च्या परिक्षेकरितां निरनिराळ्या परीक्षा व पदव्या ठेविल्या आहेत यामुळें ज्याला डाक्टर व्हावेंसें वाटतें त्याला डाक्टरीचे विषय शिकून परिक्षेंत पास होऊन डाक्टर व्हावें लागतें. बी. ए. एम् ए. ह्या पदव्या पाहिजेत तर त्या पदव्यांस ठरविलेले विषय शिकावे लागतात. त्या त्या विषयाचा अभ्यास केला ह्मणजे पाहिजे तो मनुष्य ती पदवी मिळवूं शकतो. बाप मोठा डाक्टर असला ह्मणून मुलाला कोणी डाक्टर समजत नाहीं, किंवा बाप अगदीं अडाणी असला तरी त्याच्या पदवी संपादन केलेल्या मुलाला कोणी अडाण्यांत गणीत नाहीं. अशीच जर जातीची व्यवस्था जागृत असती, ह्मणजे विद्वान ब्राह्मणाचा अज्ञान मुलगा जर सांगकाम्या निघाला तर त्याला शुद्रांत गणण्यांत आलें असतें, तसेंच शूद्रांत गणलेल्या बापाचा मुलगा जर ब्राह्मणास योग्य अशा गुणांनीं मंडित झाला असतां ब्राह्मणांत गणला जाता, तर प्रत्येक मनुष्याला आपली योग्यता राखण्याची व ती अधिकाधिक वाढविण्याची इच्छा होऊन मनुष्य जातीमध्यें ज्ञानवृद्धींत, नीतिमत्तेंत, एकसारखी चढाओढ लागून मनुष्याला मनुष्यपण आणणारें जें प्रापंचिक व पारमार्थिक विषयांचें ज्ञान त्यांत अनेक मनुष्यें फार पुढें गेलीं असतीं. हा देश जो ज्ञानप्राप्तींत पृथ्वीवर आरंभीं सर्वांत पुढें होता त्याची ती योग्यता कायम राहिली असती. पूर्व काळीं विश्वामित्रादि जसे तपोबलानें कनिष्ठ जातींतून श्रेष्ठ जातींत गेले, तशीं उदाहरणें नित्य घडत रहातीं. विद्येचा चांगला सस्कार नसतां वैश्यजातींत तुकारामासारखा साधु व ज्ञानी पुरुष निपजला तर विद्येचा संस्कार मुळापासून दिल्यानें खालच्या वर्णांतून किती तुकाराम उत्पन्न झाले असते? पण ज्या देशांत हिरे गारेच्या मोलानें व गारा हिऱ्याच्या मोलानें विकूं लागल्या त्या देशांतील ज्ञान, शौर्य, बल, हीं लयास जाऊन देशांतील सर्व लोक सेवाधर्म पतकरून शूद्र झाले व अन्य देशांतील नवेच ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य येऊन त्यांचे यजमान झाले यांत काय आश्चर्य? आज खरे ब्राह्मण, खरे क्षत्रिय, व खरे वैश्य परदेशचे लोक आहेत व आह्मीं सर्व त्यांचे दास अतएव शूद्र आहोंत ही गोष्ट जरी खेदकारक आहे तरी सत्य आहे. ह्या हीन दशेचीं फळें देशांतील सर्व लोकांस भोगावीं लागत आहेत. मात्र ही दशा कशानें प्राप्त झाली इकडे अद्यापि

लोकांचें लागावें तितकें लक्ष्य लागत नाहीं ही विशेष खेदाची गोष्ट आहे.

देशांतील एकंदर मनुष्यांच्या उन्नतीस ह्या अव्यवस्थित जातिभेदामुळें धक्का पोंचला. वर सांगितल्याप्रमाणें नीच मानिलेल्या जातींस ज्ञानसंपादनास उत्तेजन राहिलें नाहीं, त्याप्रमाणेंच श्रेष्ठ मानिलेल्या जातींस आपली योग्यता राखण्याकरितां आपण आपले गुण राखिले पाहिजेत, नाहीं तर खालच्या वर्णांत जावें लागेल, ही भीति राहिली नाहीं. अंगीं श्रेष्ठपणाचे गुण असोत वा नसोत, श्रेष्ठ तो श्रेष्ठ व अंगीं तसे गुण असले तरी ज्याला एकदां कनिष्ठ मानिलें तो कनिष्ठ. अशी "टक्का शेर भाज्या व टक्का शेर खाज्या" या म्हणीप्रमाणें व्यवस्था झाली. ही तर मोठीच सार्वजनिक हानि होय. पण प्रत्येक जातीला या अकारण भेदापासून किती त्रास होत आहे तो पाहिल्यास तेंही नुकसान लहान नाहीं. ज्याला त्याला प्रापंचिक व्यवहारांत पुष्कळ महत्वाच्या गोष्टींत आपआपल्या लहानशा जातींत घोटाळत रहावें लागत आहे. आपल्या मुलीला आपल्या जातींत योग्य वर मिळो, अगर न मिळो तिला त्याच जातींत दिली पाहिजे, नाहीं तर तिच्या कपाळीं नसतें वैधव्य बांधलें पाहिजे. दुसऱ्या जातींत योग्य वर असले तरी ते यांच्या कांहीं उपयोगी नाहींत. विवाहसंबंध तर काय पण पेलाभर पाणी प्यावयाचें असलें किंवा घासभर अन्न पाहिजे असलें व जर आपल्या जातीचें किंवा आपल्याहून श्रेष्ठ मानलेलें घर जवळ नसलें, तर अन्नपाण्यावांचून कांहीं वेळ किंवा केव्हां केव्हां सगळा दिवस काढावा लागतो ! याचें कारण काय म्हणून पाहिलें तर कारण दुसरें काय ? कारण दिवाणबहादुरी बंधुप्रीति ! जे ईश्वराचे प्राणी व आपले बंधु, ज्यांची खरोखर योग्यता पाहिली तर जे आपल्या बरोबरीचे किंवा आपल्याहूनही वेळेला श्रेष्ठ, त्यांना ह्या घातक जातिभेदाच्या जुलमामुळें आपले जणु काय ते शत्रु असे मानण्याचा प्रघात पडला आहे. शत्रु जसा विष घालून मारील कीं काय अशी भीति असते, व म्हणून त्याच्या घरीं अन्नपाणी घेण्यास भीति वाटते, त्याप्रमाणेंच भिन्न भिन्न जाति जशा काय एकमेकांच्या शत्रु झाल्या आहेत व म्हणून एकमेकांच्या हातचें अन्नपाणी वर्ज्य करीत आहेत. वास्तविक शत्रुत्व पाहिलें तर मुळींच नाहीं. शत्रुत्व जर कांहीं खरोखरच उत्पन्न झालें असेल तर दुसऱ्यांस विनाकारण नीच मानल्यानेंच तें उत्पन्न झालें आहे. त्याला मूळचें

कांहीं कारण नाहीं. प्रवासामध्यें या जातिभेदानें किती अडचणी येतात, निरनिराळे धंदे करण्यास हा भेद किती नडतो, परदेशीं जाण्यास ह्या भेदामुळें किती अडचणी आहेत व त्यामुळें आमचें किती नुकसान आहे, हें पाहिल्यास ह्या जातिभेदानें अनर्थ मांडिला आहे, असें उघड दिसेल. युरोपियन लोक आमच्या देशांत येऊन व्यापार करूं लागले व आपला कोटयावधि रुपयांचा माल इकडे खपवूं लागले, आह्मांस जिंकून राज्य करूं लागले, यामुळें आमच्या देशाचें फार नुकसान झालें, ह्मणून आह्मी रडतों, आमचें राज्य गेलें आह्मीं पराधीन झालों, आमची कला कौशल्यें बुडालीं, आमचा व्यापार बुडाला, आह्मीं भिकारी झालों ह्मणून ओरडतों, पण या गोष्टीला हा आमचा जातिभेद किती कारण आहे याचा आह्मी विचार करतों काय? ज्या काळीं युरोपिअन लोक आमच्या देशीं येऊं लागले तेव्हांपासूनच जर आमचे लोक त्या देशीं जाऊं येऊं लागते तर आज आमच्या कलाकौशल्यांची व व्यापाराची जी स्थिति आहे ती तशीच रहाती काय? कधींही अशी दशा आह्मांला आली नसती. आज पारशी लोक त्या देशांत खुशाल जातात येतात यामुळें त्यांच्यांत किती व्यापार वाढला आहे तो पहा. पृथ्वीच्या सर्व भागांत आज मोठमोठे पारशी व्यापारी आहेत. आज नामदार दादाभाई नौरोजी पार्लमेंटांत गेल्यामुळ सर्व देश आनंद करीत आहे. पण दादाभाईच कां पार्लमेंटांत गेले व ते जाण्यास इतका काळ कां लागला, यामागेंच एकादे पटवर्धन, रानडे, आंबे, शिरके, मिश्र, बानर्जी, गांगुली, अय्यंगार, मुदलियार, वगैरे पैकीं कोणी तरी कां गेले नाहींत हें पाहिल्यास दादाभाईच्या पायांत जातिभेदाच्या बिडया नाहींत, व आमचे हिंदु लोक आपल्या देशाचा तुरुंग करून जातिभेदाच्या हातापायांत बिडया घालून बसले आहेत ह्मणून. हा देश जर सर्व पारशांचाच असता तर या मागेंच दुसरे एखादे फ्रामजी किंवा सोराबजी पार्लमेंटांत गेले असते असें अनुमान करण्यास पुष्कळ जागा आहे. त्यांची संख्या फार थोडी पडली ह्मणून त्यांना इतके दिवस लागले. दादाभाई प्रथम विलायतेस गेले ते पार्लमेंटांत जाण्याकरितां गेले नाहींत. प्रथम व्यापारी ह्मणूनच गेले. पण त्यांच्या जातीनें त्यांना समुद्रापलीकडे जाल तर तुह्मांला आजन्म बहिष्कृत करूं; किंवा जातींत घेतलेंच तर तुमच्या मिशा काढायाला

ला वून तुह्मांला शेणमूत खायाला घालूं असें ह्मटलें नाहीं, ह्मणून ते विलायतेंत जाऊन राहिले. त्यांच्याही वाटेंत आमच्या सारख्या जातिभेदाचा अनुल्लंघ्य पर्वत असता तर कोठलें पार्लमेंट व कोठला त्यांत प्रवेश! खिस्त्याच्या हातचा चहा प्यालों ह्मणून सर्व प्रायःश्चित्तें व चांद्रायणें करणाऱ्या आमच्या बहादूर मंडळींतच दादाभाईही घोटाळत पडले असते! जर दादाभाईप्रमाणें व इतर पारशी लोकांप्रमाणें सर्व हिंदु लोक युरोपिअन व अमेरिकन देशांशीं प्रत्यक्ष जाऊन येऊन दळणवळण ठेवते, तर आमच्या लोकांच्या शेकडों आगबोटी, शेकडों त्या चालविणारे, शेकडों व्यापारी, नित्य त्या देशीं जात येत रहाते, आमचा व्यापार वाढता, कलाकौशल्यें सुधारतीं व आह्मी "कसें करावें काय करावें" या मंत्राचा जप करीत आज बसलों आहों तसें आह्मांस बसावें न लागतें. व्यापारसंबंधानें यार्णे आमचें नुकसान केलें तसें रायकीय संबंधानेंही त्याणें फार नुकसान केलें आहे व अद्यापि करीत आहे असें दिसेल. आमचें राज्य नष्ट होण्यास जीं जीं कारणें घडलीं त्यांत ह्या जातिभेदामुळें उत्पन्न झालेला परस्परांचा द्वेष, मत्सर कसा कारण झाला, हें इतिहासाकडे लक्ष्यपूर्वक पहाणाराला उघड दिसेल. पेशवे ब्राह्मण व मराठे क्षत्रिय हे उच्च नीच भाव मनांत आणून एक दिलानें सर्व प्रसंगीं वागले नाहींत. ब्राह्मणांनीं आपल्यास श्रेष्ठ मानून मराठ्यांचा जागजागीं पाणउतारा केला, यामुळें परस्परांत विषम भाव उत्पन्न होऊन एकमेकांचें एकमेकांस ऐक्यभावानें साहाय्य मिळालें नाहीं. एकानें भंग काढून घेऊन दुसऱ्यावर सर्व भार टाकला यामुळें तोंडघशीं पडावें लागलें, याचीं इतिहासांत पुष्कळ उदाहरणें आहेत. हल्लीं राजकीय संबंधानें राष्ट्रीय सभेसारखे जे यत्न चालले आहेत, त्यांतही कमी मानलेल्या जाति वरिष्ठ मानलेल्या जातींशीं तुटून रहात आहेत. तुटून रहात आहेत इतकेंच नाहीं तर सभेच्या मार्गांत विघ्नेंही आणीत आहेत. सरकारही ह्या भेदाचा आधार धरून आह्मांस राजकीय हक्क देण्यास कसें मागें घेत आहे, ह्याही सर्व गोष्टी उघडच आहेत. तात्पर्य या जातिभेदांमुळें होणाऱ्या परिणामाकडे बारीक दृष्टीनें जो जो मनुष्य पाहील त्याला तो आह्मांला पावलों पावलीं कसा नडतो, आमचा काळ कसा व्यर्थ घालवितो, आमच्यांतल्या पराक्रमाला कसा जागच्या जागीं दाबून टाकतो, नाना तऱ्हेच्या अडचणी कशा सर्व व्यवहारांत आणतो,

परस्परांत द्वेष व मत्सर कसा वाढवितो व आह्मांला जागच्या जागीं कसा तळमळत पडावयास लावितो, हें चांगलें दिसेल.

२. पण या गोष्टीकडे आमच्या लोकांनीं दुर्लक्ष्य करून चालावयाचें नाहीं. जर पृथ्वीवरील सर्व देशांशीं आतां आमची गांठ पडली आहे व कोणी जगावें व कोणी परलोकाचा रस्ता धरावा याविषयीं सर्व गोष्टींत एकसारखी परस्परांची लढाई लागली आहे, तेथें या गोष्टीकडे डोळेझांक करून कसें चालेल? सर्व समंजस लोकांनीं या गोष्टीचा विचार करून सध्याच्या रूढीला एका बाजूस ठेवून या जातिभेदाला योग्य वळण लाविलेंच पाहिजे. तुकारामबोवांच्या अभंगावर कथा करून पोट भरावयाचें पण तुकारामबोवाच्या हातचें पाणी घ्यावयाचें नाहीं. शेट दादाभाईनीं पार्लमेंटांत शिरण्याचा दीर्घ प्रयत्न करून यश संपादिलें याबद्दल त्यांची स्तुति गावयाची पण दादाभाई घरीं पाहुणे आले, तर त्यांचा प्रवेश कांहीं आमच्या घरांत व्हावयाचा नाहीं. ते व आपण एका पंक्तीस बसून जेवण खाण व्हावयाचें नाहीं एवढें तर काय, पण दादाभाईबरोबर एका टेबलावरून पेलाभर पाणी पिणेंही प्रेमानें उघडपणें व्हावयाचें नाहीं. घ्याल्यास प्रायश्चित्त घेण्याचा प्रसंग यावयाचा! पण असला प्रकार सध्या जरी चालू आहे तरी तो केव्हां ना केव्हां तरी थांबलाच पाहिजे. त्याशिवाय आमच्या हातून खरी सुधारणा एकही व्हावयाची नाहीं.

३. हा थांबण्यास सरळ मार्ग कोणता हें पाहिल्यास प्रत्येक मनुष्यानें या विषयाच्या मुळाशीं गेलें पाहिजे. सर्व जगाचा कर्ता जर एक ईश्वर व त्याणें मनुष्य जाति जर एकच निर्माण केली आहे, तर आह्मीं तिच्यांत विनाकारण भलभलतेच भेद करणें हें महा पातक होय हें नीटपणें लक्ष्यांत आणलें पाहिजे. अशा व्यवस्थेनें आह्मी ईश्वराचे अपराधी होत आहों. आज असलेल्या अनेक अकारण जाति तर मोडल्याच पाहिजेत, पण धंद्यांवरून जरी भेद मानले तरी परस्परांमधील अन्नोदकव्यवहार सुरू ठेविले पाहिजेत. वकिली करणारांना वकील ह्मणा, वैद्यकी करणारांना डाक्टर किंवा वैद्य ह्मणा, अध्यापन करणारांना अध्यापक किंवा शिक्षक ह्मणा, शिल्पशास्त्रज्ञांना शिल्पी किंवा एंजिनियर ह्मणा, शिपाइगिरी करणाराला शिपाई ह्मणा, व्यापाऱ्याला व्यापारी ह्मणा, शेतकऱ्याला शेतकरी ह्मणा, यांत कांहीं दोष नाहीं. तीं नावें अन्वर्थकच आहेत. पण

वकिलांनीं वैद्यांच्या पंक्तीस जेवूं नये, वकिलाची मुलगी शिक्षकानें करूं नये. शिक्षकाशीं एंजिनिअरानें संबंध ठेवूं नये, एंजिनिअराबरोबर व्यापारी जेवला कीं बाटला, असला वेडगळ आचार करूं नये. हें सर्व घडून येण्यास दुसरे तिसरे मार्ग उपयोगीं पडावयाचे नाहींत. परमेश्वर आमचा पिता व आम्हीं सर्व मनुष्यें त्याचीं लेकरें व परस्परांचीं भावंडें म्हणून भेद न राखितां परस्परांशीं वर्तन करणें हें आमचें कर्तव्य आहे अशी पक्की समजूत होऊन प्रत्येक मनुष्य जेव्हां ईश्वराकडे दृष्टि देऊन ब्राह्मधर्मानुसार वागू लागेल तेव्हांच त्याचा मार्ग सरळ होईल.

ब्राह्मसमाजानें हा विषय आतां कोरडया वादविवादाच्या पलीकडे नेऊन त्याला व्यावहारिक रूप आणलें आहे. सर्व जगाचा मातापिता एक परमेश्वर व सर्व मनुष्यें त्याचीं लेकरें ही कल्पना किती उन्नत, किती संतोषकारक व किती हितकारक आहे, ह्याचा प्रत्यक्ष अनुभव त्या समाजानें आमच्या लोकांपुढें ठेविला आहे. आतां रिकामा वादविवाद करीत बसून वेळ व्यर्थ घालविण्याचें कारण नाहीं. भिन्न भिन्न जातींच्या लोकांनीं भेद सोडून वागल्यानें कांहीं अडचणी येतात, कांहीं नुकसान होतें, किंवा उलट सोय होते, परस्परांचीं मनें शुद्ध असतात, आपण अन्यायानें वर्तत होतों त्यांतून मुक्त झालों अशी मनाची साक्ष पटून समाधान होतें हें अनुभवानें स्पष्ट झालें आहे. शिवाय हा भेद मोडण्यास हाच एक मार्ग आहे. आमच्या जुन्या व्यवस्थेंतच राहूं व हा जातिभेद मोडूं म्हटलें तर कित्येक शतकांनीं तरी होईल किंवा नाहीं हें सांगवत नाहीं. कारण हरकत घेणारे पुष्कळ लोक शिलक रहाणारच. मनांतून हरकत नसली तरी शिंगें मोडून वासरांत शिरणारी मंडळीही उत्पन्न होणारच. याकरितां ज्यांना या बंधनांतून मुक्त व्हावयाचें असेल त्यांणीं लोकांची वाट पाहत न बसतां लोकांस मार्ग घालून द्यावा. एखाद्या धान्याच्या राशींतील खडे किंवा दुसरा केर कचरा काढावयाचा असेल तर सर्व रास कायम ठेवून तिच्यांतील खडे निवडण्यास जितका वेळ लागतो त्याच्यापेक्षां थोडें थोडें धान्य घेऊन तें निवडून निराळें काढींत गेल्यास काम लौकर होतें. तोच प्रकार ह्या बाबतींत अनुभवानें सिद्ध झाला आहे. सर्व देशांतील जातिभेद मोडण्याची वाट पहात बसण्यापेक्षां थोडथोडया लोकांनीं आरंभ करून कार्यमार्गास लावणेंच सोयीचें झालें आहे.

श्री.

# सनातन भारतधर्म-महापरिषदेच्या समग्र माहितीचें पुस्तक.

## कार्यकारी मंडळी.

**अध्यक्ष.**—भारतमार्तंड शीघ्रकवि पंडीत गट्टूलालजी शर्मा.

**उपाध्यक्ष.**

म. म. राजाराम शास्त्री बोडस.

म. म. भीमाचार्य झळकीकर.

दि. ब. मणीभाई जसभाई.

**सन्मान्य मंत्री.**

रा. ब. भास्कर राव बा. पितळे. जे. पी.

शेट त्रिभुवनदास मंगळदास. जे. पी.

शेट मनमोहनदास दयाळदास.

शेट चुनीलाल नगीनदास सराफ.

रा. सा. गोविंद विष्णु देव, वकील.

**कार्यकारी मंत्री.**

वैद्य प्रभुराम जिवनराम.

वैद्य शंकर दाजी शास्त्री पदे.

रा.रा. नारायण रामचंद्र सोहनी.

,, शिवराम वामन साधले.

,, अनंतराव जोशी एकसंबेकर.

**कोशाध्यक्ष** (खजीनदार.)

शेट विठ्ठलदास दामोदर ठाकरशी.

**सभासद**

रा. रा. शांताराम नारायण दाभोळकर.

,, बाबू रामचंद्र, वकील.

रा. रा. नारायण त्रिंबक वैद्य

शेट माणिकलाल दामोदर खाटा.

,, मुरारजी गोकुळदास देवजी.

वे. सं. रणछोडलाल शास्त्री.

,, विष्णवाचार्य वळे.

,, मूळशंकर जोशी पेटलादकर

शेट मोतीलाल जमनादास.

,, नागरदास परमानंद.

,, तुळसीदास भगवानदास.

रा. रा. गिरिजाशंकर वि. काशीराम द्विवेदी.

,, रामकृष्ण दाजी पदे.

,, अनंत शिवाजी देसाई.

,, विष्णु पांडुरंग राजेराव नारिंग्रेकर.

,, गणपतराव भिवाजी नाईक.

शेट जमनादास मंगलदास, अधिकारी श्री कृष्ण कोठार नाथद्वारा.

,, नारायण हरि भागवत.

शेट विठ्ठलदास भोगीलाल दमनिया.

रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम कोठारे.

वैद्य गणेश भाऊ कुळकर्णी.

वैद्य वासुदेवाचार्य ऐनापुरे.

रा. रा. महादेव केशव महाजन.

,, रावजी पांडुरंग भापकर.

शेठ धनजशाळी शामजी.

बाकीचीं कांहीं कार्यकारी मंडळींतील सभासद, सन्मान्य सहायकारी मंडळी, हितचिंतक मंडळी, आश्रयदाते मंडळी वगैरेंच्यांची नांवें, विशेष खुलासा झाल्यावर जरूरी-प्रमाणें अवश्य प्रसिद्ध करण्यांत येतील.

---

## सनातन भारतधर्म-महापरिषदेस येणाऱ्या मुखत्यारा-(प्रतिनिधि)-संबंधीं नियम.

१. हिंदूंतील निरनिराळ्या जातींच्या सभा भरून, त्या त्या जातीतर्फे, किंवा एखाद्या गांवांतील हिंदूंची सभा होऊन त्या गांवातर्फे मुखत्यार निवडण्यांत यावे.

२. या प्रकारचे मुखत्यार, कोणी व कोण त्या तारखेस निवडले, त्यासंबंधें, त्या वेळच्या अध्यक्षाच्या सहीचें पत्र, मुख्य कार्यालयाचे मंत्री यांजकडे यावें. त्यांत मुखत्यारांचीं संपूर्ण नांवें, पत्ता, त्यांचा धंदा, जात, आणि त्यांची रहाण्याची व जेवण वगैरेची सोय महापरिषदमार्फत झाली पाहिजे कीं काय वगैरे सर्व खुलासा कळविला पाहिजे. अशा पत्राबरोबर सभेस हजर असणाऱ्या गृहस्थांच्या किंवा मुखत्यार निवडून देणाऱ्या गृहस्थांच्या सह्या असल्यास फार चांगलें.

३. याप्रमाणें मुखत्यार निवडण्याचीं पत्रें, तारीख २९ फेब्रुआरी सन १८९६ च्या आंत आलीं पाहिजेत.

४. मुखत्यार होणाऱ्या प्रत्येक गृहस्थांनीं सभेची वर्गणी दोन रुपये, सदरहु मुदतीच्या आंत पोंचती करून पावती जपून ठेवावी. ती, महापरिषदेच्या वेळीं दाखविण्यांत यावी; म्हणजे त्यांची योजना सभेंत करतां येईल.

५. ज्या मुखत्यारांची राहण्याची व जेवणखाण्याची सोय, महापरिषदेकडून व्हावयाची असेल, त्यांस त्याबद्दल लागणारा खर्च निराळा द्यावा लागेल. मुखत्यारांस कोणत्या तऱ्हेची सोय पाहिजे; त्यांस कोणाच्या हातचें भोजन चालतें; तें कसें असलें पाहिजे; न्हाण्याची सोय कशी असावी वगैरे मजकूर, त्यांच्याकडून खुलासेवार लिहून येईल त्याप्रमाणें एकंदर विचार करून, मार्च (१८९६) महिन्यांत त्यासंबंधी खर्चाचा अंदाज प्रसिद्ध करण्यांत येईल. याकरितां फेब्रुवारी (१८९६) ता० ३१ चे आंत सर्व मुखत्यारांनीं आपणास कशी सोय पाहिजे तें एकंदर खुलासेवार लिहून कळविलें पाहिजे.

विशेष खुलासा मागविणें असल्यास, उत्तरास टिकीट पाठवीत जावें.

**सर्व व्यवहार—"वैद्य शंकर दाजी शास्त्री पदे व रा. रा. नारायण रामचंद्र सोहनी,** प्रमुखकार्यालय मंत्री—स. भा. म., मुंबई, नवानागपाडा." या पत्त्यावर करावा.

---

## सर्व हिंदू लोकांस अगत्याची सूचना.

चैत्र वद्य ६।७ व ८ (ता० ३।४।५ एप्रील १८९६) हे तीन दिवस, **सनातन धर्म—महापरिषद्** मुंबई येथें भरणार आहे. तिला येणाऱ्या मुखत्यारांशिवाय इतरांनां 'प्रेक्षक' म्हणून यावयाचें असल्यास, त्यांस टिकिटा मिळतील असें तूर्त सांगवत नाहीं. त्याबद्दल मागाहून जाहिरात देण्यांत येईल. पण ज्यांस त्या वेळीं जागा पाहिजे असेल त्यांनीं आपल्या शक्तीप्रमाणें पांच रुपयांवर वर्गणी भरून, आपलें नांव सभासदांत दाखल करून द्यावें.

२. महापरिषदेच्या फंडास मदत म्हणून जी कोणी यथाशक्त्या वर्गणी देतील, ती देणाराच्या इच्छेप्रमाणें स्वीकारली जाईल व त्याबद्दल एजंटांकडून किंवा आमच्याकडून रीतीप्रमाणें पावती मिळेल. पण ज्यांकडून अशा प्रकारची वर्गणी, तीन रुपयांपासून वर मिळेल, त्यांस मात्र दुसरी कांहीं किंमत न घेतां, 'प्रेक्षका' चें टिकीट देण्यांत येईल.

जास्त माहितीसाठीं खालील ठिकाणीं, पोष्टाचें एक आण्याचें टिकीट पाठवून खुलासा मागवावा.

मुंबई, नवानागपाडा.
तारीख २।१।१८९६.

**शंकर दाजी शास्त्री पदे.**
**नारायण रामचंद्र सोहनी.**
मंत्री प्रमुख कार्यालय—स. भा. म.

# सनातन भारतधर्म-महापरिषद् काय काय करूं शकेल ?

हल्लीं हिंदुस्थानची स्थिति अगदीं विस्कळीत झाली आहे. अनेक पंथ, अनेक मतें आणि इतर अनेक प्रकारांनीं, लोकांची उद्योगांत होत चाललेली अनास्था, यामुळें ही स्थिति आणखी वाईट पंथास येऊं लागली आहे. राजकीय, औद्योगिक वगैरे बाजूंनीं प्रयत्न करण्याचें काम ज्यास जसें वाटेल त्या रीतीनें ऱ्याच लोकांनीं चालू केलें आहे. पण धार्मिक बाजूनें जितकें जोरदार काम चाललें पाहिजे तितकें चालत नाहीं ही मोठी उणीव आहे. हिंदुस्थानांतील कोणत्याही ज्ञातीकडे पाहिलें तरी, धर्मावर त्या सर्वांची इमारत उभारलेली दिसते. संघशक्तीला व्यवस्थित स्वरूप देऊन, तिच्या पासून योग्य फायदा करून घेण्यास हीं धार्मिक बंधारणें फार उपयोगीं आहेत. नव्या विचारांचीं किंवा नवीन तऱ्हेनें विचार करणारीं माणसें, त्या धर्मबंधारणांना सामाजिक बंधारण समजतात असें ह्मटल्यास हरकत नाहीं. कारण, सामाजिक बंधारण ह्मणजे—ज्यांत समुदायाच्या—आचार, नीति, व्यवहार वगैरे बाबतींचा विचार येतो तें; असें असल्यामुळें, व आमच्या प्राचीन व्यवस्थेकडे पाहिलें ह्मणजे, या सर्व गोष्टी आमच्या धर्मांत गोंवल्या गेल्या असल्यामुळें, सामाजिक ह्मणून जे विचार ते, व त्याहूनही जास्त उन्नत विचार, आमच्या प्राचीन चालत आलेल्या धार्मिक बंधारणांत आहेत असें स्पष्ट दिसून येतें.

सामाजिक बंधारण हें समुदायाच्या उन्नतीसाठीं व सोयीसाठीं आहे. जो समुदाय, कोणत्याही एका नियमित प्रमाणांत येऊं शकतो, त्या सर्व समुदायासाठीं जीं बंधारणें ठरविणें तीं सामाजिक बंधारणें होत.

आमच्या धार्मिक बंधारणांचें असेंच आहे. अशा प्रकारच्या सामाजिक बंधारणांनां विशेष सुलभ पडावें ह्मणून आमच्या देशांत ज्ञातिबंधारणांची योजना केली आहे. ज्या लोकांचे आचार, व्यवहार आणि गरजा बहुतेक एकाच प्रकारच्या असतात, व ज्यांचें जेवढ्या समुदायाशीं जवळचें बंधारण झालेलें असतें, तेवढ्या त्या समुदायाला ज्ञात ही संज्ञा देण्यांत आली आहे. हल्लीं जसे क्लब, सोसायटी, समाज, सभा वगैरे सामाजिक भाग ठरविण्यांत येतात, त्याच व्यवस्थेवर पण त्यापेक्षां विशेष बंदोबस्तानें ज्ञातीचीं बंधारणें केलेलीं आहेत. कीं, ज्या बंधारणापासून ज्ञातिविशिष्ट लोकांना आपापले व्यवहार, निर्बाध व व्यवस्थेशीर रीतीनें चालवितां येतात.

अमुक एक काम करण्यासाठीं एकाच मताचे किंवा सारख्या हेतूचे लोक एकत्र जमून, ती गोष्ट साध्य होण्यासाठीं व व्यवस्था राहण्यासाठीं, मुद्दाम केलेल्या नियमांनीं आपापल्यास बांधून घेऊन चालण्याची वहिवाट हल्लीं सर्वत्र आहे. अशी वहिवाट, वर सांगितल्या प्रमाणें क्लब, सोसायटी,. समाज, सभा वगैरे सर्व बाबतींत स्पष्ट दिसून येते. त्यावरून असें अनुमान सहज करतां येणार आहे कीं, साधारण एक प्रकारच्या गोष्टीसाठीं जर इतकीं बंधारणें लागतात, तर ज्या आमच्या लोकांनां आपले—लग्नकार्य, उदरपोषणकार्य, परस्पर दळणवळण आणि तदनुषंगिक अनेक गोष्टींचीं कार्यें सुरळीत चालावीं ह्मणून, अशा ज्या लोकांच्या बाबी समान जमतात, त्या समान बाबींतल्या लोकांची अमुक एक ज्ञात ठरवून, त्या ज्ञातीचीं बंधारणें ठरविणें व तीं अमलांत रहाण्यासाठीं त्या ज्ञातीनें प्रयत्न करणें, हें किति जरूरीचें आहे हें निराळें सांगणें नकोच.

साधारण एखाद्या सभेचा नियम फिरविणें किंवा त्यांत नवीन कांहीं घालणें, तरी देखील त्या सभेचें बहुमत पहावें लागतें, आणि तसें न पाहिल्यास, न्यायदृष्टीनें तें काम अगदीं अन्याय्य, चुकीचें व असमं-

नसतेचें ठरतें. तर अशा समाजादि कार्यांपेक्षां ज्ञातिबंधारणांचीं जीं महत्कार्यें, तीं किती खबरदारीनें चालली पाहिजेत, त्यांचे नियम किती जपून व जरूर पाळले पाहिजेत व त्यांची किति लक्ष्यपूर्वक जोपासना केली पाहिजे ही गोष्ट निराळी सांगण्याची कांहीं जरूर दिसत नाहीं.

एकंदरींत बखेडा होऊं नये ह्मणून नियम, आणि नियम आहेत ह्मणून न्याय, अशा रीतीनें परंपरा ध्यानांत ठेऊन, एकंदर देशाची धार्मिक उर्फ समाजपद्धति चालणें अत्यंत इष्ट आहे यांत संशय नाहीं. समाजाला ज्या वेळीं ज्या नियमांत फिरवाफिरव करतां येईल, त्या वेळीं तो, समाजनियमाप्रमाणें न्यायाला अनुसरून करील व तेव्हां तें त्याचें करणें त्याला हितकारकही होईल.

यावरून हिंदुस्थानांतील प्रजेंत अनेक पंथ, अनेक ज्ञाति किंवा अनेक मतें झालीं असलीं, तरी तीं योग्य समाजनियमानें बांधलेलीं आहेत. व तदनुसार त्यांचा व्यवहार चालणें इष्ट आहे असें ह्मणण्यास बिलकूल हरकत नाहीं.

एका 'हिंदू' नांवाखालीं अनेक ज्ञाती येतात. तथापि त्यांचीं सर्वमान्य बंधारणें, एकमेकाशीं अगदीं एकसारखीं आहेत. ज्ञाती निराळ्या झाल्या ह्मणून धर्म निराळे होत नाहींत. एका धर्माच्या पायावर, सोयीसाठीं अनेक ज्ञाती केल्या असल्या, तरी त्यांचीं बंधारणें एकाच प्रतीचीं असणें स्वाभाविक आहे. तीं बंधारणें सोडणें ह्मणजे, एकंदर पायावर कुऱ्हाड मारण्यासारखें होतें. ज्या वेळीं सर्व लोकांनां समाजनियमाप्रमाणें अशीं बंधारणें निराळ्या धर्तीवर ठेवणें जरूर व शक्य वाटेल, त्या वेळीं तीं स्वाभाविक तशीं होऊन जातील. परंतु तोंपर्यंत, हल्लीं बंधारणें आहेत तीं कशीं आहेत व त्या बंधारणाच्या स्वरूपांतील चांगला वाईट भाग कोणता आहे हें समजण्यास,

तीं बंधारणें कितपत अंमलांत आहेत व कितपत नाहींत हें पहाणें आणि त्याबद्दल अगदीं सावकाशीनें व विचारपूर्वक चर्चा करणें इतकेंच जरूरीचें आहे.

जर एखादा मनुष्य, आपल्यापेक्षां वरिष्ट मानलेल्या ज्ञातींत आपण शिरावें अशी इच्छा प्रकट करील, तर ती गोष्ट, त्या वरिष्ट ज्ञातीनें कबूल करण्यापूर्वीं, त्या मनुष्यानें, आपल्यापेक्षां कनिष्ट ज्ञातींतील गृहस्थाची योग्यता कबूल करून, नंतर आपल्यापेक्षां वरच्या जातींत आपण मिसळण्याचा विचार करावा किंवा तसें करण्याची कांहीं जरूर नाहीं ? असा प्रश्न उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. जसें, वर्णाश्रमधर्माप्रमाणें क्षत्रिय किंवा वैश्यानें आपल्यापेक्षां वरिष्ट वर्णांत शिरण्याची इच्छा, रीतीनी आहे अशा विषयीं अनुमानें दर्शित केलीं, तर त्या क्षत्रिय किंवा वैश्यास वरिष्ट वर्णांत घेण्यापूर्वीं, तो आपल्यापेक्षां कनिष्ट अशा शूद्र किंवा अतिशूद्रास, आपल्या बरोबरीला घेण्यास तयार आहे काय ? असा प्रश्न सहजीं उद्भवतो. पण असा वादविवाद करीत बसल्यास, आरंभापासून अखेरपर्यंत वादच चालविल्यावांचून, व 'वादाचा परिणाम हानी' हा भोगल्यावांचून दुसरा कांहीं फायदा होत नाहीं ! व होणारही नाहीं ! कारण, कित्येक ठिकाणीं असे दाखले पहाण्यांत येतात कीं, कितीही वरिष्ट वर्ण असो अथवा कितीही कनिष्ट वर्ण असो; पण वरिष्ट वर्णाशीं संबंध ठेवण्यास देखील कनिष्ट वर्ण, ज्ञातीच्या नियमानें खुषी होत नाहीं. समयानुसार उदाहरण देणें भाग असल्यामुळें, सांगणें जरूर आहे कीं, एका वरिष्ट ज्ञातीतील स्त्रीशीं एका कनिष्ट ज्ञातींतील गृहस्थानें संबंध केल्यावरून, त्या ज्ञातीनें त्यास बहिष्कार घातला. अशीं उदाहरणें पुष्कळदां आढळतात. ज्ञातीचा जो एक स्वाभाविक अभिमान असतो, त्यामुळें असें होणें संभवनीय आहे असें ह्मणण्यास पुष्कळ पुरावा आहे. साधारण प्रचारांत 'अडाणी' हा शब्द कोणती ज्ञात कोणत्या ज्ञातीस वापरते याचा

जर शोध केला, तर कितीही वरिष्ट ज्ञात असली, तरी त्या ज्ञातीस, त्यापेक्षां कनिष्ट ज्ञात, ते आपल्याहून 'अडाणी' आहेत असें म्हणतांनां पुष्कळ वेळां दिसून येतें. यावरून 'स्वाभिमान' हा कांहीं निराळाच आहे असें उघड ठरतें. हल्लीं सर्वत्र असा अनुभव येईल कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. पण साधारणपणें ब्राह्मणांत देखील असें आहे कीं, भिक्षुक ब्राह्मणांत 'गृहस्थ ब्राह्मण' कधींही घुसणार नाहीं व ब्राह्मणांत शिरण्यास किंवा ब्राह्मणांच्या कर्मास आवडीनें स्वीकारण्यास 'क्षत्रिय' कधींही इच्छिणार नाहीं ! असाच प्रकार सर्व ज्ञातींचा. सांगण्याचें कारण इतकेंच कीं, आपली ज्ञात कशीही असो, तीच आपण संभाळून रहावें व तसें रहाण्यांतच आपलें सर्वस्व आहे अशी समजूत, या ज्ञातिनिर्बंधापासून झाल्यानें, एकमेकांविषयीं मत्सर, हेवा किंवा निंदा असा प्रकार, हिंदुस्थानांत होण्याचें कारणच राहिलें नव्हतें.

पण हें पश्चिमेचें वारें जें आमच्या हिंदुस्थानांत शिरलें, त्यामुळें त्यानें सर्वच घोंटाळा उडवून दिला आहे. कित्येक तर अगदीं स्वाभिमानशून्य बनून "दुसऱ्याच्या पानावर जास्त भात दिसतो" अशा प्रकारच्या दृष्टीनें भ्रमित झाले आहेत. ब्राह्मणांनीं इतरांची क्रिया पसंत करणें व इतरांनीं ब्राह्मणांची किंवा आपल्याहून निराळ्या जातीची वर्तणूक स्वीकारणें, इत्यादि गोष्टी उद्भवण्यास हें पश्चिमेचें वारें कारण झालें आहे. हें वारें हितकारक आहे किंवा नाहीं हें पहाण्याचा किंवा ठरविण्याचा हा प्रसंग नसून, हें जें वारें उद्भवलें आहे तें कितपत व्यवस्थेशीर आहे इतकें पहाणेंच तूर्त जरूर आहे.

त्याप्रमाणें पाहिलें तर, या वाऱ्यानें अनिश्चितपणा आणि बेदार वाढत चालली आहे असें स्पष्ट दिसतें. हें वारें सगळ्या ज्ञातींत शिरतें तर त्याचें स्वरूप इतकें वाईट मानतां आलें नसतें. पण तसा कांहीं प्रकार नसून, एकंदर जनसमूहाच्या मानानें पाहिलें म्हणजे, हें वारें

अगदींच नाहीं अशा प्रमाणांत असून, त्यापासून एवढें मात्र होत चाललें आहे कीं, आपलें काय आहे हें न पहातां, आंधळ्याप्रमाणें कोणी तरी व कांहीं तरी करीत असल्यानें, "धड हिंदू ना धड मुसलमान" या ह्मणीप्रमाणें, एकंदर प्रवाह जो पडत चालला आहे, तो कोणत्याच एका दिशेला पडत नसून, "नऊ पुरभय्ये व दस चूला" या ह्मणीप्रमाणें, दहा व्यक्ती व वीस मतें असा विचित्र होत असून, संघशक्तीला सर्वस्वी हाणून पाडीत आहे.

याप्रमाणें संघशक्तीचा नाश होत असल्यामुळें, समाजबंधारणांत हल्लीं चांगलें किती व काय आहे, व वाईट किंवा भलतेंच आलेलें असें काय आहे हें कळण्याचें साधन लोपून जात आहे. फार कशाला, चांगल्या सुशिक्षित ह्मणविणाऱ्याला जरी विचारलें कीं, तुमच्या जातीचे आचारविचार, व्यवस्था, धर्मकर्म आणि प्राचीन पद्धती काय तें सांगा; तर असा मनुष्य शेंकडा पांच या प्रमाणानें देखील सांपडायाचें कठीण झालें आहे !

यामुळें 'सामाजिक सुधारणा' ह्मणजे पोरखेळ आणि समाजबंधारणें ह्मणजे पोरांचे खेळांतील चमत्कारिक व अनियंत्रित कायदे असें दिसूं लागण्याची वेळ आली आहे. सामाजिक सुधारणा या शब्दानें धार्मिक पद्धतींतील दोष काढणें व तिच्यांत नवे गुण उत्पन्न करणें असा अर्थ घेणें स्वाभाविकच आहे. पण जर 'धार्मिक' ऊर्फ ज्ञातींची पद्धति, विचार करणानां अवगतच नसेल, तर तींतील दोष कसे काढणार किंवा तींत नवे गुण कसे उत्पन्न करणार ? हा मोठा त्रिकूट प्रश्न आहे. तो सोडवणें ह्मणजे, प्रथमतः जातीविषयीं ज्ञान नसण्याचा जो लोकांत प्रकार वाढत चालला आहे तो आधीं समूळ लयास गेला पाहिजे.

अशा रीतीनें आपापल्या ज्ञातीची माहिती वगैरे प्रत्येकाला होत गेली, व तो त्या माहितीचा शांतपणें विचार करूं लागला, ह्मणजे

त्याला त्यांतील रहस्य समजत जाईल. ह्मणून असें होण्यास प्रथमतः ज्ञातीचीं बंधारणें कायम ठेवणें व अशा रीतीनें ज्ञातीच्या बंधारणानें विचार करण्यास कितपत सुलभ पडतें हें पहाणें अवश्य आहे.

हें सर्वांनां ठाऊक आहेच कीं, हिंदुधर्मांत जरी अनेक ज्ञाती आहेत, तरी त्यांची बहुतेक गोष्टींत पद्धति एकसारखीच असते. ह्मणून अशा या पृथक् पथक् ज्ञातींतील लोकांनीं, आपण हिंदूधर्माचीं अंगें आहोंत असें समजून, एकत्र बसून विचार करणें, व आपल्या प्राचीन विद्यादिकांचें ज्ञान आपल्यांत, आपल्या धार्मिक पद्धतीस अनुसरून वाढविण्याकरितां, शांतपणें व बेताबातानें प्रयत्न करणें; तसेंच आपलीं ज्ञातिबंधारणें, आपापल्या ज्ञातींतील प्रमुख किंवा पंच यांच्या अनुरोधानें व आपल्या आचार्यांच्या संमतीनें सुयंत्र चालवून, नंतर जी संघशक्ति उत्पन्न होईल, त्या संघशक्तीपुढें आपल्या उन्नतीचा प्रश्न काढणें, हा अगदीं सरळ व सोपा मार्ग आहे. तोच मार्ग स्वीकारण्यासाठीं ही '**महापरिषद्**' उत्पन्न झाली आहे.

प्रत्येक ज्ञातीचें हित, सर्वसाधारणपणें कशानें साधतां येईल; आपापलीं जातिबंधारणें आपापल्या ज्ञातींनां कसकशीं उपयुक्त होतील, आणि तीं संभाळून आपल्याला आपली उन्नति कशी करतां येईल, हा विचार करणें हें या महापरिषदेचें काम आहे.

यामुळें पुष्कळ फायदे होण्यासारखे आहेत. कारण, ( १ ) ज्ञातिबंधारणें कायम ठेऊन वागणें असल्यामुळें, कोणत्याही ज्ञातीला वाईट वाटणार नाहीं; ( २ ) जो तो आपापल्या ज्ञातीपुरता विचार करीत असल्यास, त्यास दुसऱ्या कोणाकडून प्रतिबंध होणार नाहीं. त्यामुळें आपसांत मत्सर किंवा वैर वाढण्याचें मूळच निघून जाईल; ( ३ ) पुन्हा अशा निरनिराळ्या हिंदू ज्ञातीच्या लोकांनीं एकत्र बसून विचार केल्यास, व आपापल्या ज्या अडचणी सर्वसाधारणपणें सारख्या आहेत तेवढ्यांचा प्रतीकार करण्याची, व आपल्या समाजास उन्नती

कशानें येईल ती तजवीज करीत राहिल्यास, एकमेकांचा एकमेकांस पुष्कळ फायदा होईल, प्रेम वाढेल आणि सर्वांचें नुकसान कशांत आहे हें कळेल; तसेंच ( ४ ) दिवसेंदिवस, आपली सर्व राष्ट्ररूपी इमारत, जी आपल्या प्राचीन विद्या, कलादि वैभवांवर उभारली आहे, त्या विद्याकलांचा शोध व प्रसार करण्याचा प्रयत्न करण्याची पद्धति, अतोनात उपयोगीं पडणार आहे.

एकंदरींत हा जो वर संक्षेपांत, या महापरिषदेच्या कर्तृत्वाचा फायदा वर्णन केला आहे, त्यावरून कोणासही इची योग्यता सहज कळून येणार आहे. तरी अशा योग्य कामीं झटून प्रयत्न करण्याचा, सर्व हिंदु बांधवांनीं अवश्य प्रयत्न केला पाहिजे.

मुसलमान लोकांनीं आपल्या जातीसाठीं अशाच प्रकारचा कित्येक वर्षें प्रयत्न सुरू केला आहे. त्यांची अशा प्रकारची मोठी सभा दर-वर्षीं भरत असते. आपल्या हिंदूलोकांतही असा प्रयत्न, उत्तर हिंदुस्थानांत कित्येक वर्षें सुरू झाला असून, त्याची व्यवस्था उत्तम प्रकारची असल्याचें कळतें. सदहू हिंदूंच्या सभेस 'भारतधर्म—महामंडल' असें नांव आहे. या सभेसच या 'महापरिषदे' चा जोड देतां येणें शक्य होतें. परंतु हिंदुस्थानदेश हा अफाट व तूर्त आपली सामाजिक अर्थात् धार्मिक स्थिति अज्ञातवासासारखी झाली असल्यामुळें, व त्याला आपल्या लोकांचें दारिद्र्य हें कारण असल्यामुळें, आजच आपला संबंध, फार दूर असलेल्या आपल्याच लोकांच्या 'भारतधर्म—महामंडला' शीं होणें कठीण आहे. तिकडून त्यांचा प्रयत्न व हिकडून आपला प्रयत्न कांहीं दिवस चालल्यास, कांहीं दिवसांनीं ही गोष्ट होणें संभवनीय आहे. आणि नंतर त्यापासून आपल्या हिंदूसमाजाच्या स्थितीचा योग्य उत्कर्ष पहाण्याची सुसंधि सांपडणार आहे यांत संशय नाहीं.

पण ही गोष्ट एकदम होणें शक्य नाहीं. हळुहळु, शांत रीतीनें, विचारानें आणि आपल्या धर्मास हरकत न येतां खबरदारीनें जर

प्रयत्न चालेल, तर हा इतका उत्कर्ष होणार आहे. यासाठीं प्रथमतः 'श्रीगणेशायनमः' सुरू केला पाहिजे.

अशा या उपयुक्त 'महापरिषदे' पासून इष्ट कार्य होण्यासाठीं, इचें काम, सर्वांशीं सारख्या दृष्टीनें, प्रेमानें व व्यवस्थेनें चालणें जरूर आहे. ह्मणून त्या कामाची व्यवस्थाही सुरळीत लागेल अशा तज-विजी केल्या पाहिजेत. या 'महापरिषदे' च्या नियमांत, इचे उद्देश व व्यवस्था काय आणि कशी आहे याविषयीं माहिती याखालीं दिली आहे; त्यावरून सर्व कळून येईल. साधारणपणें इचें काम कसकशा रीतीनें चालेल हें थोड्या विस्तारानें कळविणें जरूर असल्यामुळें, येथें त्याबद्दलचा खुलासा करीत आहों. सदरहू मुख्य नियम येणेंप्रमाणें ठरले आहेतः—

## सनातन भारतधर्म–महापरिषदेचे मुख्य नियम.

सनातन भारतधर्म म्हणजे काय ?

" १. हल्लीं जेवढ्या प्रदेशाला 'हिंदुस्थान' असें म्हणतात, त्याला पूर्वीं 'भरतखंड' किंवा 'भारतवर्ष' अथवा 'आर्यावर्त' अशीं नांवें असत. या भारतवर्षांत एकच धर्म चालू असे. त्याचें मूळ 'वेद' होत. अत्यंत प्राचीन धर्म, हल्लींच्या काळीं देखील हाच आहे. यालाच 'हिंदूधर्म' असें हल्लीं म्हणतात. याचें प्राचीनकालचें 'भारतधर्म' असेंही नांव आहे. यालाच 'वैदिकधर्म', 'सनातन वेदधर्म' इत्यादि नांवें मिळालीं होतीं. एकंदरींत हल्लीं ज्याला 'हिंदूधर्म' ह्मणतात, तोच 'भारतधर्म' होय. धर्मौदार्य वास्तविक जितक्या अंशानें दाखविलें पाहिजे, तितकें पूर्ण रीतीनें या 'भारतधर्मांत' दाखविलें असल्यामुळें, या धर्मांत असणाऱ्या लोकांतही मतभिन्नत्वानुरूप व संप्रदायानुरूप शैव, वैष्णव वगैरे भेद झाले. तथापि त्या सर्वांच्या समुदायाला, प्रस्तुतचें प्राकृत नांव म्हणजे 'हिंदूधर्म' हेंच देतात, व तेंच देणें प्रासंगिक आहे.

इच्यांत कोणाचा समावेश होतो ?

२. मिळून 'भारतधर्म' ह्मटला म्हणजे, त्यांत सर्व हिंदूमात्रांचा समावेश होतो, ही गोष्ट आतां सांगण्याचें कारण नाहीं. त्याप्रमाणें सदरहु 'सनातन भारतधर्म–महापरिषदें'त, या धर्मांत असून, तदनुसार त्याची आज्ञा पाळणाऱ्यांनां या परिषदेंत ( सभेंत ) येतां येईल हें निराळें सांगणे नको.

३. तथापि या सभेंत जें काम चालायाचें, तें या धर्माच्या सार्वत्रिक तत्वांस अनुसरून चालेल. या धर्मांतील भिन्न भिन्न मताच्या किंवा संप्रदायाच्या लोकांसाठींच ( अर्थात् एकदेशीय ) काम चालू नये ह्मणून फार खबरदारी घेतली जाईल. हिंदू धर्माचे आचार, विचार, वर्णव्यवस्था व तत्वें यांना बाध न येतां, ज्यांबद्दल सर्व हिंदूमात्राच्या स्थितीचा विचार करतां येईल, आणि ज्यापासून हिंदूधर्मांत येणाऱ्या कोणत्याही धर्मपंथास तत्वश: वाईट वाटणार नाहीं अशा रीतीनें या सभेचें काम चालेल.

या सभेचें काम कसें चालेल ?

४. स्वधर्मी धार्मिक समुदायाला बरोबर घेऊन चालायाचें व तदनुसार इष्ट त्या सुधारणा, धर्माला बाध न येतां करावयाच्या; तसेंच धर्माला बाध येणाऱ्या गोष्टींचा प्रतिबंध करावयाचा आणि धर्मज्ञानाचा प्रसार होण्यासाठीं जे जे योग्य व धर्ममान्य इलाज असतील ते करावयाचे, हा या परिषदेचा मूळ हेतु आहे.

हेतु.

( टीप.–धर्माला हरकत न येतां सुधारण्यासारखे भाग पुष्कळ आहेत. जसें–धर्मशास्त्राचें अज्ञान, मद्यपान, गोरक्षणाभाव वगैरे पुष्कळ विषय, सामाजिक रीतीनें लोकांचें नुकसान करणारे असून, त्यांचा प्रतिबंध करून सुधारणा केल्यास धर्माला बिलकुल हरकत येणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर धर्माला अनुसरूनच या लोक–सुधारणा होण्याजोग्या आहेत. त्याच प्रमाणें–धर्मज्ञान, नीति इत्यादिकांची जी दिवसेंदिवस अस्तंगत स्थिति होत चालली आहे, तीही सुधारतां येणार आहे व त्यासाठीं पाठशाळा, उपदेशक, पुस्तकें वगैरे तजवीजीही होणें संभवनीय आहे. )

स्थापना. ५. त्या प्रमाणें शके १८१७ विजया दशमी ( आश्विन शुद्ध १० शनिवार ) हा या सभेचा स्थापन–दिवस समजला आहे.

६. दर वर्षी एकदां सर्व ठिकाणच्या, एतत् धर्मीय लोकांच्या प्रतिनिधींची एक मुख्य सभा होत जाईल. व त्यांत ठरेल त्याप्रमाणें व हेतूला अनुसरून, या सभेची जी कार्यकारी मंडळी ठरविण्यांत येईल, ती काम करीत जाईल.

काम करण्याची पद्धती.

**पोट नियम**:— ( १ ) या सभेचें मुख्य कार्यालय मुंबईस राहील. व पोट मंडळ्यांची स्थापना जागजागीं करण्यांत येईल.

( २ ) या मंडळीचें काम, होतां होईल तों देशभाषेंत चालेल. व तें जरूरीप्रमाणें निरनिराळ्या देशभाषेंत चालेल.

( ३ ) 'कार्यकारी मंडळींत' अध्यक्ष, उपाध्यक्ष, मंत्री वगैऱ्यांची योजना, प्रसंगविशेषाप्रमाणें ठरविली जाईल.

( ४ ) पोटमंडळ्यांची व्यवस्थाही त्याचप्रमाणें राहील.

( ५ ) वार्षिक सभेसाठी अध्यक्ष वगैरे नेमणुका करावयाच्या त्या अगाऊ बहुमतानें केल्या जातील.

( ६ ) वार्षिक सभेच्या वेळीं सभासद होणारे गृहस्थ, मुखत्यार या नात्यानें, सदरहु महापरिषदेच्या नियमांप्रमाणे हेतूस अनुसरून असणाऱ्या हिंदूसमुदायाकडून निवडून आलेले असावेत. निदान पंचवीस गृहस्थांच्या सह्यांनीं मुखत्यार निवडण्यांत यावा. अशा प्रकारच्या निवडलेल्या गृहस्थांचें नांव, गांव व त्याच्या संबंधाची माहिती, निवडणारांच्या तर्फे प्रमुख गृहस्थानें, सदरहु महापरिषदेच्या कार्यकारी मंडळीकडे लिहून पाठवावी. नंतर त्याबद्दल मंजुरी मिळाल्यावर, मुखत्यार म्हणून महापरिषदेंत सदरहु मुखत्यार गृहस्थानें येण्यास हरकत नाहीं.

( ७ ) प्रसंगविशेषाप्रमाणें व व्यवस्थेसाठीं त्या वेळीं कमीजास्ती नियम प्रसिद्ध करण्यांत येतील."

हल्लींच्या काळीं हिंदुस्थानांत मुंबई हें शहर मोठें व सर्व जातींच्या प्रमुख लोकांच्या वसाहतीचें असून, सार्वजनिक कामासाठीं महत्वाच्या सोयी येथें साहजिक आहेत. शिवाय या 'महापरिषदे' ची कल्पनाही येथूनच निघाली असल्यामुळें, या महापरिषदेचें 'प्रमुख कार्यालय' मुंबईस राहील असें ठरविण्यांत आलें आहे. या प्रमुख कार्यालयाकरितां दोन मंत्री ठरविण्यांत आले आहेत. शिवाय त्यांस दहा इसमांची एक 'सहाय्यकारी मंडळी' देण्यांत आली आहे. या मंडळीच्या संमतीनें, प्रमुख कार्यालयाचें काम चालेल. तथापि या सर्वांस मार्ग दाखविणारी व प्रमुखत्वानें काम चालविणारी एक 'कार्यकारी मंडळी' ठरविण्यांत आली आहे. या मंडळींतीलच, सदरहु 'प्रमुख कार्यालय-मंत्री' व 'सहाय्यकारी मंडळी' ही ठरविण्यांत येऊन, 'कार्यकारी मंडळी'च्या ठरावास अनुसरून ती काम करीत जाईल. 'कार्यकारी मंडळी' जें काम करणार, तें सनातन भारतधर्म—महापरिषदेंत ठरविण्यांत येणाऱ्या ठरावानुरूप व हेतूस अनुसरून करण्यांत येईल. एकंदरींत वरपासून खालींपर्यंत काम करण्याची पद्धति, अगदीं दोरीसूत रहावी अशी योजना केली आहे.

सदरहु प्रमाणें ' कार्यकारी मंडळी ' काम करीत जाईल तीस, ठिक-ठिकाणच्या लोकांचें साह्य असणें जरूर आहे. ह्मणून या कार्यास वेळोवेळीं सल्लामसलत देण्यासाठीं, मदत करण्यासाठीं व विचार सुच-विण्यासाठीं एक ' सन्मान्य साह्यकारी मंडळी ' ठरविली आहे. तींत हिंदूंतील ठिकठिकाणचे विद्वान, लोकमान्य व धर्मपरायण अशा लोकां-च्या नेमणुका करण्यांत येतील. आपलीं क्षेत्रें, पुरातन मान्य स्थानें व सर्व धार्मिक विद्वान् लोकांच्या संस्था, यांतूनही असे लोक घेण्याची योजना राहील.

इतकेंच नव्हे, तर या ' महापरिषदे 'स, आपल्या धर्मनियमाप्रमाणें निरनिराळ्या ज्ञातींना जे आचार्य पूज्य आहेत, अशा परमपूज्य व सद्गुरुस्थानापन्न आचार्यांचीं संमति व प्रोत्साहनपर ' अशीर्वादपत्रें ' घेण्यांत येतील.

तसेंच, या महापरिषदेच्या कार्यांत सहाय्यभूत असे आणखी दोन वर्ग महत्वाचे आहेत. एक ' आश्रयदाते ' व दुसरा ' हितचिंतक. ' आपल्या धर्मांतील पूज्य राजेरजवाडे व या महापरिषदेस मोठा आश्रय देणारे अशा सद्गृहस्थांचीं नांवें ' आश्रयदाते ' या वर्गांत घातलीं जातील. व वेळोवेळीं जरूर पडेल तशा रीतीनें कळकळ वाळगून मदत करणाऱ्या सद्गृहस्थांचीं नांवें ' हितचिंतक ' या वर्गांत समाविष्ट करण्यांत येतील.

अशा रीतीनें या महापरिषदेच्या कामाची मांडणी केली आहे. ' कार्यकारी ' मंडळीनें हळु हळु हीं कामें करावयाचीं आहेत. आणि तीं, सर्वांच्या महदाश्रयानें पार पडतील इतकें कळविणें येथें पुरें आहे.

आणखी याशिवाय जें काम करावयाचें सांगणें आहे तें निराळ्या प्रकारचें आहे. वर जें काम सांगितलें तें ज्या प्रकारचें आहे, तें

सुरेख होऊन, सर्व हिंदुस्थानभर महापरिषदेची प्रभृति होण्यास, आतां जें सांगावयाचें आहे, तें काम होण्याची फार आवश्यकता आहे. तें काम हेंच कीं, गांवोगांवीं या महापरिषदेच्या 'उपकार्यालय' सभा स्थापन होणें व 'महापरिषद्' भरेल त्या वेळीं ठिकठिकाणच्या खड्या-पाड्यांतून सुद्धां आणि हिंदूंतील निरनिराळ्या सर्व ज्ञातींतून मुखत्यार येण्याची व्यवस्था होणें. हें काम फार महत्वाचें आहे. 'कार्यकारी मंडळी' किंवा 'प्रमुख कार्यालय' हें एके ठिकाणीं बसून काम करण्यास शक्य होण्यास, सदर्हु कामें होणें अति अवश्य आणि फार महत्वाचें आहे. त्यासाठीं 'प्रमुख कार्यालया'कडून जागजागच्या लोकांस पत्रें जाऊन, 'उपकार्यालय सभा' ठिकठिकाणीं स्थापन करण्याची तजवीज करण्यांत येईल. ती तजवीज होण्यासाठीं, महापरिषदेच्या माहितीचीं पुस्तकें व पत्रें, ठिकठिकाणच्या धर्मपरायण लोकांकडे पाठविण्यांत येऊन व जरूरप्रसंगीं उपदेशक पाठविण्यांत येऊन, अशा सभा जागोजाग व त्यांत मुख्यत्वेंकरून आपल्या क्षेत्रादि पुरातन पूज्य व प्रसिद्ध स्थलांतून स्थापन करण्याची खटपट केली जाईल. त्या सभांचीं कामें कशीं चालावीं वगैरे सूचना, 'प्रमुख कार्यालया' कडून जातील. व ठिकठिकाणच्या हकीकती 'प्रमुखकार्यालया' कडे येऊन, जरूरप्रसंगीं त्यांची प्रसिद्धि, किंवा त्या, महापरिषदेपुढें ठेवण्यांत येतील.

तसेंच, महापरिषद् भरण्याचें ठरेल त्या ठिकाणीं सर्व ठिकाणच्या व जातींच्या मुखत्यारांनां येण्याची सोय होण्यासाठीं, ठिकठिकाणीं पत्रें पाठविणें, महापरिषदेची व्यवस्था ठेवणें, वर्गणी वसूल करणें, विषय निवडून ते सर्वांच्या विचाराकरितां पाठविणें वगैरे कामाची व्यवस्था, 'प्रमुखकार्यालया' तर्फे लावण्यांत येईल. प्रत्येक गोष्टींत, जिकडून वाद न पडतां कामें सुरळीत चालतील अशा प्रकारची तजवीज राखण्याक-

द्दल पूर्ण खबरदारी घेण्यांत यावी अशी व्यवस्था करणें 'कार्यकारी मंडळी' स अवश्य आहेच.

या एकंदर कार्यक्रमावरून सर्वांच्या ध्यानांत, महापरिषदेची व्यवस्था येण्यास हरकत पडणार नाहीं अशी आशा वाटते. तथापि हें काम कितपत सुयंत्र चालतें तें, अनुभवाशिवाय कळणें कठीण असल्यामुळें, या वर्षीं कसा काय अनुभव येतो तो पहाण्याकडे पुष्कळांचें लक्ष्य वेधणें हें सहाजिक आहे. ह्मणून त्यासंबंधानें थोडासा जास्त विस्तार करण्याचें धाडस करीत आहों.

वर दर्शित केल्याप्रमाणें 'कार्यकारी मंडळी' नेमण्यांत येऊन, तिचे नियम येणेंप्रमाणें ठरविण्यांत आले आहेतः—

# नियम.

## सनातन भारतधर्म–महापरिषदेच्या कार्यकारी मंडळीचे नियम.

महापरिषदेच्या मुख्य नियमपत्रकांतील नियम ६ तील पोट नियम ३ प्रमाणें पुढील नियम करण्यांत येत आहेतः——

१. कार्यकारी मंडळींत १ अध्यक्ष, ३ उपाध्यक्ष, ५ सन्मान्य मंत्री, ५ कार्यकारी मंत्री, जरूरीप्रमाणें १ किंवा २ कोशाध्यक्ष ( खजिनदार ) व सभासद २५ पासून ३५ असावे. यांत कमीजास्त संख्या करण्याचा अधिकार, कार्यकारी मंडळीस आहे.

२. कार्यकारी मंडळीचें काम, पोटनियम १ प्रमाणें महापरिषदेच्या प्रमुख कार्यालयाकडून होणार असल्यामुळें, सदर्हू कार्यकारी मंडळींतूनच प्रमुख कार्यालयाचें काम करण्याकरितां दोन मंत्री निवडण्यांत यावे. तसेंच त्यांस सहाय्यकारी मंडळी म्हणून, कार्यकारी मंडळींतील दहा इसमांची एक मंडळी असावी. 'प्रमुख कार्यालयाच्या मंत्र्यांनीं' सर्व काम, कार्यकारी मंडळीच्या अनुमतानें चालवावें व वेळोवेळीं सहाय्यकारी मंडळीचें अनुमत घेत जावें. जरूरप्रसंगीं कार्य–कारी मंडळीपुढें प्रकरण ठेऊन, त्यांच्या निकालाप्रमाणें कामचालवावें.

३ ठरलेल्या संख्येच्या एक तृतीयांशाइतके गृहस्थ हजर असल्यावांचून कार्यकारी किंवा सहाय्यक मंडळीचें काम चालूं नये.

४. पोटमंडळ्यांची व्यवस्था लावणें वगैरे सर्व कामें, कार्यकारी मंडळी ठरवील त्याप्रमाणें व्हावीं.

५. कार्यकारी मंडळीस जरूरप्रसंगीं सल्लामसलत घेण्यासाठीं एक 'सन्मान्य सहाय्यकारी मंडळी' म्हणून ठरविण्यांत यावी. तींत, कार्यकारी मंडळीशिवाय असलेल्या विद्वान्, लोकमान्य व स्वधर्मपरायण इसमांच्या नेमणुका, सहाय्यकारी मंडळीच्या विचारें, प्रमुख कार्यालयाच्या मंत्र्यांनीं कराव्या व त्या कार्यकारी मंडळीस कळविण्यांत याव्या.

६. या नियमांत फेरफार करण्याचा किंवा जास्त नियम करण्याचा अधिकार, कार्यकारी मंडळीस आहे."

या नियमांप्रमाणें एकंदर काम चालेल. सर्व व्यवहार करावयाचा तो, प्रमुख कार्यालयाचे मंत्री यांच्याशीं करावा. त्यांजमार्फत सर्व खुलासा होऊं शकेल. ( १ ) कार्यकारी मंडळी, ( २ ) सन्मान्य सहाय्यकारी मंडळी, ( ३ ) सहाय्यकारी मंडळी, ( ४ ) 'आश्रयदाते' व ( ५ ) 'हितचिंतक' वगैऱ्यांच्या नांवाची टीप, जरूरीप्रमाणें व सवडीप्रमाणें स्वतंत्र रीतीनें किंवा वर्तमानपत्रांतून, व पुढें सभेच्या 'वार्षिक इतिहासपत्रकां'तून प्रसिद्ध करण्यांत येतील.

या प्रमाणें ही महापरिषदेच्या व्यवस्थेची हकीकत आहे. येथें पुनः आमची सर्व हिंदुबांधवांस सविनय प्रार्थना आहे कीं, त्यांनीं एकदिलानें व कळकळीनें या कृत्यास होईल तितकी मेहनत व घस सोसून हातभार लावणें फार अगत्याचें आहे.

यंदाची पहिलीच महापरिषद् भरविणें आहे. ती प्रथमतः पुण्यास, राष्ट्रीयसभेच्या वेळीं डिसेंबरांत ( १८९५ ) भरविण्याचा हेतु होता. पण सामाजिक परिषदेचा बखेडा उडून, तो मिटविण्यांत सर्व लोक गुंतल्यामुळें व राष्ट्रीयसभेच्या महत्कार्यास या बखेड्यानें धोका पोंचतो कीं काय या भीतीनें, अशा स्थितींत तेथेंच या महापरिषदेचा आरंभ करणें योग्य होणार नाहीं अशा सूचना झाल्यावरून तो विचार रहित करण्यांत आला. व जेथून मूळ ही कल्पना निघाली, त्या मुंबई शहरासच या महापरिषदेचा पहिला समारंभ करण्याचें ठरलें आहे. सर्व ठिकाणच्या लोकांना येण्यास सोयिस्कर पडावें म्हणून व कित्येक सर-

कारी कामांशीं संबंध असणारांनां सुट्टीची सवड सांपडावी ह्मणून, चैत्र वद्य ६।७ व ८ शके १८१८ (सन १८९६ एप्रील तारीख ३,४ व ५) हे तीन दिवस, ही महापरिषद् मुंबईस भरविण्याचें ठरविलें आहे. त्या वेळीं येणाऱ्या मुखत्यारांची व्यवस्था कशी राहील, त्यांचे नियम काय आहेत वगैरे प्रकारची सर्व माहिती, 'प्रमुख कार्यालया'च्या मंत्र्यांकडे एक आणा पाठवून मागितली असतां पाठविण्यांत येईल. व इतरही लागेल तो खुलासा करण्यांत येईल. तथापि या भरणाऱ्या महापरिषदेंत यंदाच्या वर्षी कोणकोणते ठराव पसंत करण्यांत यावे याबद्दल ज्या सूचना झाल्या आहेत, त्या यापुढें संक्षेपांत दाखल करण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय ज्या कोणाच्या आणखी सूचना असतील किंवा याच सूचनांत कांहीं फेरफार करणें असेल, तर तें सर्व लिहून, सहीनिशीं 'प्रमुख कार्यालया'च्या मंत्र्यांकडे पाठविण्याची व्यवस्था व्हावी. मात्र त्या सूचना, नियमांस व हेतूस अनुसरून आणि सनातन हिंदु धर्मातील सभ्य गृहस्थांकडून आल्या पाहिजेत. तसेंच त्या सूचनांविषयीं आणखी ज्यांची संमति असेल, त्यांच्याही सह्या केलेल्या असाव्यात. सह्या करतेवेळीं, सही करणाराचें पूर्ण नांव व बरोबर पत्ता स्पष्ट रीतीनें देशभाषेंत लिहिलेला असावा.

## मुंबईस भरणाऱ्या-महापरिषदेंत पुढील प्रमाणें ठराव व्हावे अशा सूचना झाल्या आहेतः—

ठराव १ ला —हल्लीं ज्याला हिंदुस्थान ह्मणतात हा देश हिंदूंचा; येथें 'हिंदूधर्म' चालतो. हिंदु धर्मांतील लोकांत अनेक संप्रदाय व पंथ आहेत. तथापि त्यांच्या सार्वमनिक अडचणी सारख्याच आहेत. धर्माचा पाया एकाच तत्त्वेवर असून, सर्व जातींच्या व पंथांच्या निरनिराळ्या 'पंचाईत' संस्था किंवा त्यासारखीं सुरेख बंधारणें असल्यामुळें, सर्व हिंदूंची सामाजिक स्थिती नियंत्रित आहे. या बंधारणाशिवाय दुसऱ्या बंधारणाची, अर्थात् राजकीय रीतीनें (कायद्याचें) सरकारी बंधारण, आमच्या हिंदुसमाजात असण्याची बिलकूल जरूरी नाहीं.

ठराव २ रा.—हिंदूंत निरनिराळे पंथ व वर्णाश्रमव्यवस्था असली तरी, कोणी कोणास शत्रुत्वानें मानण्याची मुळींच जरूरी नाहीं. ज्याचे त्याचे आचार सुधारणें किंवा सतत चालविणें हें त्या त्या जातीच्या पंचांचे व त्यांचे जे आचार्य मानले जात आहेत त्यांचें काम आहे. ह्मणून इतरांनां त्यांत ढवळाढवळ करण्याचा मुळींच हक्क व जरूर पोंचत नाहीं. ज्या गोष्टी, सर्वसाधारणपणें सर्व हिंदु लोकांनां सारख्या उपयोगी पडतील, तेवढ्याच गोष्टींचा विचार करून, त्या सर्व लोकांपुढें मांडणें हें या महापरिषदेचें काम आहे.

ठराव ३ रा.—ज्या जातींत ज्ञातिबंधारणें उत्तम आहेत, त्यांनीं तीं संभाळून वागावें, आणि ज्यांचीं बंधारणें अव्यवस्थित होण्यासारखीं झालीं असतील, तीं त्यांनीं आपल्या रिवाजास अनुसरून सुधारावीं, आणि आपल्या ज्ञातीची उन्नती, दुसऱ्या कोणाचें नुकसान करण्याचा हेतू न ठेवितां, शांतपणें, हिंदुधर्माच्या रीतिरिवाजांस पाहून करावी.

ठराव ४ था.—शिक्षणाची वृद्धि व व्यवस्था असणें फार आवश्यक आहे. आपल्या देशाची दिवसेंदिवस दरिद्र स्थिती होत चालल्यानें, आपल्या धर्मशिक्षणास बरीच कमतरता येऊं लागली आहे. ह्मणून सर्व लोकांच्या हितासाठीं व हिंदु धर्माचा वर्णाश्रमसंबंधी रीतिरिवाज ध्यानांत ठेवून, आपल्या सर्व हिंदु गृहस्थांनां उपयोगी पडण्यासाठीं वेद, शास्त्रें, स्मृति, पुराण, धर्मकर्म, व्यवहार, नीति व देशभाषा वगैरे संबंधीं शिक्षण वाढविण्याचा, व त्या शिक्षणांत धर्मशिक्षणाचा संबंध, तत्त्वशः सर्वांस उपयुक्त होईल असा ठेवण्याचा प्रयत्न होणें फार

जरूर आहे. हें काम, महापरिषदेकडून हळूहळू सुरू झालें पाहिजे. आणि म्हणून इच्या कार्यकारी मंडळीनें या बाबत एक स्वतंत्र मंडळी नेमून, तिच्या सूचनेप्रमाणें विचार करून हा शिक्षणाचा क्रम जरूर सुरू करावा.

**ठराव ५ वा.**—मद्यपान न करण्याविषयीं एकंदर हिंदुस्थानांत फार लक्ष दिलें जात होतें. हल्लीं तें लक्ष, कमी होत चालल्याचें दिसूं लागलें आहे ही गोष्ट फार शोचनीय आहे. ज्या जातींत हा प्रकार अगदीं बंद करण्यांत आला आहे, व ज्या जातींत कांहीं काल व प्रसंगापुरता बंद केला आहे, तो, धर्माच्या कायद्यांनीं सक्त रीतीनें जखडला आहे या बाबतींत निरनिराळ्या जातींचीं काय काय धोरणें ठरलेलीं आहेत व तीं कितपत अमलांत आहेत, याविषयीं जातींच्या पुढाऱ्यांकडून, पंचां कडून किंवा अशाच प्रकारच्या ज्ञातींतील प्रमुख अशा लोकांकडून माहिती कळण्यासाठीं, सर्वांकडे पत्रें पाठवून व ती माहिती आणून, सर्व हिंदूंस कळण्यासाठीं प्रसिद्ध करावी.

**ठराव ६ वा.**—गोवध होणें हें हिंदूंच्या धर्मानें अगदींच त्याज्य मानलें असून, त्यामुळें व्यावहारिक स्थितीवरही फार वाईट परिणाम होत असल्याबद्दल, आणि म्हणून तो बंद करण्याबद्दल, गोरक्षण मंडळ्या प्रयत्न करीत आहेत. याबद्दल ही महा परिषद् त्यांची आभारी असून, त्यांस लोकांनीं सरळ रीतीनें आणि योग्य मदत करावी अशी शिफारस करीत आहे.

**ठराव ७ वा.**—आपल्या धर्मास अनुसरून उपयोगीं पडण्यासारखी, आपल्या आरोग्याची खबरदारी ठेवण्यासाठीं आपलें वैद्यक तयार करण्यांत आलें होतें. अशा आधारभूत विद्येचा लोप होत आहे, म्हणून त्या विद्येला उत्तेजन येण्यासाठीं जागजागीं आर्यवैद्यकोक्त दवाखाने, आपल्या लोकांसाठीं स्थापन करण्याची, व चांगले शिक्षित वैद्य उत्पन्न होण्यासाठीं एक मंडळी नेमावी व ती सुचवील त्याप्रमाणें जितका प्रयत्न होऊं शकेल तो करून, त्याबद्दलची हकीकत सर्वत्र प्रसिद्ध होऊन, पुढच्या महापरिषदेंत त्याबद्दल आणखी कांहीं समाधानकारक विचार करतां येईल अशी तजवीज करावी.

**ठराव ८ वा.**—पुढची व्यवस्था ठरविणें, वगैरे, वगैरे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# THE ORIGIN OF MORALS

BY

## SIMEON BENJAMIN.

# नीत्युत्पत्ति

मराठी ग्रंथ संग्रहालय नं० ठाणे

हें पुस्तक

सिमियन बेंजामिन यांनीं केलें.

मुंबईंत
मसीदबंदर रेल्वे स्टेशनासमोर
ऑंग्लो जुईश ऑंड व्हर्न्याक्युलर छापखान्यांत छापिलें.
सन १८८३

किंमत २ आणे.

## स्त्रियांस फारच अगत्याची सूचना.

# ग्रांट मेडिकल कॉलेजांत पास झालेली सुईण

मिसेस रेबेका सिमियन "सुईण" व "कुटुंबमंत्री" ह्या पुस्तकांची कर्ती यांनीं एकसारखें ९ वर्षें मुंबईंत, बाहेरगांवीं, व राजेरजवाड्यांत मिळून अनेक जातींच्या लोकांत सुईणीचें काम करून फार चांगला अनुभव मिळविला आहे; व ह्या अनुभवाबद्दल त्यांस अनेक गृहस्थांकडून, मोठमोठ्या नामांकित डाक्टरांकडून, व रजवाड्यांतून अशीं एकंदर शंभरां (१००) हून अधिक सरटिफिकिटें (दाखलपत्रें) मिळालीं आहेत. त्यांमधून फक्त डाक्टरांच्या सरटिफिकिटांपैकीं पांच सरटिफिकिटांचे संक्षिप्त उतारे दिले आहेत त्यांवरूनही बरीच खात्री होईल.

१. "मिसेस रेबेका सिमियन फार हुशार सुईण आहे. प्रसूति व स्त्रियांचे रोग ह्या संबंधीं ह्या सुईणीच्या ज्ञानाची परीक्षा पाहण्याचे मला अनेक प्रसंग आले आहेत."— **डाक्टर पी., जॉन डिसोझा.**

२. "मिसेस रेबेका सिमियन, चांगली अनुभविक पास झालेली सुईण आहे. ह्यांची आपल्या कामांत वाकबगारी व प्रतिष्ठितपणा पाहिल्यावरून ह्यांची मी मोठ्या आनंदानें शिफारस करितों."— **डाक्टर ए. डागामा, एम. डी. फिझीशियन.**

३. "ह्या सुईणीला मी पांच वर्षें ओळखतों. रोगी बायांची व्यवस्था करण्यांत ह्यांची वाकबगारी पाहण्याचे मला पुष्कळ प्रसंग आले आहेत."— **डाक्टर थॉमस ब्लेनी.**

४. "ही सुईण आपल्या कामांत हुशार आहे. मी स्त्रीरोगचिकित्सा करते वेळीं, लाजाळू रोगी बायांला ह्या सुईणीनें माझ्यासाठीं अनेक वेळां तपासून रोगपरीक्षा माझ्या पूर्ण खात्रीलायक केली आहे"— **डाक्टर सी. एच. एफ. अंडरवुड, सर्जन. इत्यादि.**

५. "ह्या सुईणबाई प्रतिष्ठित, आपल्या धंद्यांत फार हुशार व अनुभविक आहेत. सर्व लोकांनीं ह्या सुईणीच्या ज्ञानाचा व अनुभवाचा प्रसंगानुसार उपयोग करून घ्यावा अशी मी मोठ्या आनंदानें शिफारस करितों."— **वैद्य जटाशंकर विठ्ठलजी.**

असअसों उत्तम प्रकारचीं सरटिफिकिटें मिळालीं आहेत. तर स्त्रियांला प्रसूत करणें, बाळकाची व बाळंतिणीची व्यवस्था ठेवणें, स्त्रीरोगपरीक्षा करणें त्यांवर उपचार करणें वगैरे कामें करविणें असल्यास ह्या सुईण बाईस भेटावें. ह्या सुईण बाईनें स्त्रीयांला मोठ्या उपयोगाचे असे पट्टे तयार केले आहेत. त्यांजबद्दल जाहिरात दुसरीकडे दिली आहे ती पाहावी.

**सुईणबाईचें राहण्याचें ठिकाण.**—मुंबई, पायधुणीच्या समोरील (बंबखान्यासमोरील) नाक्यावरचें १ ले घर नं० ७१, पहिला मजला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०

# The Origin of Morality.

# नीत्युत्पत्ति.

(ह्या विषयावर मि. सिमियन बेंजामिन यांनीं धैर्यवर्धक सभा, बुद्धिवर्धक सभा, आर्यसमाज वगैरे ठिकाणीं व्याख्यान दिलें असून त्यावर मोठमोठ्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध अशा जनांनीं वादविवाद करून ह्या विषयाची सत्यता पटवून घेतली आहे. तथापि अजूनही कोणी कांहीं योग्य सूचना केल्यास त्यांचा कृतज्ञतापूर्वक विचार होईल.)

**अध्यक्ष महाराज व सद्गृहस्थ हो,**

आजचा आपला विषय, नीतीची उत्पत्ति हा आहे. एवढ्या ह्या मोठ्या महत्वाच्या विषयावर कदापि मतभेत होऊं नये असें समजणारा एक तरी गृहस्थ ह्या एवढ्या जमलेल्या मंडळींत असेल असें मला वाटत नाहीं. कारण ह्या सभेच्याठाईं विराजमान झालेली मंडळी मोठी समजूतदार असल्या कारणानें, बहुतकरून प्रत्येक विषयांत मतभेद असायाचा हें ती चांगली जाणून आहे. मतभेद पडणें ह्यांत कांहीं वाईट नाहीं, तें उलटें चांगलें. मात्र त्याचा योग्य रीतीनें उपयोग करून घेतला पाहिजे, परस्परांच्या मतांला परस्परांनीं स्थान दिला पाहिजे, त्याविषयीं आपापल्या अंतःकरणांत उदारबुद्धि ठेविली पाहिजे आणि वादांत पडलेल्या गोष्टीचा मोठ्या शांतपणें, नम्रपणें व केवळ सत्यप्रीतीनें शोध केला पाहिजे. मनुष्यमात्राचें जर कोणत्याही गोष्टीनें कल्याण होणें असेल, तर तें मिथ्या गोष्टी, मिथ्या समज, मिथ्या आचार ह्यांत कदापि नसायाचें. तें अवश्यमेव सत्यामध्येंच असलें पाहिजे. जो विषय मीं हातीं घेतला आहे तो जसा मला सत्य ह्मणून वाटतो तसा आपणापुढें मी ठेवणार आहें आणि ह्या पलीकडे मी किंवा कोणीही काय करूं शकेल व कोणी काय करावें ? एवढें मात्र खरें कीं, कोणताही विषय प्रतिपादन करायचा तो खरेपणानें, मोठ्या प्रीतीनें, नम्रपणें आणि शुद्ध भावानें केला पाहिजे. त्यांत कोणाचा उपहास, कोणाची हेळणा, थट्टा असूं नये. तसाच मताभिमान नसून केवळ सत्याभिमान असावा अशा योग्य प्रकारांला अनुसरून सर्वांनीं वागावें हें उचित आहे,

सकल मानव प्राणी नीतिधर्माच्यायोगेंकरून परस्परांस जसे बांधून गेले आहेत तसे ते दुसऱ्या कोणत्याच गोष्टीच्या योगानें बांधलेले नाहींत. आणि त्यांचें सुख सर्व प्रकारांनीं नीतिधर्माचरणावर जसें अवलंबून आहे तसें दुसरें कशावरच नाहीं; किंबहुना त्यावरच सर्वस्वीं अवलंबून आहे असें ह्मटलें असतां चालेल. पहा, नीतीचें उल्लंघन करणारे लोक किती अपकीर्ति पावतात, किती बिचारे हाल अपेष्टा भोगतात आणि किती बापुडे प्राणासही मुकतात. दुसरें, आपण असें नित्य पहातों कीं, कोणी मोठा श्रीमान् असो अगर गरीब असो, तो स्वतः नीतिमान् असो किंवा अनितीमान् असो, पण त्याची अंतःकरणापासून अशी कांहीं इच्छा असते कीं, माझ्या मुलांनीं मुलींनीं, स्त्रीनें वगैरे सर्व कुटुंबांतील मनुष्यांनीं नीतीनें वागावें. आणि तीं नीतीनें वागलीं ह्मणजे त्यास मोठें सुख वाटतें. संसारांत पडून आपण कृत कृत्य झालों, मोठे भाग्यशाली झालों, असें त्यास वाटूं लागतें. पण जर करितां त्याच्या कुटुंबांतील कोणा एका मनुष्याचें वावगें पाऊल पडलें ह्मणजे, मग तो किती जरी संपत्तिमान् असला, केवढी जरी सत्ता त्याजला असली, हवें तेवढें ऐश्वर्य त्याजला प्राप्त झालेलें असलें तरी, आपल्या कुळास बट्टा लागला, आपल्या नांवावर कालिमा आला, आपण अतिदुःखी, अतिहतभाग्य, अतिदीन असें तो आपणास समजतो; त्याच्या साऱ्या सुखाचा भंग होतो, त्याला मिष्टान्नाचे सुग्रासही विषतुल्य भासूं लागतात. किंबहुना अति प्रिय असा जो प्राण तोही ह्या लज्जेच्या योगेंकरून नकोसा होतो. तर मग नीतीचा प्रसार होणें हें मानवी सुखास किती अवश्यक आहे बरें!! पण असें ह्या नीतिधर्माचें माहात्म्य असतांही जगांत यथास्थितपणें नीतीनें आचरणारांची संख्या किती अत्यल्प आहे! बहुतकरून जिकडे पहावें तिकडे अनीतीच्या योगानें उत्पन्न झालेला अनाचार, कुकर्में व दुष्टपणा, आणि ह्यांपासून उद्भवणारा शोक असमाधान, हायहाय, असुख इत्याद्यनेक दुःखें दृष्टोत्पत्तीस येतात ही मोठी खेदोत्पादक गोष्ट होय. आणि ह्यापेक्षांही अति सखेदाश्चर्योत्पादक गोष्ट ही कीं, जगामध्यें नानातऱ्हेचे धर्म व नानतांऱ्हेचे पंथ चालू आहेत व ते मनुष्यास नीतिमान् करण्याला आपापल्या परीनें झटताहेत. लोकांनीं नीतीनें वागावें ह्मणून त्यांना सुखाची आशा उत्पन्न होण्याकरितां स्वर्ग सुखाच्या संबंधानें, तोंडाला पाणी सुटेल अशा खाण्यापिण्याच्या पदार्थांचें,

विषयसुखवासना उत्पन्न होण्यासारख्या ऐषआरामाचें, धनद्रव्याचा वळकट लोभ उत्पन्न होण्यासारख्या धनाच्या सुंदरतेचें, कोणी अक्षय जीवनाचें, कोणी पुनरुत्थानाचें, कोणी मृत सोयरीं भेटण्याचें, कोणी कशाचें, कोणी कशाचें, अशीं नानातऱ्हेचीं वर्णनें अनेक धर्मी लोकांच्या पुस्तकांत केलीं आहेत. हें सुखाशेच्या संबंधानें झालें. ह्याच्या उलट शिक्षेच्या वर्णनाच्या संबंधानें कांहीं उणीव ठेविली आहे असें नाहीं. त्याचीही परिपूर्णता करून सोडिली आहे. गरुडपुराणासारखे, अंगावर रोमांच उभे करून तें कंपायमान करण्याजोगे नरकाच्या वर्णनाचे ग्रंथ मानवकल्पनेची शिकस्त करून तयार केले आहेत. कोणी अग्नि गंधकाच्या कुंडांचें, विंचवा सर्पांच्या दंशांचें, वेताच्या चाबुकांच्या फटक्यांचें अशीं नानातऱ्हेचीं वर्णनें केलीं आहेत. पण अरेरे, हीं सर्व वर्णनें ग्रंथांतल्या ग्रंथांतच राहिलीं आहेत. नाहींत का बरें? यांच्यानीं झालें तर कांहीं मनोरंजन होण्याचा मात्र संभव आहे. लोकांच्या आचरणावर नीतीच्या संबंधानें त्यापासून बहुतकरून कांहींच परिणाम झाला नाहीं, असें ह्मटलें असतां चालेल. यास चांगले सबल प्रमाण पाहिजें असल्यास गृहस्थ हो, जगाच्या मागील व सांप्रतच्या स्थितीचें अवलोकन करा. हें होत नसल्यास कांहीं जिन्नस खरेदी करण्याच्या उद्देशानें मार्किटांत जा आणि लोकांत सत्यता, लीनता, सचोटी, प्रामाणिकपणा, सौजन्य इत्याद्यनेक नीतीचे प्रकार कितपत वसताहेत ह्याचें अवलोकन करा, ह्मणजे आपली बरीच खात्री होइल. आतां एवढे हे लोकांचे जगाला नीतिमान् करण्याविषयीं भगीरथप्रयत्न असूनही, एवढ्या देवदेवता, इतकीं धर्मकर्में, इतक्या पूजाअर्चा, इतकीं होमहवनें, इतकें अर्पणतर्पण, एवढीं उपासव्रतें, इतक्या नमाजबंदग्या, इतक्या प्रार्थना उपासना आज हजारों वर्षें लोकांमध्यें प्रचारांत असतांही जगांत एवढी अनीति कां, ह्याचें कारण स्थूलदृष्ट्या पाहिलें असतां फार विस्मय होतो; तरी पण, सूक्ष्म दृष्टया पाहूं गेलें असतां त्याजविषयीं फारसें आश्चर्य वाटणार नाहीं. कारण जगांत नीतीचा प्रसार व्हावा एतदर्थ लोकांचे सर्व प्रकारें वास्तविक जसे प्रयत्न असावेत तसे नाहींत. त्यांस नीति म्हणजे काय, नीतीनें आपण वागावें कां, नीतीनें वागायाला आपण कां व कोणत्या प्रकारें बांधून गेलों आहोंत, नीतीचें अगदीं प्राणापलीकडेही पालन करण्यांत आपलें व

सर्व जगाचें काय हित आहे, नीतीचें उल्लंघन केल्यानें एखादे वेळेस मोठ्या लाभाचा जरी प्रसंग येत असला तरी तिचें उल्लंघन कदापि करूं नये, ह्यांत तत्वांश काय आहे, तसेंच नीति आचरल्यानें एखादे वेळेस आपलें स्वतःचें मोठें नुकसान अथवा आपली मोठी हानि जरी होत असली तरी नीति आचरण्याचें सोडूं नये कां, वगैरे गोष्टी त्यांस कळत नाहींत. नीतीनें वागणें यांत सुख आहे, तें योग्य आहे व तें आपलें कर्त्तव्य आहे हें त्यांच्या ध्यानीं मनींही नसतें. मानलेल्या धर्म कर्मांतच आपलें ऐहिक व पारमार्थिक सुख आहे व तीं आचरणें हेंच कायतें आपलें कर्त्तव्य कर्म आहे असेच बहुतेकांचे समज झाले आहेत; ह्मणून आपण पाहतों कीं, हिंदू उठून देवळांत जातो आणि घांटा वाजवून मूर्त्ति सभोंवतीं प्रदक्षिणा फिरून व त्याच्यापुढें लोटांगणें घालून परत घरीं येतो; मुसलमान मशिदींत जातो आणि हातपाय धुवून निमाज पढतो आणि त्या संबंधानें आपलें कर्त्तव्य झालें असें समजतो. ख्रिस्ती प्रार्थना करून शिवाय प्रभुभोजनही घेतो आणि आपापल्या मंडळीच्या चालत आलेल्या पद्धतीप्रमाणें दुसरेही कांहीं प्रकार करितो. पारशांची ह्यापेक्षां श्रेष्ठ गोष्ट आहे असें नाहीं. समुद्र तीरीं जाऊन कांहीं वाचनपाठ झाला, कसतीच्या व अग्नीच्या संबंधानें नियमीत कर्म यथास्थित घडलें आणि कांहीं प्रसंगाच्या संबंधानें स्पर्शास्पर्शाविषयीं जपलें ह्मणजे त्यांचें बरेंच कार्य अटोपलें. इस्राएलांच्या नमाजी, रोजे, सणसुदीस व शनिवार इत्यादिकांची पाळणूक, आणि धर्मसंबंधीं कांहीं विधि इत्यादिकांच्या संबंधानें व्यवस्था ठेविली कीं बहुतेक कार्यभाग आटोपला. ह्याचप्रमाणें दुसऱ्या अनेक लोकांची स्थिति. ह्याच्या योगानें मानवाच्या मनावर सद्गुणाच्या संबंधानें काय व कसा परिणाम होणार?

लोकांना नीतिमान् करण्याचे उपाय अनेक आहेत; पण त्या सर्वांचा विचार एवढ्या थोड्याशा वेळांत होईल असें नाहीं व तसें करण्याचा आपल्या आजच्या व्याख्यानाचा उद्देशही नाहीं. तर जे कांहीं उत्तम उपाय ह्मणून मला वाटतात त्यांपैकीं फक्त एकाविषयीं विचार करायाचा आहे. "नीति ह्मणजे काय, नीतीनें आपण वागावें कां, नीतीनें वागायाला आपण कां व कोणत्या प्रकारें बांधून गेलों आहोंत," वगैरे गोष्टी ज्या थोड्या वेळापूर्वी वर्णिल्या आहेत, त्यांजबद्दल लोकांस समज पाडणें, अर्थात् नीतीविषयीं लोकांची खरी समजूत करणें हा एक उत्तम उपाय आहे असें

मला वाटतें. ह्या गोष्टींचा ज्या मनुष्यास चांगला समज पडून त्या जर त्याच्या हृदयांत चांगल्या बिंबतील तर नीतिमार्गापासून त्याचें पाऊल सहसा ढळणार नाहीं. कारण, मनुष्य जी गोष्ट समजानें करूं लागला असतां जशी चांगली, आस्थेनें व खऱ्या मानानें करितो तशी, कोणाच्या सांगण्यावरून, भीतीवरून किंवा बक्षिसाच्या लालुचीवरून करीत नाहीं.

हीच गोष्ट नीतीच्या संबंधानेंही लागू आहे. ह्मणून नीति ह्मणजे काय, नीतीनें आपण अवश्य वागावें कां वगैरे गोष्टी आपणास अगत्य कळल्या पाहिजेत; पण ह्याबद्दल चांगला समज होण्याला नीति उत्पन्न कशी झाली हें कळणें, हें बऱ्याच अंशीं कारणीभूत होतें आणि त्याच्या योगानें सुविचारी मनुष्याच्या मनाच्या ठायीं सद्गुणाचें दृढावलंबन करण्याविषयीं मोठा निग्रह उत्पन्न होतो असें आढळलें आहे. ह्मणून नीत्युत्पत्ति हा विषय विचार करण्याकरितां आज घेतला आहे.

जगामध्यें नानातऱ्हेचीं कलाकौशल्यें, शोधसाधनें, विद्या हुन्नर उपयुक्तशास्त्रें, हीं कशीं उत्पन्न झालीं हें समजल्यानें नीतीची उत्पत्ति कशी झाली असावी हें ध्यानांत येण्याला सुलभ पडेल ह्मणून प्रथमतः त्याविषयीं ह्मणजे कलाकौशल्यें इत्यादिकांच्या उत्पत्तीविषयींआपण आधीं विचार करूं.

**कलाकौशल्यें, विद्या हुन्नर यांच्या उत्पत्तीचा संक्षिप्त वृत्तांत.**

ह्या भुगोलावर जेव्हां प्रथमच मनुष्यें उत्पन्न झालीं त्यावेळेस तीं नानातऱ्हेच्या उपयुक्त कला, ज्या हल्लीं उपलब्ध आहेत, त्याविषयीं अजाणतीं असतील ह्यांत संशय नाहीं. ह्यावरून असें अनुमान होतें कीं, जेव्हां त्यांस तहान लागली असेल तेव्हां त्यांनीं नदी, ओढा किंवा दुसऱ्या कसल्या पाण्याच्या संचयाजवळ जाऊन ओंजळीनें अथवा झाडांच्या पानांनीं पाणी पिऊन किंवा रसाळ फळें खाऊन आपली तृषा भागविली असेल; त्यांस क्षुधा लागली असेल तेव्हां त्यांनीं कंदमुळें, झाडांवरील फळें, नानातऱ्हेच्या शाकभाज्या खाऊन आपली क्षुधा शमविली असेल; त्यांस उष्णता झाली असेल तेव्हां झाडांच्या छायेखालीं बसून शीतलवायूच्या योगानें त्यांनीं तिचें निवारण केलें असेल; त्यांस थंडीचा कडकपणा भासला असेल तेव्हां त्यांनीं आगट्या पेटवून त्यांच्या सभोंवतालीं बसून थंडीचें उपशमन केलें असेल. पण असे दिवस लोटतां लोटतां त्यांनीं अनेक गोष्टींच्या संबंधानें अवलोकन करून व अनुभव घेऊन आपलें ज्ञान वाढविलें असावें,

आपल्या सोयीचे पदार्थ उत्पन्न केले असावेत आणि नानातऱ्हेच्या गोष्टींच्या संबंधानें नियम बांधले असावेत. जसें, कंदमुळें, फळें वगैरे खातां खातां असें आढळलें असेल कीं, अमुक फळें पुष्टिकारक किंवा क्षुधाशामक कमी व अमुक अधिक आहेत; कोणतीं नाशक व कोणतीं हितावह आहेत; तसेंच हातांनीं व पानांनीं पाणी पितां पितां त्यांस सुचलें असेल कीं, ह्यापेक्षां कित्येक पानें काटयांनीं वगैरे एकत्र केल्यानें पाणी पिण्यास सोईवार पडतील. ह्यावरून द्रोणाचा अनुभव घेतला असेल. तसेंच, एक दगड दुसऱ्या दगडानें खोदून त्यांत खळगा केला असेल व तो दगड पाणी वगैरे ठेवण्यास लावला असेल किंवा त्यामध्यें दुसऱ्या दगडांनीं फळांच्या आटया, बिया वगैरे फोडण्याकरितां खलबत्याप्रमाणें त्याचा उपयोग केला असेल. चिखलाचा गोळा घेऊन भांडयाप्रमाणें त्यांत पोकळी करून त्याचा पाणी ठेवण्याला उपयोग केला असेल, मग तें उन्हानें कांहीं वाळलें असेल आणि मग त्यांस असें वाटलें असेल कीं वाळल्यानें टणक होतें मग त्यांनीं त्या भांडयांचा उपयोग करण्यापूर्वीं तीं उन्हानें चांगलीं वाळविलीं असतील. पण लौकरच त्यांस आढळलें असेल कीं हीं भांडीं लौकर फुटतात ह्मणून त्यांस अधिक उष्णता असली पाहिजे. असा विचार सुचल्यावर त्यांनीं आपल्या शेकायाच्या आगटींत तीं भाजलीं असतील. अशा क्रमेंकरून अवलोकनाच्या व अनुभवाच्या योगानें ह्या उपयुक्त कला सुधारत सुधारत आल्या असतील असें अनुमान होतें. पुढें हत्यारांच्या संबंधानें पाहूं गेलें असतां असें वाटतें कीं, प्रथम फळें वगैरे हातांनीं तोडलीं असतील परंतु उंच उंच असणारीं फळें हातास येत नाहींत असें पाहून त्यांना असें सूचलें असेल कीं एखाद्या झाडाची लांबशी काटी तोडून ती, उंच असणारीं फळें तोडण्याच्या उपयोगात लावावी. ती काटी चिवट असल्यामुळें तुटली नसेल ह्मणून त्यांना असें सुचलें असेल कीं, एखाद्या धारेच्या दगडानें ती कापावी. अशा रीतीनें ह्मणजे जसजशी अडचण आली असेल तसतसें त्यांनीं त्या अडचणींतून पार पडण्याचे उपाय योजिले असतील व जे जे उपाय सफळ झाले असतील ते ते त्यांचे अनुभवसिद्ध होऊन राहिले असतील व त्यांतही प्रसंगानुसार त्यांनीं सुधारणा केली असेल.

तसेंच अमक्या वेळेस सूर्य उगवतो, अमक्या वेळेस तो मावळतो,

इतक्या दिवस चंद्र कसा क्रमानें उगवतो व मावळतो, कशी अंधारी व चांदणी रात्र पडते, कोण कोणत्या मासांत उष्मा होतो, कोण कोणत्या मासांत पाऊस पडतो व कोण कोणत्या मासांत थंडी पडते; समुद्रास भरती ओहोटी कशी क्रमानें येते व कोणत्या दिवशीं कशी व किती अधिक उणी होते, ह्या अशा व इतर प्रकारच्या दुसऱ्या अनंत गोष्टींचें अवलोकन करून, खगोलविद्या, भूगोलविद्या, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र वगैरे शास्त्रें आपल्या अत्यल्पशा प्रकाशित किरणांसहित त्या वेळेस उत्पन्न झालीं असतील. आणखी प्रथम एका कोणाची प्रकृति बिघडली असतां त्यानें अमकी वनस्पति खाल्यानें अमका परिणाम झाला असेल ह्मणजे त्यास अधिक इजा झाली असेल किंवा गुण आला असेल तर त्याप्रमाणें दुसरा कोणी मनुष्य त्याच प्रकारें आजारी पडला असतां त्यासही ती पूर्वीं अनुभव घेतलेली वनस्पति दिली असेल व तिनें त्याला ही गुण आला असेल, असें करतां करतां वैद्यशास्त्र बनलें. अशा प्रकारें नानातऱ्हेच्या ज्ञानाचें मूळ झालें असावें असें अनुमान होतें. मनुष्य स्वाभाविक रीत्याच पूर्ण ज्ञानी असावा असें नव्हे. तर मनुष्यें आपल्या गरजे प्रमाणें, अवलोकनानें, व अनुभवानें ज्ञान करून घेतात व अशाच रीतीनें तें वाढवितात व उपयोगास लावतात. ह्मणूनच आपण पाहातों कीं, मागें ज्या अनेक उपयुक्त गोष्टी नव्हत्या त्या आतां आहेत, व आतां नाहींत त्या पुढें होतील. कारण नवीन नवीन निघतच आहेत, मागल्यांत सुधारणा होतच आहे, कांहींकांच्या ऐवजीं नवीनच उत्तम प्रकारच्या उत्पन्न होऊन पूर्वींच्या पैकीं कांहीं रद्दही होताहेत, तेव्हां ज्ञान, सुधारणा व शोध, हीं गरज, अवलोकन व अनुभव ह्यांचीं फलें होत. असो. प्रत्येक जातीचीं कलाकौशल्यें, विद्या शास्त्रें वगैरे कशीं उत्पन्न झालीं हें सविस्तर सांगण्याचा आपला हेतु नाहीं; ह्मणून जें आपण कलाकौशल्यांच्या व शास्त्रांच्या उत्पत्तीविषयीं थोडें ह्मटलें आहे तें बस आहे. आतां वर जें कलाकौशल्यांचे उत्पत्तीविषयीं आपण ह्मटलें आहे त्याप्रमाणें वस्तुतः त्यांची व्यवस्था झाली असेल असेंच समजलें पाहिजें असें नाहीं; कारण अशी किंवा या सारख्या दुसऱ्या कांहीं प्रकारांनीं झाली असेल. पण एकंदर त्यांच्या उत्पत्तीची कल्पना प्रिय श्रोत्यांस आली म्हणजे पुरे. आतां ज्या गोष्टीची उत्पत्ति दाखविण्याकरितां हें एवढें म्हटलें

आहे त्याविषयीं ( नीतीच्या उत्पत्तीविषयीं ) विचार करूं.

**नीतीची उत्पत्ति.**—ह्यांत नीतीची उत्पत्ति कशी झाली, नीति ह्मणजे काय, व नीतीनें आपण वागावें कां ह्याविषयीं थोडक्यांत विचार होईल. पण एवढ्यानेंच नीतीच्या संबंधानें जे विचार कर्त्तव्य आहेत ते सर्व संपले असें नाहीं. नीतीच्या नियमांत उत्तरोत्तर सुधारणा झाली पाहिजे, सदसद्विवेकाच्या संबंधानें खरे विचार कोणते हें समजलें पाहिजे, वगैरे दुसऱ्याही कांहीं गोष्टी नीतीच्या विचारांत येतात; पण त्याविषयीं आजच विचार न करितां फक्त नीतीची उत्पत्ति वगैरे जें कांहीं प्रथमतः वर सांगितलें आहे त्याविषयीं थोडक्यांत बोलूं.

जशीं वर सांगितल्याप्रमाणें नानातऱ्हेचीं कलाकौशल्यें वगैरे हीं गरज, अवलोकन व अनुभव यांच्या योगानें उत्पन्न झालीं असावींत तद्वत् नीतीची-ही उत्पत्ति झाली असावी असें थोड्या विचाराअंतीं लक्षांत येइल. ह्या विषयाच्या संबंधानें जेवढें सविस्तर बोलावें तेवढें बोलतां येतें. पण अल्प-काळामुळें आपणांस तसें करितां येत नाहीं व तसें करण्याची फारशी जरूरी ही नाहीं कारण नीति उत्पन्न कशी झाली असावी अशा बद्दल साधारण कल्पना आपणास आली म्हणजे पुरे. मनुष्यें जेव्हां पृथ्वीवर वाढूं लागलीं तेव्हां त्यांत कित्येक उद्योगी व कित्येक आळशी असतील; तेव्हां असें झालें असेल कीं जे उद्योगी असतील त्यांनीं पाणी, कंदमुळें, फळें वगैरे निर्वाहाचे पदार्थ आणून ठेविले असतील व त्यांच्यावर लागलीच उपजीविका चालवून शिवाय त्यांहीं विचारीपणानें अथवा दूरदृष्टीनें दुसऱ्या दिवसासाठींही सामग्री करून ठेविली असेल. अशा उद्योगीपणानें त्यांचा उदरनिर्वाह त्या स्थितीच्या मानानें बरा चालून निरुद्योगी मनुष्यांची पोट भरण्याची मोठी मुष्कील पडली असावी. ह्मणून त्यांनीं, त्या उद्योगी मनुष्यांनीं केलेली सामग्री त्यांच्या नकळत किंवा बळजोरीनें नेली असेल. अशानें लोकांत गोंधळ होऊन आपण श्रम करून आणिलेल्या पदार्थांची सुरक्षता नाहीं असें त्यांस वाटलें असेल. तेव्हां सर्व मंडळीनें मिळून असा नियम केला असावा कीं, श्रम करून आणिलेल्या पदार्थांचा उपभोग ज्याचा त्यानेंच घ्यावा. त्यानें दिल्या शिवाय तो पदार्थ कोणींच घेऊं नये. जो घेईल तो मंडळी-च्या नजरेंत दोषी ठरून त्यास शिक्षा होईल. तेव्हां अर्थात् "चोरी करूं नये" हा नियम उत्पन्न झाला. तसेंच नवराबायकोचें नातें व त्या

पासून उत्पन्न होणारीं अनेक सुखकारक नातीं आपण आतां पाहतों तशीं प्रारंभीं नसतील. नवराबायकोचें नातें नसेल तेव्हां अर्थात् अव्यवस्था झाली असेल. अशा स्थितीनें लोकांत मारामाऱ्या उत्पन्न झाल्या असतील, रोग उद्भवले असतील, कामोत्पत्ति हद्दीबाहेर वाढून उद्योग व कामधंदे पडून राहिले असतील वगैरे नानातऱ्हेचे सुखनाशक परिणाम झाले असतील, तेव्हां मंडळीनें असा ठराव केला असेल कीं पुरुषांनीं व स्त्रियांनीं आपापले वधूवर निवडून घ्यावे व कोणताही पुरुष किंवा स्त्री त्या निवडून घेतलेल्या स्त्री किंवा पुरुषा शिवाय दुसऱ्या कोणाशीं गमन करील तर तो व ती हीं मंडळीचीं दोषी होत अशानें लग्नाची स्थापना होऊन दुसरा एक नियम झाला कीं "व्यभिचार करूं नये." पुढें अमुक कोण्यास्थळीं कंदमुळें, फळें इत्यादि वरींच आहेत अशा बद्दल कोणा एकास ठाऊक असतांही त्यांबद्दल कोणी विचारिलें असतां स्वार्थानें, मत्सरानें, किंवा कोणत्याही दुष्ट बुद्धिनें सांगितलें असेल कीं, छीः तेथें कांहीं नाहीं, किंवा जेथें नसतील तेथें होय विपुल फळें वगैरे आहेत असें सांगितलें असेल. तेव्हां अशा ह्यांच्या खोटें बोलण्यानें मंडळींतील लोकांची मोठी हानी झाली असेल व त्यांस व्यर्थ त्रास पडले असतील. तसेंच, "चोरी करूं नये" व "व्यभिचार करूं नये" असे जे दोन नियम सांगितले ते कोणी मोडिले असतां तीं कृत्यें पाहणारीं मनुष्यें खोटें सांगून म्हणालीं असतील कीं आह्मीं पाहिलें नाहीं. अशानें मंडळीचे मोठे तोटे आणि न्यायाचा अन्याय व अन्यायाचा न्याय होऊन मंडळीची अव्यवस्था व गडबड झाली असेल, तेव्हां आणखी एक असा नियम केला असावा कीं, "खोटें बोलूं नये." अशा प्रकारें नीतीचे दुसरेही नियम अनुभवानें बांधले गेले असून नीतीचे नियम करणारांस नीतिशास्त्रकर्ते, त्या नियमांस नीतिशास्त्र, ते नियम पाळणारांस नीतिमान् व ते मोडणारांस अनीतिमान् अशीं नांवें पडलीं. जें कांहीं आपण नित्युत्पत्तीच्या संबंधानें म्हटलें आहे त्यावरून पाहतां मनुष्याचा हेतु सुखप्राप्ति करण्याचा दिसतो. पण अनुभवावरून लोकांस असें आढळलें असावें कीं, समाजाला अथवा प्रत्येक व्यक्तीला सुख होण्यासाठीं नियम बांधल्याशिवाय चालायाचें नाहीं. ह्याप्रमाणें सर्व प्रकारें नियमांची आवश्यकता आहे असें त्यांस पक्कें दिसल्यावरून त्यांनीं सामाजिक नियम बांधले. तेव्हां अर्थात् नीति उत्पन्न झाली. आतां ह्या नीतीच्या उत्पत्तीकडे लक्ष्य दिलें असतां असें स्पष्ट दिसतें कीं, एखादें कृत्य कोणी एकानें

फलें किंवा तें सार्वजनिक झालें असतां त्याचें किंवा मंडळीचें, पण विशेषें-करून मंडळीचें साक्षात् किंवा पर्यायानें सुख वाढेल, किंवा वाढण्यास कारणीभूत होईल तें नीतीचें कृत्य; आणि ज्या कृत्याच्या योगानें साक्षात् किंवा पर्यायानें त्याचें किंवा मंडळीचें, पण विशेषेंकरून मंडळीचें दुःख वाढेल किंवा वाढण्यास कारणीभूत होईल तें अनीतीचें कृत्य समजावें.

ह्या व्याख्येचा चांगला विचार करून पाहिलें असतां कोणीही समजूतदार मनुष्यानें नीतीनें वागलेंच पाहिजे, व तो वागेल, अनीतीनें वागणारच नाहीं अशी अपेक्षाबुद्धि उत्पन्न होते. कारण अनीतीनें वागण्यांत सार्व-जनिक अहित आहे. आणि ज्या अर्थी तो एक समाजांतला आहे त्या अर्थी त्याचें ही त्यांत अहित असलेंच पाहिजे व आहेच. पुन्हा व्यक्तिमात्र दृष्टया जरी पाहिलें तरी देखील ह्याचें साक्षात् किंवा पर्यायानें त्यांत अहितच आहे. पण यदाकदाचित् अनीतीचें कर्म करण्यांत आपलें हित आहे असें जरी कोणास वाटलें तरी त्यानें असा समज घेतला पाहिजे कीं, सार्वजनिक सुखाचा नियम मोडला जातो म्हणून तें आपण करूं नये. जरी कोणाचा चार घास अन्नाकरितां प्राण जात असेल तरी त्यानें तेवढ्या करितां ही चोरी करूं नये. कारण, त्यानें असें समजावें कीं, हा नियम लोक जर माझ्या संबंधानें मोडतील तर मला आवडेल काय? नाहीं. तर मीही विचारपूर्वक दुसऱ्यांच्या संबंधानें वागलें पाहिजे. शिवाय हा नियम लोक जर मोडतील तर मंडळीचें बंधन तुटून सार्वजनिक दुःख उत्पन्न होईल. नीतिरूप बंधनांनीं मंडळी बद्ध झाली आहे; तेव्हां तीं सार्वजनिक सुखकर बंधनें तोडण्यास मी कारणीभूत होण्यापेक्षां माझा प्राण गेला तरी बेहेत्तर आहे. कारण अशा आचरणांत सार्वजनिक सुख आहे. व ज्यांत सार्वजनिक सुख आहे असें आचरण ठेवणें माझें कर्त्तव्यकर्म आहे; तेव्हां असें माझें अति महत्वाचें कर्त्तव्यकर्म मोडून माझा जीव वांचवावा त्यापेक्षां माझ्या कर्त्तव्यकर्माचें पालन करून त्यास मीं बळी जावें हें अत्युत्तम आहे, हें योग्य आहे, हेंच वंद्य व ग्राह्य आहे. आणि खरोखरच ह्या नियमांचें माहात्म्यही तसेंच आहे. ह्या नियमांच्या योगेंकरून सुख मिळतें, राष्ट्रांची उन्नती होते, ह्याच नियमरूपी बंधनाच्या योगानें जग राहिलें आहे व तें चालत आहे आणि जर तें बरोबर चालत नाहीं तर तें

चालावें तसें कां चालत नाहीं याचें कारण नीतीच्या नियमांचें पालन यथास्थित होत नाहीं ह्मणून. जर नीतीचा प्रकाश जगामध्यें उत्तम प्रकारचा पडला तर जगाची व्यवस्था उत्तम प्रकारें चालून उत्तम प्रकारचें सुख सर्वांस मिळेल. नीतीचें सर्वांनीं पालन केलें असतां, अगदीं हतभाग्य गरिबास जें सुख मिळेल तें, जन नीतीविरुद्ध वागल्यानें मोठ्या ऐश्वर्य संपन्न राजासही मिळावयाचें नाहीं. तेव्हां पहा नीतीचें महत्व वर्णावें तेवढें थोडेंच. तर हे प्रिय सद्गृहस्थ हो, तुम्हांस अतिनम्रता पूर्वक प्रार्थना करितों कीं, आपल्या पूर्वजांनीं मोठ्या अनुभवानें, मोठ्या विचारानें व मोठ्या सुज्ञपणानें जे नीतीचे नियम बांधले आहेत, ज्या नियमांच्या योगेंकरून जगास सुख प्राप्त झालें आहे व होत आहे, जे नियम पाळण्याविषयीं जगांतील सर्व धर्मशास्त्रें अति आग्रहपूर्वक आज्ञा करिताहेत, ते नीतीचे नियम आपण सार्वांनीं अगदीं प्राणापलीकडे पाळलेच पाहिजेत. ह्यांतच मनुष्य-पण आहे, ह्यांतच विचारीपणा आहे, ह्यांतच धर्माचें पालन आहे व ह्यांतच आपलें अत्युत्तम कर्त्तव्यकर्म आहे. हें आपण यथास्थित-पणें पाळलें म्हणजे आपल्या जन्माचें सार्थक्य झालें असें होईल.

हा विषय पुरा करण्यापूर्वीं एवढें सांगितलें पाहिजे कीं, ज्या तीन नियमांविषयीं वर सांगितलें आहे त्यांविरुद्ध कोणी आचरण केल्यानें अनीतीनें वागल्याचा दोष त्याजकडे येतो, तद्वत् मद्यपान किंवा कोणताही कैफ करण्याची संवई केल्यानें, अपशब्द बोलल्यानें, पापी नजरेनें पाहिल्यानें, सभ्यता सोडल्यानें, मत्सरानें, लोभानें, कोणाच्याही आपल्यापेक्षां भिन्न मतास्तव किंवा कोणत्याही कारणास्तव त्याचा द्वेष केल्यानें, आपले व इतरांचे कोणत्याही गोष्टीच्या संबंधानें खोटे समज, विश्वास व कोणत्याही प्रकारचें अज्ञान घालविण्यासाटीं प्रयत्न करण्याचें आपल्या अंगी सामर्थ्य असल्यास प्रय-त्न न केल्यानें, पक्षपातानें, अयोग्य क्रोधानें, अपमतलबानें व लोकांचा नाश होतो तरी स्वार्थबुद्धीचें पालन केल्यानें, वाईट, कोणत्याही प्रकारें घातक व नाशक अशा चाली व रीतीभातींचा लोकांच्या भीतीस्तव किंवा भिडेस्तव किंवा कोणत्याही कारणास्तव त्याग न केल्यानें, आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपल्या लेंकरांस विद्या प्राप्त करून न दिल्यानें व त्यांस सद्गुण न लावल्यानें आणि त्यांला प्रामाणिकपणानें आपला उदरनिर्वाह करितां येण्यासारखें त्यांस कांहीं हुन्नर न शिकविल्यानें, आळशी राहिल्यानें, आपली नोकरी

किंवा कोणतेंही कर्त्तव्यकर्म प्रामाणिकपणानें न बजाविल्यानें, वेश्यागमन केल्यानें किंवा कोणत्याही प्रकारें त्यांस उत्तेजन दिल्यानें, मिथ्याभिमान व दुरभिमान बाळगल्यानें, प्रत्येकानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें अनीतीचा पाडाव व नीतीचाप्रसार न केल्यानें, दयावृत्ति सोडिल्यानें, सत्याचरणाचें पालन न केल्यानें, ह्मणजे आपणांस जें सत्य वाटतें तसें न बोलल्यानें व तसें न वागल्यानें व दुसरे शेंकडो अयोग्य प्रकार आहेत त्यांप्रमाणें वागल्यानें, किंवा ज्याप्रमाणें वागणें उचित आहे त्याप्रमाणें न वागल्यानें अनीतीचा दोष आह्मांस लागेल. कारण ह्या सर्व प्रकारांनीं सार्वजनिक व व्यक्तिमात्राचेंही किंवा निदान कोणाचें तरी साक्षात् किंवा पर्यायानें अथवा दोन्हीं रीतीनें सुख न वाढतां दुःख होईल. ह्मणून हे श्रेष्ठ जनहो, मी अति नम्रपणानें आपणांस विनवितों कीं, सदा सर्वकाळ नीतीनें आचरण करून आपल्या जन्माचें सार्थक करा, मातापितरांस भूषणास्पद व्हा, आपलें, आपल्या कुटुंबाचें, व इतर सर्व लोकांचें हित करा. नीतीनें वागण्यांतच खरें सुख, ह्यांतच खरें ऐश्वर्य, ह्यांतच खरा पुरुषार्थ, ह्यांतच आपलें श्रेष्ठत्व आहे. असें असतांही, अनेक दुर्जन असें ह्मणतात कीं नीतीनें वागून चालायाचें नाहीं. व्यवहारांत, व्यापारांत व संसारांत लबाडी केलीच पाहिजे, पुरुष ह्मणजे तो तांब्याचें भांडें आहे तेव्हां व्यभिचार केल्यास व वेश्यागमन केल्यास त्याला कांहीं हरकत नाहीं, वगैरे ह्मणून त्यांच्यापेक्षां ज्यांची सद्गुणांकडे अधिक मनोवृत्तीची प्रवृत्ति झालेली असते त्यांस सांगून, व सद्गुणानें वागल्यापासून तोटेही होतात व अनीतीनें वागल्यापासून अनेक प्रसंगीं फायदे होतात तेव्हां प्रसंग पाहून नीतीनें किंवा अनीतीनें वागायाचें तें वागावें, "आत्मरक्षी धर्मः" वगैरे नानातऱ्हेनें सांगून नीतीपासून परांचें मन वळविणारे सद्गुणशत्रू अनेक असतात. ते आपणां स्वतःस मोटे व्यवहारप्रवीण समजतात. तर अशा ह्या लोकांनीं हवें तसें जरी सांगितलें तरी सन्मार्ग टाकून भल्यांनीं कुमार्गाकडे कधींच वळूं नये. भर्तृहरीनें आपल्या नीतिशतकांत एका ठिकाणीं सज्जनाचें लक्षण सांगितलें आहे त्यांतील उपदेश, रत्न जवाहिरापेक्षां मोलवान, हिरे माणिकांपेक्षां सुंदर, जगांतील सर्व धनाहूनही श्रेष्ठ आहे. त्या उपदेशाचें अवलंबन "खरा मानव" हें नांव शोभणाऱ्या प्रत्येक मानवानें आपल्या प्राणापलीकडेही करणें योग्य आहे. ते म्हणतात,—

वानोत निंदोत सुनीतिमंत* ॥ त्यालो असो वा कमळा गृहांत ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं ॥ सन्मार्ग सांडोनि असें न जाती ॥ १ ॥

वास्तविकच आहे. भले जे आहेत ते पाहिजे त्या स्थितींत, हव्या त्य स्थळीं आणि कशाही दुर्घट प्रसंगीं अनीतीचें अवलंबन कदापिही करणार नाहींत हें सर्वप्रकारें निःसंशय आहे. तर प्रिय सद्‍गृहस्थ हो, पहा हो, पहा आपल्या प्रिय लेंकरांप्रमाणें किंबहुना त्यांहूनही अधिक काळजीनें व श्रमानें नीतीचें पालन करून आपलें खरें हित साधा, अनीतीच्या फांसजाळांत पडूं नका, कोणतीही स्थिति असो, कोणताही प्रसंग येवो, सज्जनता, सुजनता मनाचें औदार्य, दया, विनय, लीनता, पवित्रता, सत्य, वगैरे कोणतेही सद्गुण सोडून वागूं नका. लोक वाहवा करोत किंवा छीःथू करोत, संपत्ति प्राप्त होवो किंवा अति दारिद्र येवो, आजचप्राण जावो, किंवा बायबलांतील मथुशालाह प्रमाणें किंवा पुराणांतील मार्कंडेय ऋषिप्रमाणें अथवा सप्तचिरंजीवांप्रमाणें दीर्घायुष्य प्राप्त होवो, सुखावस्था असो किंवा दुःखाग्निजाळ आपणास जाळोत, पण मानवहो, नीतीची वाट सोडून जाऊं नका. हा उपदेश मी, तुम्ही

---

* प्रथम जेव्हां हा श्लोक माझ्या अवलोकनांत आला तेव्हां "सुनीतिमंत" ह्या शब्दाची योजना येथें वामन पंडीतानें काय समजून केली असावी अशाविषयीं मला थोडी भ्रांति पडली. कारण जर "सुनीतिमंत" ह्मणजे, मी समजलों होतों कीं, जे चांगले नीतिवान लोक आहेत ते, आपली स्तुति करोत किंवा निंदोत, ह्मणजे आपणांस वाईट म्हणोत, तरी आपण योग्यच रीतीनें वागलें पाहिजे असा अर्थ पहिल्या चरणावरून निष्पन्न होतो. तर मग मला असें वाटलें कीं, एखादें काम चांगलें आहे उदाहरणार्थ. सत्य भाषण करणें ह्या; ह्याचें जर आपण अवलंबन केलें, तर "सुनीतिमंत" ह्मणजे चांगले नीतिवान आपली निंदा करितील हें कसें संभवेल, ह्याचें गूढ मला कळेना. तेव्हां मी भर्तृहरीचा मूळ श्लोक पाहिला. त्यांत "लोकनिपुणा" अशीं अक्षरें आहेत. हा पहा मूळ श्लोक.

"निंदंतु लोकनिपुणा यदि वा स्तुवंतु ॥ लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टं ॥
अद्यैव वा मरणमस्तु युगांतरे वा ॥ न्याय्यात्पथः प्रविचलंति पदं न धीराः ॥ १ ॥

ह्या श्लोकाच्या पहिल्या चरणांत "लोकनिपुणा" असा जो शब्द आहे त्याचें भाषांतर वामन पंडितानें "सुनीतिमंत" असें केलें आहे. ह्यावरून असें दिसतें कीं वामनाच्या वेळेस "सुनीतिमंत" ह्या शब्दाचा उपयोग लोकव्यवहारांत निपुण जे ते, म्हणजे व्यवहार जाणते, धोरणी किंवा कावेबाज. ज्यांला लोक हल्लीं "पोलिटिकल" म्हणतात ते, असा होत असावा.

ाणि सर्व जगानें ग्रहण केला पाहिजे. असें झालें म्हणजे जगांत सुखाचा र्य उगवेल, प्रेमाचे झरे वाहतील, आनंदानंद गर्जेल, आणि स्वर्गी वर्णिलेल्या त्तम सुखाचा अनुभव आपणांस इहलोकींच प्राप्त होईल.

---

**मंदाक्रांता.**

वेळोंवेळीं गरज पडुनी देशकालानुसारें ॥
घेवोनीया अनुभव जशीं निर्मिलीं सर्व शास्त्रें ॥
योग्यायोग्यानुभवहि तसे आणुनी पूर्ण चित्तीं ॥
नीतीचेही नियम रचुनी ठेवियेले महंतीं ॥ १ ॥

**शार्दूल विक्रीडित.**

कर्त्याच्याच हितार्थ मात्र नसुनी प्रत्यक्ष किंवा पुढें ॥
पर्यायेंच समाजसौख्यघटना योगें जयांच्या घडे ॥
ज्ञाते त्याच कृतींस नीति ह्मणती ह्यां वेगळी जी कृती ॥
आहे तीच अनीति कीं निजपरां दुःखप्रदा होय ती ॥ २ ॥

दुःखातें पळवी रिपूंस वळवी चित्तास आनंदवी ॥
सर्वांला सुखवी कुणा न दुखवी नीती अशी मानवी ॥
ऐसेंची समजा अतांचि उमजा हे मुख्य आहे मजा ॥
तीनें पाप वजा पडे म्हणुनिया नीतीस तुम्ही भजा ॥ ३ ॥

विश्वीं जीवन नीति मुख्यचि जनां, देशांत तेजस्विता ॥
नांदे नीतिबलें कुटुंब सुख ही, व्यक्ती करी मंडिता ॥
नीतिभ्रष्ट जनासि बुद्धिजडता येते जगीं निश्चिती ॥
आयुः कीर्ति मतीस हानि घडते त्यां जे नया त्यागिती ॥ ४ ॥

**आर्या.**

यास्तव तुज कथितों कीं निजपरहित साधणें असेल तरी ॥
धरुनि नीतिपथाचा आश्रय नरजन्म हाहि सार्थ करीं ॥ १ ॥

**अनुष्टुप्.**

सत्कार्यकर्त्ता अल्पायु, तरी दिर्घायु तो खरा ॥
दुष्ट झाला सहस्रायु, भूमिभार न तो बरा ॥

समाप्त.

# सर्वांस उपयुक्त अशीं विक्रीस तयार पुस्तकें.

हीं पुस्तकें मिसेस रेबेका सिमियन, पास्ड मिडवाईफ जी.एम.सी. यांच्याकडे मुंबईंत पायधुणी, घर नं० ७१ येथें मिळतील. पुस्तकें मागविणारांनीं पैसे रोख पाठवावे किंवा पुस्तकें व्हाल्यु पेयेबल पारसलानें पाठवावयास लिहिलें तरी चालेल. पुस्तकांच्या किमती खालीं लिहिल्या आहेत. शिवाय दर पुस्तकास एक आणा टपाल हांशील पडेल. पण दोन आणे किंवा त्या खालील किमतीच्या पुस्तकास फक्त अर्धा आणा टपाल हांशील पडेल. तसेंच कोणी एकाच जातीचीं किंवा अनेक जातींचीं मिळून पांच किंवा अधिक रुपयांचीं पुस्तकें मागविल्यास प्रत्येक पुस्तकामागें फक्त अर्धे टपाल हांशील पडेल.

## मि० सिमियन बेंजामिनकृत मराठी पुस्तकें.

| पुस्तकांचीं नांवें. | किंमत. आणे. | पुस्तकांचीं नांवें. | किंमत. आणे. |
|---|---|---|---|
| मनुष्यांस वागविण्याची रीति ............ | ५. | नीत्युत्पत्ति .................. .. | २ |
| अपशब्दनिषेध .... .......... .... | ४ | मनाची सांगी ... ....... ...... | २ |
| काव्यदोषविवेचन ....... ....... | ७ | अहिंवसेवर पहिलें व्याख्यान* ........ | २॥ |
| योगसाधन (नीति योग) ....... ... | ६ | अहिंवसेवर दुसरें व्याख्यान† ........ | ४ |
| क्रोध ...... .......... ........ | १ | सभ्यता .. . ........ .... . | ६ |
| कामदृष्टि, किंवा स्त्रियांकडे पापानजरेनें पाहण्याचा नीच प्रकार ............ | ८ | मुलांचा कायदा. किंवा मुलांच्या दैहिक वगैरे शिक्षाविषयीं.... ...... . | ८ |

### ENGLISH.

Discussion on the Intuitive Principle of Conscience or the Divine Reason in Man.. .. .. .. .... .... .... As. 6.

## मिसेस रेबेका सिमियनकृत मराठी पुस्तकें. किंमत. आणे.

कुटुंबमंत्री, किंवा शरीरास अपाय घडले असतां तत्काल योजण्याचे उपाय ... ... ६

सुईण, किंवा प्रसुति आणि तत्संबंधी अज्ञानमूलक व अनर्थकारक परिपाठ ........६

## ગુજરાથી.

સુયાણી. અથવા પ્રસુતિ અને તે સંબંધી અજ્ઞાનપણુ હોવાથી થતા અનર્થકારક રીવાજ.૮

## इतर पुस्तकें. मराठी.

घरधनी व भाडेकरी यांचा कायदा ........ ....... . .. . .... किंमत. आणे. ५.

---

* ह्या व्याख्यानांत मि. सिमियन बेंजामिन यांची मांसाहार सुटण्याची मोठी मनोवेधक, गहिंवर उत्पन्न करणारी. नेत्रांतून अश्रु काढणारी व दयावृत्ति जागृत करणारी हकीकत आहे.

† "मनुष्यास आत्मा आहे, गाईस आत्मा नाहीं" असा जो मांसाहारी जनांचा सिद्धांत आहे, व तो सत्य आहे असें समजून लोक बेधडक मांसाहार करितात, त्या सिद्धांताचें ह्या व्याख्यानांत यथास्थित खंडन केलें आहे. तें इतकें सप्रमाण आहे कीं त्याचें उत्तर मांसाहारी जनांच्यानें कदापि देववणार नाहीं.

# स्त्रियांला मोठ्या उपयोगाचे पट्टे.

हे पट्टे मिसेस रेबेका सिमियन, ग्रांट मेडिकल कॉलेजांत पास झालेली सुईण ह्या बाईनें करविले आहेत. ह्या पट्यांचा मोठा उपयोग आहे.

**१ ला उपयोग**—स्त्री गरोदर असतां हा बांधला तर उदर खालीं झोलत नाहीं, गर्भ खालीं उतरत नाहीं, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारें इजा होत नाहीं व गैरसोय वाटत नाहीं.

**२ रा उपयोग**—प्रसुती नंतर बांधला असतां गर्भाशयाच्या स्वाभाविक होणाऱ्या आकुंचनास चांगली मदत होते. प्रसुती नंतर बाळांतिणीस वेढा कसा बांधावा हें पुष्कळ बायांस कळत नसल्या कारणानें उदराची चामडी शिथील होणें, गर्भाशय बाहेर पडणे ( ज्यास लोक भांडे बाहेर येणें असें म्हणतात तें ) व दुसऱ्या अनेक प्रकारें इजा होते, ती होणार नाहीं.

**३ रा उपयोग**—गरोदरपण व बाळंतपण ह्या प्रसंगांशिवाय एरवींही ज्या स्त्रियांला वारंवार मुलें होऊन, बाळंतपणांत अव्यवस्था होऊन, किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें यांचें उदर शिथील झालेलें असतें त्यांस आणि त्याचप्रमाणें ज्या बायांला फार चालावें लागतें, जड ओझें वगैरे उचलावें लागतें किंवा नाचावें लागतें त्यांसही हा पट्टा मोठा हितकारक आहे.

**४ था उपयोग.**—विशेषतः श्रीमंत बायांचें किंवा पडद्यांत राहणाऱ्या बाया आणि त्याचप्रमाणें ज्यांच्यांत बाहेर फिरावयास जाण्याची चाल नसते त्यांस म्हणण्यासारखा व्यायाम ( फिरणे वगैरे ) होत नसल्या कारणानें उदर शिथील किंवा मोठें झालेलें असतें, किंवा तसें होण्याचा संभव असतो त्यांनीं हा पट्टा वापरला असतां त्यांला तो मोठा हितावह आहे.

**५ वा उपयोग.**—वारंवार मुलें झाल्यानें किंवा एकादें दुसरें मूल जरी झालें असलें तरी बाळंतपणांत अव्यवस्था झाल्यामुळें, वृद्धापकाळामुळें किंवा तरूणपण जरी असलें तरी अशक्ततेमुळें कंबर दुखते, निर्बळ पडल्यासारखी होते, कटीराचीं हाडें सरल्यासारखीं हालतात, किंवा खटखट वाजतात वगैरे कटीराच्या हाडांच्या व कंबरेच्या संबंधानें जे नाना प्रकार होतात त्यांवर हा पट्टा मोठा गुणकारी आहे.

असे असे ह्या पट्यांचे मोठे महत्वाचे अनेक उपयोग आहेत. हे पट्टे सर्व स्त्रियांला उपयोगी पडावे म्हणून ते साधे व रबरघातलेले असे दोन जातींचे असून, लहान मोठ्या आकारांचे असे एकंदर तीन नंबरांचे केले आहेत.

| रबरघातलेले पट्टे. | | किंमत. रु. आ. | साधे पट्टे. | | किंमत. रु. आ. |
|---|---|---|---|---|---|
| नं० १ चा पट्टा, | ,, | ६—० | नं० १ चा पट्टा, | ,, | २—८ |
| ,, २ ,, | ,, | ७—० | ,, २ ,, | ,, | ३—० |
| ,, ३ ,, | ,, | ८—० | ,, ३ ,, | ,, | ३—८ |

ह्या प्रमाणें किंमती असून शिवाय वर्गा करणावळ दर पट्यास आठ आणे ज्यास्त पडतील. कमी नंबराचा पट्टा लहान व चढत्या नंबराचा पट्टा मोठा असें समजावें.

हे पट्टे **मिसेस रेबेका सिमियन, ग्रांट मेडिकल कॉलेजांत पास झालेली सुईण** यांच्याकडे खालील पत्यावर विकत मिळतात. पैसे अगाऊ पाठवावे. किंवा व्हाल्युपेयेबल पारसलानें पाठवायास लिहिलें तरी चालेल.

**पत्ता—मुंबई, पायधुणी बंबखान्यासमोर, नाक्यावरचें पहिलेंच घर नं ७१.**